

नुतन वर्षाभिनंदन २०२५

• पुणे, बुधवार, ०१ जानेवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 36 • वर्ष ४ थे, अंक ३६ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




रोहितने क्रमवारीचा विचार करावा

पा१२

# वाल्मिक कराड पोलिसांना शरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात व पवन ऊर्जा कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी फरार असलेला वाल्मीक कराडने पुण्यात सीआयडी अधिकाऱ्यांपुढे आत्मसमर्पण केले आहे. देशमुख हत्या प्रकरणात जे आरोपी असतील त्यांना अटक करण्यात यावी असे आत्मसमर्पण करतांना वाल्मिक कराड याने सीआयडीच्या अधिकाऱ्यांना म्हटले आहे. वाल्मिक कराड हे त्याच्या कार्यकर्त्यांसह दोन गाड्यातून सीआयडीच्या अधिकाऱ्यांपुढे शरण आले.

बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात अलि होती. या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. देशमुख यांचे अपहरण आणि हत्येबद्दल तर पवनचक्की फर्मच्या सुरक्षा रक्षकावर हल्ला केल्या प्रकरणी देखील गुन्हा दाखल आहे. तर मस्साजोग येथे पवनचक्की प्रकल्प उभारणाऱ्या अक्षय ऊर्जा कंपनीवर स्थानिक गावकऱ्यांनी २ कोटी रुपयांच्या खंडणी घेतल्या प्रकरणी देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारणी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला होता. देशमुख यांच्या हत्येमागे त्यांचा प्रमुख हात असल्याचा आरोप होत होता. वाल्मिक कराड गेल्या काही दिवसांपासून फरार » पान ७ वर



"कराडची शरणागती हे सी आय डी चे यश नाही. थोडं फार सरकारवर जो आम्ही दबाव टाकला होता, त्यातून हा मानसिक दबाव वाल्मिक कराड वर आला असेल. २२ दिवस आरोपी बिनधास्तपणे महाराष्ट्रात फिरतो. अक्कलकोट येथे जाऊन दर्शन घेतो, पुण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल होतो. काल धनंजय मुंडे फडणवीस यांना भेटतात आणि आज वाल्मीक कराड हजर होतो हा संशोधनाचा भाग आहे. वाल्मिक कराड ७ आरोपींचा म्होरक्या आहे, त्याच्या नावाने १४ गुन्हे आहेत आणि तरी सुद्धा बॉडी गार्ड घेऊन फिरतो. वाल्मिक कराड यांच्यावर मोक्का लागणे गरजेचे आहे."

**— छत्रपती संभाजीराजे**



### वाल्मिक कराड यांची नार्को टेस्ट करा

• सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अत्यंत निर्घृणपणे केलेली आहे. खंडणीखोर वाल्मिक कराड आणि त्याच्या सहकार्याने ठरवून केलेली हत्या आहे. ती हत्या बीड जिल्ह्याच्या मंत्र्यांकडून झालेले आहे. सर्वसामान्य व्यक्तीला सुद्धा माहिती गेल्या दहा वर्षात बीड जिल्ह्यात शेकडो हत्या झाल्या त्याचा मारेकरी कोण आहे? त्याचं नाव वाल्मिक कराड द्वारे धनंजय मुंडे हेच आहे. आता महाराष्ट्र शांत बसणार नाही. सरकार सीआयडी आणि पोलीस प्रशासन यांच्या हातावर तुरी देऊन गेली 20 दिवस वाल्मिक कराड फरार असतो? धनंजय मुंडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्यानंतर दुसऱ्या दिवशी वाल्मिक कराड पुण्यामध्ये सरेंडर होतात याचा अर्थ त्यांना इकडे तिकडे पळवलं कुणी? वाल्मिक कराड यांचा मास्टर माईंड कोण? वाल्मिक कराड यांना पाठीशी घालतोय कोण? बीड जिल्ह्यातील शेकडो हत्या कोणी केल्या? याचा तपास झाला पाहिजे अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे. म्हणून वाल्मिक कराड यांची नार्को टेस्ट करा अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे.



"गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही आणि कोणालाही सोडणार नाही, कोणालाही अशा प्रकारची हिंसा करता येणार नाही, खंडणी मागता येणार नाही. यादृष्टीने तपास अतिशय गतिशील केलेला आहे. त्यामुळेच आज त्यांना (वाल्मीक कराड) त्याठिकाणी शरणागती पत्करावी लागली आहे. आता हत्येतील जे आरोपी फरार आहेत, त्यांना पकडण्यासाठी वेगवेगळ्या टीम या कामाला लागल्या आहेत. कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही. सगळ्यांना शोधून काढू", माझ्या करिता स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येला कारणीभूत लोकांना शिक्षा होणं, हे महत्त्वाचे आहे. काही लोकांना केवळ राजकारण महत्त्वाचं आहे. त्यांचं राजकारण त्यांना लखलाभ. त्यांच्या राजकारणाने मला वाटत नाही की, त्यात काही फायदा होईल. त्यामुळे मला कोणत्याही राजकीय वक्तव्यामध्ये जायचं नाही."

**— देवेंद्र फडणवीस** मुख्यमंत्री



"मी वाल्मिक कराड, माझ्यावर केज पोलिस ठाण्यात खंडणीचा खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मला अटकपूर्व जामीन मिळवण्याचा अधिकार असतांना देखील पुण्यातील सीआयडी ऑफिसमध्ये आत्मसमर्पण केलं आहे. संतोष भैया देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना अटक करावी व त्यांना फाशीची शिक्षा द्यावी. राजकीय दोषापोटी माझं नाव या घटनेशी जोडले जात आहे. जर पोलिस तपासात यात मी दोषी आढळलो तर मी शिक्षा भोगायला तयार आहे."

**— वाल्मिक कराड**

## मोहिनी वाघसह सहा आरोपींची कारागृहात रवानगी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

क्राईम

**पुणे :** सतीश वाघ यांची पत्नी मोहिनी सतीश वाघ हिने संपत्तीच्या तसेच अनैतिक संबंधांच्या संशयातून हत्या घडवून आणल्याचं पोलिस तपासात समोर आलं आहे. तर त्यांच्या अपहरणानंतर कारमध्येच त्यांच्यावर वार केले त्यांचा जीव गेल्यानंतर त्यांचा मृतदेह शिंदवणे घाटामध्ये फेकून देण्यात आला होता. तर ज्या धारदार शस्त्राने त्यांच्यावर वार केले त्यानंतर ते भीमा नदीत फेकून दिल्याची माहिती आरोपींनी पोलिसांना तपासादरम्यान दिली आहे. त्याचा तपास करण्यात आला मात्र, ते धारदार शस्त्र अद्याप सापडलेले नसल्याची माहिती आहे.

सतीश वाघ यांच्या हत्या प्रकरणात पत्नी मोहिनी वाघसह सहा आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी केली आहे. मोहिनी वाघ व अतिश जाधव यांच्या पोलिस कोठडीचे हक्क अबाधित ठेवून त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पवन श्यामसुंदर शर्मा (वय 30, रा. आव्हाळवाडी), नवनाथ अर्जुन गुरसाळे (वय 31, रा. वाघोली, मूळ रा. बीड), विकास ऊर्फ विक्की सीताराम शिंदे (वय 28, रा. वाघोली, मूळ रा. अहिल्यानगर), अक्षय ऊर्फ सोन्या हरिश जावळकर (वय 29, रा. फुरसुंगी फाटा), मोहिनी सतीश वाघ (वय 48, रा. फुरसुंगी) व अतिश संतोष जाधव (वय 20, रा. लोणीकंद, मूळ रा. धाराशी) अशी न्यायालयीन कोठडी झालेल्या आरोपींची नावे आहे. त्यांच्या पोलिस कोठडीची मुदत संपत आल्याने त्यांना काल न्यायालयात हजर करण्यात आले होते.

न्यायालयात सरकारी पक्षाकडून सरकारी वकील ज्योती वाघमारे यांनी युक्तिवाद केला. यावेळी वाघमारे यांनी न्यायालयाला सांगितले, जाधव व गुरसाळे यांनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार पेरणे फाटा येथील भीमा नदीपात्रात टाकले असल्याचे सांगितले आहे. त्यासमक्ष गोताखोर टीमच्या साहाय्याने नदीपात्रामध्ये शोध घेण्यात आला आहे. मात्र, हत्यार अद्याप सापडले नाही. तपास करायचा असल्याचा युक्तिवाद वाघमारे यांनी केला आहे. न्यायालयाने सरकार पक्षासह बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत सर्व » पान ७ वर

# प्रदूषण नियमकांचे पालन न करणाऱ्यांवर होणार गुन्हा दाखल!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुंबईतील हवेची गुणवत्ता काही भागांमध्ये खालवली जात असून अशा प्रदूषित भागांवर आता मुंबई महापालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले असून प्रदूषणाच्या पाश्ववभूमीवर पालिकेने आता ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील बोरिवली पूर्व आणि भायखळा या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषित हवा निर्माण झाल्याने येथील सर्व खासगी आणि शासकीय प्रकल्प कामे तथा विकासकामे यांच्यावरती बंदी घालण्यात आली आहे. तसेच २०० पेक्षा खाली हवेती प्रदूषित मानांक कमी आलेल्या ठिकाणांमध्ये म्हणजेच वरळी आणि कुलाबा ,नेव्ही नगर आदी भागांमध्ये विकासकामांवर विशेष लक्ष ठेवले जात असून लवकरात या सर्व बांधकामांवर बंदी आणली जाईल, असे महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

ते पुढे म्हणाले की नोव्हेंबर २०२४ पासून आजपर्यंत पालिकेच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून एकूण ८७७ बांधकाम प्रकल्पांची पाहणी. झाली सुरु असून २८ मुद्यांची मार्गदर्शक सूचना, 'ईएमपी'चे पालन होत आहे की नाही, याची सातत्याने तपासणी करण्यात येत आहे नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना व नंतर 'कारणे दाखवा नोटीस' आणि 'काम थांबवण्याची नोटीस' बजावली जात आहे. आतापर्यंत सुमारे २८६ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' दिली आहे. जर काम थांबवण्याची नोटीस दिल्यानंतर विकासकांनी काम सुरू ठेवल्यास संबंधितांवर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार असून १ जानेवारी पासून त्याची कडक अंमलबजावणी केली » पान ७ वर

## सरपंच संघटनेचे राज्यात ३ दिवस काम बंद आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहेत. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप केला जात आहे. राज्यात ठिकठिकाणी या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला होता. आता राज्यभरातील ग्रामपंचायतीचे कामकाज काल मंगळवारपासून तीन दिवस बंद राहणार आहे.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई करावी आणि लोकप्रतिनिधींवर होणा-या हल्ल्यांना आळा बसावा यासाठी काम बंदचे आंदोलन केले आहे.

# चित्रीकरणास 'एक खिडकी'द्वारे ऑनलाईन परवानगी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाबरोबरच सांस्कृतिक कार्य विभागाशी निगडीत विविध माध्यमातून रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होते. हा विभाग सॉफ्ट पॉवर म्हणून काम करतो. त्यामुळे मराठी चित्रपटाचे सर्व चलछायाचित्रण मोठ्या प्रमाणात गोरेगाव येथील चित्रनगरीत व्हावे यासाठी आकारण्यात येणारे दर कमी करावे. कुठल्याही निर्मात्याला महाराष्ट्रात चित्रीकरण करण्यासाठी एक खिडकीद्वारे तात्काळ ऑनलाईन परवानगी देण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्ष सोहळ्याचे विशेष आयोजन करून त्याचे कार्य सर्व शाळा, कॉलेज, महाविद्यालयांपर्यत पोहोचले पोहोचण्यासाठी वर्षभराचे नियोजन करण्याच्या सूचना करून मुख्यमंत्री म्हणाले की,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य देशभरात खूप मोठे असल्याने त्यांच्यावर एक चांगला व्यावसायिक चित्रपट तयार करण्यात यावा. या चित्रपटासाठी शासनाकडून अनुदान देण्यात यावे. हर घर संविधान अंतर्गत प्रत्येक घरात संविधान पोहचले पाहिजे, अशाही सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड आशिष शेलार,आदी उपस्थित होते.

### विशेष सहाय्याच्या योजनांचे अनुदान 'डिबीटी'द्वारे

• शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील पात्र निराधारांना दिलासा मिळतो. मात्र, निराधारांना लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण हे थेट लाभ हस्तांतरण (DBT) पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, असे निर्देश दिले.

## कर्जबाजारी झाल्याने आत्महत्येचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कर्जबाजारी झाल्याने तरुणाने पिस्तुलातून स्वत:वर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना कात्रज भागात घडली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोळीबारात जखमी झालेल्या तरुणावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तरुणावर ससून रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी दिली. कात्रज घाटात सोमवारी रात्री दहाच्या सुमारास एक तरुण जखमी अवस्थेत पडल्याची माहिती गस्त घालणाऱ्या पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांला » पान ७ वर

# हिटलरशाही विरोधात अभाविप आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक परिपत्रक काढून, पुणे विद्यापीठ आवारामध्ये त्याचबरोबर नाशिक व अहिल्यानगर येथील उपकेंद्रांच्या आवारांमध्ये कोणतेही कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन, पथनाट्य किंवा कोणतेही जागृतीपर अभियान असे कार्यक्रम घ्यावयाचे असल्यास किमान ८ दिवस आधी विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे, असा हिटलरशाही सारखा हुकूम काढला. या विरोधामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तत्काळ आक्रमक भूमिका घेत निदर्शने केली. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारती बाहेर अभाविप कार्यकर्ते व अन्य विद्यार्थी एकत्रित येऊन आक्रमक झाले. संबंधित परिपत्रक तत्काळ रद्द करावे आणि कोणतेही कार्यक्रम, उपक्रम, अभियान, आंदोलन किंवा पथनाट्य अशा पद्धतीचे कार्यक्रम घेण्याच्या पूर्वपरवानगीचा कालावधी २४ तास करण्यात यावा यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने मागणी केली. यावेळी सुरक्षारक्षकांचे कडे भेदून मुख्य इमारती बाहेर जाऊन आंदोलकांनी घोषणा दिल्या. त्यानंतर विद्यापीठाच्या कुलसचिव ज्योती भाकरे मॅडम यांच्याबरोबर चर्चा करून आंदोलन थांबवण्यात आले.

यावेळी बोलताना हर्षवर्धन हरपुडे, पुणे महानगर मंत्री असे म्हणाले की, "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ एका बाजूला दोन दिवसांमध्ये स्वतःचे गेस्ट हाऊस हे लग्नाच्या वऱ्हाडासाठी पूर्णतः देऊन टाकते, पण विद्यार्थ्यांना जागृती पर कार्यक्रम » पान ७ वर

## आंदोलन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक परिपत्रका विरोधामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तत्काळ आक्रमक भूमिका घेत निदर्शने केली.

## धस यांचा विषय संपला : प्राजक्ता माळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळीचा एक व्हिडिओ इन्स्टाग्राम हँडलवर व्हायरल होत आहे. सुरेश धस यांचा विषय संपल्याचे या व्हिडिओमध्ये सांगण्यात आले आहे. शिवाय प्राजक्ताने सुरेश धस, देवेंद्र फडणवीस आणि रुपालीताई चाकणकर यांचे आभार देखील मानले आहेत. यावेळी बोलताना प्राजक्ता माळी म्हणाली की, तुम्हा सर्वांना माझा नम्रतापूर्वक नमस्कार. संबंध महाराष्ट्राचे मी मनापासून आभार मानते. समाजातील सर्व स्तरांतून आम्हाला पाठिंबा मिळाला, समर्थन दिले. आम्हाला बळ मिळाला... याबद्दल धन्यवाद. माननीय आमदार सुरेश धस यांचे आभार मानते. मोठ्या मनाने त्यांनी समस्त » पान ७ वर

## गरीबाचा विठ्ठल झाला श्रीमंत

# तब्बल एक वर्षात ५३ कोटी ९७ लाखाचे दान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस दिनांक १ जानेवारी ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ५३ कोटी ९७ लाखाचे दान प्राप्त झाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शनरांग व्यवस्थापन, अन्नछत्र, लाडूप्रसाद, निवास इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांना श्रींच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा



देखील भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, विश्रांती कक्ष, आपत्कालिन दरवाजे, हिरकणी कक्ष, मोफत अन्नछत्र, एकादशीला शाबुदाणा खिचडी » पान ७ वर

# २०२८ पर्यंत १० टन वजनाचा उपग्रह स्वबळावर पाठवणार

**स्पेस**

उपग्रह आणि अंतराळ स्थानक


**नासाच्या नंतर इस्रोचा जन्म झाला. असे असूनही, नासानेही इस्रोच्या यशाची कबुली देण्यास सुरुवात केली आहे. इस्त्रोची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे. इस्रोने आतापर्यंत ४३२ हून अधिक उपग्रह प्रक्षेपित केले आहेत, त्यापैकी ३९७ गेल्या दहा वर्षांत झाले आहेत. इस्रोने सन २०२५ साठी आपले लक्ष्यही निश्चित केले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सध्या, इस्रोला ४ टन वजनापेक्षा जास्तीचे उपग्रह अंतराळात पाठवण्यासाठी नासावर अवलंबून राहावे लागते. २०२८ सालापर्यंत इस्रो १० टन वजनाचे उपग्रह अवकाशात पाठवू शकणार आहे. याशिवाय २०३५ पर्यंत इस्रो भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक स्थापन करणार आहे. केंद्रीय मंत्री डॉ जितेंद्र सिंह यांनी माहिती दिली की, येत्या ५ वर्षात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचे आमचे पहिले मॉड्यूल कक्षेत प्रक्षेपित केले जाईल.

२०२५ मध्ये, नाविक ०२, युएस सॅटेलाईट फॉर मोबाईल आणि







बायोमिना हे जानेवारीतील प्रमुख उपग्रह इस्त्रो प्रक्षेपित करणार आहे. इस्रो, नासाच्या सहकार्याने, फेब्रुवारी-मार्चमध्ये मोबाईल फोनची सुविधा देण्यासाठी एक उपग्रह पाठवणार आहे. सध्या वापरले जात असलेले सेल्युलर नेटवर्क जगाच्या सुमारे १५ टक्के भाग आहे. त्यामुळे ऑफ-द-ग्रिड ठिकाणी प्रवास करताना, मोबाइल नेटवर्क उपलब्ध नसते. पण जेव्हा ते थेट उपग्रहाद्वारे जोडले जाईल तेव्हा या समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही.

» पान ७ वर

# पोषण आहाराचा 'गफला' महागात!

## शाळांना लेखापरिक्षण करणे बंधनकारक; हयगय केल्यास दंडात्मक कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**पुणे :** शालेय पोषण आहाराच्या अनुदानातील संभाव्य 'गफला' रोखण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयाने महत्वपूर्ण पावले टाकण्यास सुरुवात केली आहे; त्याचाच एक भाग म्हणून लेखापरिक्षणासाठी सर्व शाळांनी माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यात हयगय केल्यास शाळा प्रमुखांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व शाळांचे लेखापरीक्षण होण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांची राहील, असे निर्देशात स्पष्ट केले आहेत.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून शाळांना शालेय पोषण आहारासाठी अनुदान दिले जाते. याच अनुदानाच्या माध्यमातून शाळांकडून विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. यामध्ये अनेकवेळा अनियमितता झाल्याच्या तक्रारी करण्यात येतात. परंतु ही योजना योग्य पद्धतीने सुरू आहे का, याची पाहणी करण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने २०२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिलेल्या निर्देशानुसार शहर, तालुका व जिल्हास्तरावर योजनेची अंमलबजावणी करताना सन २०२१ ते २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करण्यासाठी पुण्यातील शिंदे, चव्हाण, गांधी अँड कंपनी या सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती केली आहे.

या संस्थेमार्फत राज्यातील योजनेस पात्र सर्व शाळांचे लेखापरीक्षण करण्यात येणार असल्याने योजनेस पात्र शाळांना एका वेबफॉर्मद्वारे माहिती भरावी लागणार आहे. शाळांनी माहिती भरताना शाळेकडील उपलब्ध सर्व अभिलेखांचा आधार घेऊन योग्य, अचूक व वस्तुनिष्ठ माहिती भरावी. माहिती शाळांनी केवळ एकदाच भरायची आहे. त्यामुळे माहिती भरताना योग्य ती दक्षता शाळाप्रमुख, मुख्याध्यापक यांनी घेणे आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहर आणि जिल्ह्यासह राज्याच्या बहुतांशी भागात शालेय पोषण आहारामध्ये मोठ्या प्रमाणावर गोलमाल झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत, यासंदर्भात राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाने सातत्याने संबधितांवर कडक कारवाई केली आहे. मात्र; हे वास्तव असतानाही त्याला आळा घालण्यात प्रशासन आणि राज्य शासनाला सपशेल अपयश आले आहे.

### अशी होणार तपासणी...!

- बँक पासबुक, कॅशबुकचा तपशील.
- तांदूळ साठा नोंदवही, इतर धान्य माल.
- तांदूळ खर्च विवरण नोंदवही.
- शासन खाती भरणा केलेल्या रकमांच्या चलनांची प्रत.
- सर्व प्रकारच्या खर्चांचे व्हाऊचर्स, उपयोगिता प्रमाणपत्रे.
- विद्यार्थी आरोग्य तपासणी विवरण.



"शाळांनी माहिती भरल्यानंतर संस्थेमार्फत टप्प्याटप्प्याने विविध जिल्ह्यांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. तालुकानिहाय लेखापरीक्षणाचा कार्यक्रम जिल्ह्यांना कळविण्यात येणार आहे. लेखापरीक्षणासाठी शाळांकडून कोणत्याही स्वरूपाची फी घेण्यात येणार नाही."

— **शरद गोसावी,** शिक्षण संचालक

## सशक्त मस्तकं कोणापुढे झुकत नाहीत : प्राचार्य जाधव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शाळेची ग्रंथालये समृद्ध असतील तर विद्यार्थ्यांची मस्तकं सशक्त होतात. सशक्त झालेली मस्तकं कोणापुढेही झुकत नाहीत. शाळेची ग्रंथालये समृद्ध असतील तर, विद्यार्थी चौफेर वाचन करतील, असा स्पष्ट विचार साधना विद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय जाधव यांनी मांडला.

हडपसरमधील साधना विद्यालयामध्ये आज (सोमवार, दि. ३०) छोटेखानी कार्यक्रमामध्ये पत्रकार डॉ. अशोक बालगुडे यांनी विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी सुमारे एक हजार ४५ रुपयांची पुस्तके भेट दिली. या पुस्तकांचा स्वीकार विद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय जाधव यांनी केला. याप्रसंगी पर्यवेक्षक शिवाजी मोहिते, पर्यवेक्षिका माधुरी राऊत, ग्रंथालयप्रमुख प्रदीप बागल, प्रतापराव गायकवाड, अनिल वाव्हळ उपस्थित होते. दरम्यान, पत्रकार डॉ. अशोक बालगुडे म्हणाले की, प्रत्येकवेळी दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा आपण कुठे चुकतो आहोत का, हे तपासले पाहिजे. चांगल्या गोष्टींचे अवलोकन करण्यासाठी आपण नव्या वर्षाच्या प्रारंभापासूनच सुरुवात करू असा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.


## पुण्यात काय घडतंय...

### सहस्र शंकरगीता पारायण सोहळा




- **भक्तांसाठी सूचना :** सकाळी ११ पर्यंत उपस्थित राहणे बंधनकारक, महिलांनी लाल साडी अथवा लाल ड्रेस परिधान करावा, पुरुषांनी पांढरा ड्रेस परिधान करावा
- **अन्नदान सेवेसाठी संपर्क :** कन्हैय्या दुबे (मो. नं. ८९५६२७११८०) अथवा अनिल हगवणे (मो. नं. ९६२३०९७३७३)
- **भक्तांना हे आवश्यक :** स्वत:ची श्री शंकरगीता पोथी, बसण्याचे आसन, पोथीसाठी स्टॅन्ड अथवा पाट, एक नारळ
- **कुठे :** शिवछत्रपती मंगल कार्यालय, सर्व्हे नं. ४०, पुणे- सातारा रस्ता, शंकर महाराज चौक, धनकवडी
- **कधी :** जानेवारी २०२५, दुपारी १२ वाजता.

### तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा



- **लेखक :** सौरभ कर्डे ( पुस्तके: छत्रपती शिवराय आणि स्वराज्य, सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि वाघदरवाजा)
- **हस्ते :** मुरलीधर मोहोळ (केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री)
- **प्रमुख उपस्थिती :** शिवेंद्रसिंहराजे भोसले, भरत गोगावले, प्रविण तरडे, ह.भ. प. शिरीष महाराज देहूकर, विनीत कुबेर
- **आयोजक :** स्नेहल प्रकाशन ( रविंद्र घाटपांडे)
- **कुठे :** लेडी रमाबाई हॉल, स. प. महाविद्यालय, टिळक रोड
- **कधी : शनिवार दि. ४ जानेवारी, सांयकाळी ६**
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य

### मधु-स्मृती संगीत महोत्सव



- या महोत्सवातून रसिकांची नवीन वर्षाची सुरूवात सुरमयी होणार आहे.
- या महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ संगीत अभ्यासक डॉ. मुकुंद संगोराम यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.
- **समारोह सुरुवात :** राजस उपाध्ये
- **समारोहाची सांगता :** कलापिनी कोमकली
- **साथसंगत :** प्रणव गुरव (तबला), सुयोग कुंडलकर (संवादिनी)
- **कुठे :** श्री गणेश सभागृह, न्यु इंग्लिश स्कूल, टिळक रोड
- **कधी :** १ जानेवारी, सांयकाळी ५ वाजता
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य

## फुरसुंगीकरांवर जलसंकट; पाण्यासाठी 'दाहीदिशा'...!

### स्थानिकांचा आंदोलनाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्वयंभू फाउंडेशनने फुरसुंगी परिसरातील पाण्याच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. उरुळी देवाची, फुरसुंगी येथील कचरा डेपोमुळे येथील पाण्याचे स्रोत खराब झाले आहे. या डेपोलगतच पॉवर हाऊस परिसर असून, या भागातील लोकवस्ती दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, येथे पाण्याची टंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

फुरसुंगी, उरुळी देवाचीच्या कचरा डेपोमुळे बाधित झालेल्या पॉवर हाऊस परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. या भागात आठ ते दहा दिवसांतून एकदाच पाण्याचा टँकर येत असल्याने रहिवाशांचे हाल होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर या ठिकाणी महाराष्ट्र जल प्राधिकरण (एमजीपी) योजनेची जलवाहिनी टाकून पाणीपुरवठा करण्यात यावा; अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

**प्रश्न पाण्याचा**

पूर्वी महापालिकेकडून नागरिकांनी स्वखर्चाने पाण्याचे कनेक्शन घेतले होते. त्यावेळी पाणी योग्य दाबाने येत होते. मात्र त्यानंतर वस्ती वाढत गेली आणि कनेक्शनही वाढले. त्यामुळे या परिसरापर्यंत आता ते पाणी पोचत नाही.

या भागात जलवाहिन्यांचे जाळे आहे. मात्र, याला टेकडीवरून येणाऱ्या महाराष्ट्र जल प्रधिकरण योजनेचे स्वतंत्र कनेक्शन नाही. हे कनेक्शन दिल्यास येथील नागरिकांना पाणी मिळेल. मात्र कनेक्शन कधी मिळणार हा प्रश्न आहे. महाराष्ट्र जल प्राधिकरण (एमजीपी) योजनेची जलवाहिनी टाकून या भागाला पाणीपुरवठा करण्यात यावा; अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा भाजप मध्य हवेलीचे उपाध्यक्ष संतोष हरपळे यांनी दिला आहे.

"पॉवर हाऊस परिसरात टँकरद्वारे आठ ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा होतो. टँकरचे पाणी घराच्या बाहेर किंवा गल्लीतील रस्त्यांवर बॅरेलमध्ये भरून साठवले जाते. पुरशे पाणी मिळत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी परिसराला महाराष्ट्र जल प्राधिकरण योजनेचे पाणी मिळणे गरजेचे आहे."

— **संतोष हरपळे,** उपाध्यक्ष, भाजप मध्य हवेली

## श्रीपाल सबनीस हे मानवतावादी साहित्यिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** डॉ. श्रीपाल सबनीस हे संवेदनशील मन जपणारे परंतु त्याच वेळी चळवळी वृत्ती असणारे समाजाच्या वेदना, प्रश्नांना पाहून त्यांच्या परिहारार्थ झटणारे, दु:ख-दैन्याला वाचा फोडण्यासाठी कार्यरत असणारे साहित्यिक आहेत, अशा शब्दात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी डॉ. सबनीस यांचा गौरव केला.

दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'विवेकनिष्ठ प्रज्ञावंत डॉ. श्रीपाल सबनीस' या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. गौरवग्रंथाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी (भा. प्र. से.) यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. शिक्षणतज्ज्ञ अ. ल. देशमुख अध्यक्षपदी होते.

डॉ. श्रीपाल सबनीस, ललिता सबनीस, पुणे महापालिकेचे माजी अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे (भा. प्र. से.), ज्येष्ठ पत्रकार रामदास नेहुलकर, संस्कार मंदिर संस्थेच्या कला, वाणिज्य महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक स्वप्नील गायकवाड, गौरव ग्रंथांचे संपादक शिरीष चिटणीस, यशोदीप पब्लिकेशनच्या प्रा. रुपाली अवचरे, निखिल लंभाते मंचावर होते.

अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. देशमुख यांनी सबनीस या नावाची 'स' म्हणजे सर्वोत्तम साहित्यिक, 'ब' म्हणजे बहाद्दूर, 'नी' म्हणजे निरलस आणि निगर्वी तर 'स' म्हणजे समयसूचक आणि समीक्षक अशी फोड करत ते पुढे म्हणाले, साहित्याचे उत्तम समीक्षण व सत्य मांडणारे प्रेरणादायक साहित्यिक आहेत.

## ससून रुग्णालय पुणे येथे पेन्शन मेळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा कोषागार कार्यालयाकडून निवृत्तिवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांसाठी १६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० ते ५.३० वा. गांधी सभागृह, अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे येथे पेन्शन मेळावा आयोजित केला आहे.

या मेळाव्यामध्ये जिल्हा कोषागाराच्यावतीने निवृत्तिवेतन धारकांचे निवृत्तिवेतन विषयक प्रश्नांविषयी विचार विनिमय व शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. तरी पुणे जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्तीवेतनधारकांना पेन्शन मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाचे सहा. संचालक (निवृत्तीवेतन) यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

### प्रवाशांना या सेवेचा लाभ घेण्याचे रेल्वे प्रशासनाचे आवाहन

## पुण्यातून कुंभमेळाव्यासाठी विशेष रेल्वे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** केंद्र शासनाच्या देखो अपना देश या योजनेअंतर्गत भारत गौरव ही विशेष रेल्वेसेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेद्वारे देशभरातून आत्तापर्यंत ८६ रेल्वेगाड्या धावल्या आहेत. यामुळे अनेकांना आपल्या देशातील पर्यटनाचा आनंद घेता आला आहे. यातीलच आणखी एक विशेष रेल्वेगाडी येत्या १५ तारखेला पुणे रेल्वेस्थानकावरून कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेशासाठी सुटणार आहे.

त्याची माहिती देण्यासाठी पुणे रेल्वेस्थानकावर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक गुरूराज सोन्ना उपस्थित होते.रेल्वेच्या आयआरसीटीसीमार्फत भारत गौरवची विशेष रेल्वे पुण्याहून कुंभमेळ्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. पुढील महिन्यात १५ जानेवारीला रात्री १० वाजण्याच्या सुमारास ही गाडी पुण्यातून कुंभमेळ्यासाठी सुटणार आहे, अशी माहिती आयआरसीटीसीचे टुरिझम व्यवस्थापक सुभाष नायर यांनी दिली.

यावेळी नायर म्हणाले, पुण्यातून कुंभमेळ्यासाठी आम्ही विशेष गाडीचे नियोजन केले आहे. या गाडीमध्ये प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. गाडीमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही, जेवणाची व्यवस्था असणार आहे. तसेच, कुंभमेळ्याच्या ठिकाणी राहण्यासाठी टेंटसिटीची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. येथेही प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध असणार आहेत. ही गाडी पुणे, वाराणसी, प्रयागराज, आयोध्या, पुणे, अशी धावणार आहे. सात रात्र, आठ दिवसांचा हा प्रवास असणार आहे. या गाडीला ७ स्लीपर, ३ थर्ड एसी, १ सेकंड एसी आणि एक पेन्ट्री कार अशी डब्यांची रचना असणार आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन रेल्वे प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## Selected

## माळी महासंघातर्फे फुले दांपत्य सन्मान, विजय एकता महारॅली

**पुणे :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि ज्ञानजोती सावित्रीआई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडेवाडा येथे मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे भिडेवाडा येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी २०१४ पासून माळी महासंघातर्फे करण्यात येत होती. या मागणीला यश आले असून भिडे वाडा येथे राष्ट्रीय स्मारकाचे काम सुरू झाले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने या करीता ५० कोटीचा निधी देखील मंजूर केला आहे. त्यामुळे यावर्षीचा एक जानेवारी हा दिवस माळी समाज एकता विजय दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे.



या निमित्ताने फुले दांपत्याच्या या महान कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि भिडे वाडा येथे राष्ट्रीय स्मारक निर्माण करण्याच्या मागणीला मिळालेले यश साजरे करण्यासाठी माळी महासंघातर्फे बुधवार दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता दगडुशेठ गणपती मंदिरासमोरील भिडेवाडा ते गंज पेठेतील महात्मा फुलेवाडा (समता भूमी) अशी भव्य फुले दांपत्य सन्मान आणि विजय एकता महारॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती माळी महासंघाचे पुणे शहराध्यक्ष दीपक जगताप यांनी कळविली आहे.

दगडूशेठ गणपती मंदिरासमोरील भिडेवाडा येथून या रॅलीला प्रारंभ होणार असून समारोप सावित्रीबाई फुले स्मारक येथे होईल. या महारॅलीला महाराष्ट्रातून हजारो फुलेप्रेमी समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.

### बालिकेच्या पालकांचा शोध घेण्याचा पोलिसांचा प्रयत्न

## रेल्वे स्थानक परिसरात बेवारस बालिका सापडली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात एक वर्षाची बालिका बेवारस अवस्थेत सापडली. बालिकेला बेवारस अवस्थेत सोडून पसार झाल्याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

याबाबत पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे रेल्वे स्थानकातील पार्सल विभागाच्या परिसरात बेवारस अवस्थेत बालिका आढळून आली. बालिका रडत असल्याने पार्सल विभागातील कर्मचाऱ्यानी पालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पालकांचा शोध न लागल्याने त्यांनी याबाबतची माहिती बंडगार्डन पोलिसांना दिली. या घटनेची माहिती





मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी बालिकेला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. बालिकेच्या पालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

बालिकेला बेवारस अवस्थेत सोडून देणाऱ्या अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक कंचन काळे तपास करत आहेत. सिंहगड रस्ता भागात महिनाभरापूर्वी नवजात अर्भक बेवारस अवस्थेत सोडून देण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

## वाडेबोल्हाईतील जोगेश्वरी विद्यालयात स्टेम लॅबचे उद्‌घाटन

**पुणे :** वाडेबोल्हाई(ता.हवेली) येथे जोगेश्वरी माता माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्पिरुल फाऊंडेशन व ईवाय फाऊंडेशनच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या स्टेम लॅबचे उद्‌घाटन ईवाय फाऊंडेशनचे प्रमुख संतोष पाठक व आशिष श्रीवास्तव यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कार्यकारी संचालक कृष्णा भट्ट,स्पिरुल फाऊंडेशनच्या भावना,रुपाली ,श्वेता ,जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतिश धूमाळ ,सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील गरजू व वंचित विद्यार्थ्यांना स्टेम शिक्षणाचे लाभ देण्याचा स्पीरुल फाऊंडेशनचे इरादा आहे. याबरोबर विद्यालयास एक विज्ञान शिक्षकही फाऊंडेशनने उपलब्ध करून दिलेला आहे.याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक आर.बी.कोल्हे,राजेंद्र गायकवाड,गणेश फलके यांनी आभार मानले.

## लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यातून चंदनाच्या झाडांची चोरी

**पुणे :** वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यातून चंदनाची तीन झाडे कापून नेल्याची घटना उघडकीस आली. पसार झालेल्या चंदन चोरट्यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. याप्रकरणी चंदन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पांडीयराज मुरुगन (वय ३०) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लष्कर भागातील पूना क्लबजवळ डॉ. राजेंद्रसिंग मार्गावर वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचे बंगले आहेत. बंगले प्रशस्त आहेत. नाताळानिमित्त लष्करी अधिकारी बाहेरगावी गेले आहेत. दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री चोरटे बंगल्याच्या आवारात शिरले. चोरट्यांनी चंदनाची तीन झाडे कापून नेली. चंदनाची झाडे चोरीला गेल्याचा प्रकार लक्षात आल्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली, अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक डॉ. आरिफा मुजावर यांनी दिली. चोरट्यांचा पोलिसांकडून माग काढण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक मुजावर तपास करत आहेत.

## अंगणवाडी सेविकांना १६३ कोटी ४३ लाख निधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त यांच्या अधिनस्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते. अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या मानधन व प्रोत्साहन भत्त्यासाठी निधी अर्थसंकल्पित केलेला १६३ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यास राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने मान्यता दिली आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांचे मानधन नियमित अदा करणे शक्य व्हावे, याकरिता वित्तचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अंगणवाडी सेविकांच्या मानधनाची अर्थसंकल्पित केलेली रक्कम अपेक्षित केंद्रीय सहाय्य अप्राप्त असले तरी खर्च करण्यास विभागास अनुमती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे डिसेंबर २०२४ या महिन्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करण्याकरिताचा मार्ग मोकळा झाला आहे.

**निधी मान्यता**

### उस्ताद डागर बंधू यांच्या हस्ते एमआयटी सांस्कृतिक संध्याचे उद्‌घाटन

## संगीत साधनेतूनच ईश्वरीय दर्शन -प्रा. डॉ. विश्वनाथ कराड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** "सांस्कृतीक संध्या ही संगीताच्या साधनेतून शांतरसाची अनुभूती देणारी आहे. त्यातूनच प्रत्येकाला ईश्वरीय दर्शन घडते. वैश्विक भारतीय संस्कृती ही मानवतावादी आहे. आजच्या तरुण पिढीला भारतीय संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. त्यांच्यामध्ये भारतीय संस्कृती रुजविण्यासाठी भारतीय संगीत महत्वाची भूमिका बजावत आहे." असे विचार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारततर्फे लोणी काळभोर येथील विश्वराज बंधारा, विश्वशांती गुरूकुल, राजबाग येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय 'एमआयटी सांस्कृतिक संध्या' संगीत महोत्सावाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी उस्ताद नफीसुद्दीन डागर व उस्ताद अनीसुद्दीन डागर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पं. उध्दवबापू आपेगांवकर, विश्वशांती कला अकादमीचे महासचिव आदिनाथ मंगेशकर, दूरदर्शनेचे माजी संचालक डॉ. मुकेश शर्मा, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण आणि प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये उपस्थित होते.

डॉ. मुकेश शर्मा म्हणाले," भारतीय संस्कृती ही संस्कार देणारी आहे. नव वर्षात प्रवेश करतांना आपण संस्कृतीचे जतन करावे. संगीत साधना ही सर्व शास्त्रांमध्ये सर्वोच्च आहे.

या संगीत महोत्वसावाच्या उद्‌घाटनानंतर भारतरत्न श्रीमती लता मंगेशकर विश्वशांती संगीत अकादमीचे विद्यार्थ्यांनी शिव वंदना आणि गणेशवंदना सादर केली. प्राचार्या श्रेयसी पावगी यांचे गायन झाले. त्यानंतर ज्येष्ठ व्हायोलिन वादक तेजस उपाध्ये यांचे व्हायोलिनवादन झाले. तसेच ज्येष्ठ गायिका कल्याणी बोद्रें यांचे गायन आणि मा. उस्ताद नफीसुद्दीन डागर व उस्ताद अनीसुद्दीन डागर यांचे धृपद गायन झाले. यांना पखवाजवर पं. उद्धवबापू आपेगांवकर यांनी साथ संगत दिली.

आदिनाथ मंगेशकर यांनी स्वागतपर भाषण केले.

डॉ. संजय उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले.

"भारतीय युवक ज्या मार्गाने जात आहे तो योग्य नाही. येथील संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून ती विश्वशांतीचा मार्ग दाखविणारी आहे.यात नाद व ताल आहे. ही संगीत संध्या नसून संस्कृती आहे."

— **विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड,** संस्थापक अध्यक्ष एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी

#रा

# ‘पायलट’च्या स्वप्नासाठी ‘हवेत घिरट्या’...!

## हडपसर ‘ ग्लायडिंग सेंटर’ची वाटचालही खासगीकरणाच्या दिशेने


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वसामान्य आणि गोरगरीब तरुणांच्या आवाक्यात असलेल्या ‘ पायलट’ होण्याच्या स्वप्नांना आता काहीशी मुरड घालावी लागणार आहे; कारण वैमानिकाचा हा प्रवास आता काहीसा महागडा होणार आहे. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांच्या कालावधीत देशातील १८ पैकी तब्बल १७ ‘ ग्लायडिंग सेंटर’ बंद झाली एकमेव असलेल्या हडपसरच्या सेंटरचीही आता खासगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली आहे. त्यामुळे पायलटच्या स्वप्नासाठी आता सर्वसामान्य तरुणांना ‘ हवेत घिरट्या’ घालाव्या लागणार आहेत.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर हवाई क्षेत्रात प्रगती करण्यासाठी देशात १८ ठिकाणी ग्लायडिंग सेंटर सुरू झाली. हेतू हाच की वैमानिकाचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीलादेखील वैमानिकाच्या प्राथमिक शिक्षणाचा खर्च कमीत कमी व्हावा. काळाच्या ओघात १८ पैकी १७ ग्लायडिंग सेंटर बंद झाली. देशात आता हडपसर येथील एकमेव 'ग्लायडिंग सेंटर' सुरू आहे. याला सरकारचे अनुदान असल्याने वैमानिकाला 'ग्लायडिंग'च्या एक उड्डाणासाठी अवघे १८७ रुपये मोजावे लागतात.

वैमानिकाला व्यावसायिक परवाना मिळण्यापूर्वी त्यांना 'ग्लायडिंग'चे प्रशिक्षण आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थी वैमानिकांना 'ग्लायडिंग' उड्डाणाचा अनुभव असल्याने ते उत्कृष्ट वैमानिक बनतात. मात्र याच 'ग्लायडिंग सेंटर'चे भवितव्य अनिनिश्चिततेच्या अवकाशात घिरट्या मारत आहे. या ठिकाणी खासगी 'उड्डाण प्रशिक्षण संस्था' स्थापन करण्याच्या चर्चा आहेत. तसे झाल्यास येथे काही प्रमाणात सुविधा उपलब्ध होतील, मात्र त्या बदल्यात वैमानिक होण्याचे स्वप्न चांगलेच महागणार आहे.




### ग्लायडिंग सेंटर'चे महत्त्व

- ग्लायडिंग'च्या एका ट्रीपसाठी केवळ १८७ रुपयांचे शुल्क
- चांगला वैमानिक होण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण माफक दरात
- हवामानाच्या अभ्यासासोबतच आपत्कालीन परिस्थितीत काय केले पाहिजे, याचे प्रशिक्षण
- प्रशिक्षणार्थी वैमानिकांना लेखी, तोंडी अभ्यासक्रमासही प्रात्यक्षिकद्वारे प्रशिक्षण.
- ६ महिने ते २ वर्षांचा अभ्यासक्रम.
- उच्च दर्जाचे प्रशिक्षक.
- वैमानिकाचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी अवघा ३० ते ४० हजार रुपयांचा खर्च.

वैमानिकांना प्रशिक्षण देणारे देशातील एकमेव हडपसर येथील ग्लायडिंग सेंटरची खासगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरू होण्याच्या हालचाली वेगाने सुरू आहेत. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) हे सेंटर भारतीय विमानतळ प्राधिकरणाला ३१ डिसेंबरला हस्तांतरित होणार आहे.




त्यामुळे २५० एकर जागेत असलेल्या या सेंटरचे पुढे काय होणार, याचे उत्तर ना भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे आहे ना 'डीजीसीए'कडे. विमानतळ प्राधिकरणाच्या ताब्यात ही जागा आल्यावर त्याचे खासगीकरण होणार, अशी चर्चा आहे.तसे झाल्यास आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रशिक्षणार्थी वैमानिकाला उडण्याचे स्वप्न महागात पडू शकते. ग्लायडिंग सेंटरमधील एका उड्डाणाला अवघे १८७ रुपये आकारले जातात, तर उड्डाण प्रशिक्षण संस्थांमधील एका उड्डाणाला सुमारे १४ हजार रुपये आकारले जातात.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने ही जागा आपल्या ताब्यात आल्यावर तेथे काय करायचे हे अद्याप स्पष्ट केलेले नाही. मात्र विमानतळ प्राधिकरण या जागेचा व्यावसायिक वापर करण्याचा विचार करीत आहे. यात काही ऐरो स्पोर्टपासून ते हॉटेल, रेस्टॉरंटशिवाय एखादे संग्रहालय करण्याबाबतही विचार सुरू आहे. मात्र तसे झाल्यास येथे सुविधा उपलब्ध होतील, मात्र त्यासाठी जास्तीचे पैसेदेखील मोजावे लागतील. एखादे खासगी संस्थाकडून वैमानिकांना प्रशिक्षण मिळेल. मात्र त्यासाठी त्यांना आताच्या तुलनेत जास्तीची रक्कम मोजावी लागणार, हे निश्चित आहे.




"ग्लायडिंग सेंटर विमानतळ प्राधिकरणाच्या ताब्यात आल्यावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध केल्या जातील. लवकरच मी ग्लायडिंग सेंटरला भेट देणार आहे. तिथे काय करायचे हे अद्याप ठरलेले नाही. सर्वांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल."
**— मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री



भारतीय विमानतळ प्राधिकरण या जागेचा वापर पीपीपी तत्त्वानुसार करणार आहे. हे एक प्रकारचे खासगीकरणच आहे. ग्लायडिंग सेंटरमध्ये अगदी माफक दरात वैमानिकांना प्रशिक्षण दिले जाते. खासगीकरण झाल्यास हे प्रशिक्षण नक्कीच महाग होईल. म्हणून या निर्णयाला आमचा विरोध आहे. हा निर्णय रद्द व्हावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ६ हजार विद्यार्थ्यांनी पत्रे लिहिली आहेत."
**— योगेश ससाणे,** माजी नगरसेवक

ग्लायडिंग सेंटरमुळे हडपसर आणि परिसराला एक ओळख निर्माण झाली आहे, त्याशिवाय येथे बहुतांशी तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र; आता या ग्लायडिंग सेंटरचे खासगीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. त्यामुळे ही बाब निश्चितपणे चिंताजनक अशीच आहे,
**— संभाजीराव मोरे,** स्थानिक रहिवाशी हडपसर

# पदपथाच्या खडीमुळे नागरिकाचा ‘बळी’



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नगर रोडवरील आगाखान पॅलेस ते रामवाडी पोलिस चौकीदरम्यानच्या पदपथाचे काम काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही हे काम पूर्ण झाले नाही. हे काम रखडल्याने वाहनचालक आणि नागरिकांची गैरसोय होत आहे. गंभीर बाबही कि, रामवाडी ते आगाखान पॅलेस रस्त्यावर पदपथाच्या कामासाठी टाकलेल्या खडीमुळे दोन दिवसांपूर्वी अपघात झाला. या अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

प्रशासकीय

पदपथाच्या कामासाठी वाळू, विटा आणि खडी रस्त्यावर ठेवण्यात आली आहे. यामुळे वाहनांना अपघात होत आहेत. रात्री अंधारात रस्त्यावर ठेवलेल्या विटांना वाहने धडकत आहेत. तुकाईमाता सेवा ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद देवकर यांनी सांगितले की, महापालिका गेल्या सहा महिन्यांपेक्षा अधिक काळापासून पदपथाचे काम करत आहे.

सुरुवातीला हे काम वेगाने सुरू होते, परंतु नंतर कामाचा वेग मंदावला. या कामासाठी रस्त्यावर ठेवलेल्या साहित्यामुळे अपघात होत आहेत. या अपघातामध्ये एकाला जीव गमवावा लागला आहे. महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे जीवितहानी झाली आहे.

पदपथाचे काम लवकरात लवकर करण्याची मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेकदा केली आहे, तरीही पदपथाचे काम अद्याप पूर्ण झाले नाही. तसेच, रस्त्यावरील साहित्यदेखील उचलले नाही.

### रस्ता खोदला, खडी पसरली नागरिकांचे हाल

- आगाखान पॅलेस ते रामवाडी पोलिस चौकीदरम्यानचे काम संथगतीने सुरु असल्याची तक्रार करण्यात आली आहे.
- या खडीच्या पलीकडे दुरुस्तीचे कामच झाले नाही. या भागातील नागरिकांना याच खडीतून मार्गक्रमण करावे लागले. अनेकदा गाड्या घसरून पडल्या, लहान मुले, महिला, वृद्धांना प्रचंड त्रास झाला तरी बांधकाम विभागाने दुरुस्तीचे काम प्रलंबित ठेवले.
- महापालिकापदपथाचे काम निधीअभावी रखडले होते, ते त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. हे काम लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावरील साहित्य उचलले जाईल. असे आश्वासन पाठ विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आले आहे.

# आषाढी वारीच्या धर्तीवर देणार सुविधा

## विजयस्तंभ अभिवादन सोहळयासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ‘कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी आषाढी वारी सोहळ्याच्या धर्तीवर सुविधा पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणांचे चोख नियोजन करण्यात आले असून, यंत्रणा सज्ज झाली आहे,’ अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सोमवारी दिली.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी दरवर्षी लाखो अनुयायी येत असून, गेल्या काही वर्षांपासून अनुयायांच्या संख्येत वाढ होत आहे. मंगळवार (३१ डिसेंबर) आणि बुधवार (एक जानेवारी) असे दोन दिवस होणाऱ्या सोहळ्यासाठी जवळपास आठ ते दहा लाख अनुयायी येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून सुविधांचे नियोजन करण्यात आल्याचे डॉ. दिवसे यांनी सांगितले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील उपस्थित होत्या.

डॉ. दिवसे म्हणाले, ‘दर वर्षी आषाढी वारी सोहळ्यासाठी वारकरी आणि भाविकांच्या दृष्टीने ज्या सुविधा पुरविल्या जातात, त्याच धर्तीवर यंदाच्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात अनुयायांसाठी सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी), राज्य परिवहन महामंडळ (एसटी), अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), समाजकल्याण विभाग, महावितरण, आरोग्य विभाग, माहिती व जनसंपर्क कार्यालय यांच्यासह विविध विभागांच्या साहाय्याने सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### ‘आरोग्यदूत’द्वारे तत्काळ आरोग्य सेवा

- यंदाच्या सोहळ्यात अनुयायांच्या आरोग्याच्या दृष्टीने ‘आरोग्यदूत’ ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी दुचाकीवरील आरोग्यदूत तत्काळ आरोग्य सेवा देतील, तर आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी कक्ष (ओपीडी), २३ आरोग्य केंद्रे, ४३ रुग्णवाहिका विविध ठिकाणी असतील. तसेच महिला व स्तनदा मातांच्या अनुषंगाने ९ हिरकणी कक्ष आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७ ठिकाणी निवारा केंद्र उभारणी करण्यात आली आहे.



अनुयायांना विजयस्तंभाच्या परिसरापर्यंत प्रवास करण्यासाठी आणि पुन्हा नियोजितस्थळी जाण्यासाठीची वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा या दोन गोष्टींचे नियोजन करण्यात आले आहे. बुधवारी ५७५, तर गुरुवारी एक हजार ७० मोफत बस ठेवण्यात आल्या आहेत. वाहनांसाठी ४५ ठिकाणी वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. तसेच बसचे मार्ग निश्चित करण्यात आले असून, नियंत्रण कक्ष तयार करण्यात येणार आहे. महिला सुरक्षितता अनुषंगाने प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही कार्यरत करण्यात आले आहेत."
**— डॉ. सुहास दिवसे,** जिल्हाधिकारी, पुणे

# स्मिता पाटील आंतराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जगभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत असलेल्या आणि जागतिक पातळीवर प्रतिष्ठेचा समजला जाणाऱ्या ११ व्या स्मिता पाटील आंतराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचे आयोजन आरोग्य सेनेतर्फे ४ आणि ५ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, लॉ कॉलेज रोड, पुणे येथे आयोजित या महोत्सवात ४ जानेवारी रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत आणि दिनांक ५ जानेवारी रोजी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ७.०० या वेळेत अंतिम फेरीसाठी (फायनल स्क्रीनिंग) निवडण्यात आलेले सुमारे ४१ लघुपट पाहण्याची संधी



रसिकांना मिळणार आहे. रसिकांसाठी विनामूल्य खुल्या असलेल्या या महोत्सवात यावर्षी भारतासहित जगातील एकूण २० देशांतून १७५ पेक्षा अधिक लघुपट दाखल झाले. या चित्रपट महोत्सवाला जगभरातील आघाडीच्या चित्रपट निर्मात्यांची मान्यता मिळालेली असल्यामुळे अत्यंत दर्जेदार आणि अनेक प्रतिष्ठीत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवले गेलेले व पुरस्कार मिळालेले लघुपट महोत्सवासाठी दाखल झाले. यांत भारता व्यतिरिक्त अमेरिका, इंग्लंड, इराण, स्वित्झर्लंड, इस्टोनिया, झेक रिपब्लिक, इजिप्त, लेबॉनन, कझागिस्तान, इंडोनेशिया, फिलीपाईन्स, घाना, फ्रांस, स्पेन, चीन, मलेशिया, इटली, ब्राझिल, इ. देशांतील लघुपट आहेत.

सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक गगनविहारी बोराटे (सूर्योदय, लाल सलाम या आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांचे दिग्दर्शक), अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार आणि यावर्षीचा ‘रजत कमल’ हा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक सोहिल वैद्य, प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माते-लेखक देवशीष मखीजा आणि ज्युलियट ग्रँडमॉट हे बाफ्ता पुरस्कार विजेते, कान महोत्सव सन्मानित फ्रेंच दिग्दर्शक हे यावर्षी महोत्सवाचे मानद ज्यूरी म्हणून काम पहात आहेत.

# गो-संवर्धनासाठी ओंकारेश्वराची महाआरती !

## राज्यातील गो-रक्षकांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि गोरक्षकांच्या मागण्यांसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत. तसेच, या पुढील काळातही गोसंवर्धनासाठी शेती-माती-संस्कृतीसाठी कटिबद्ध आहोत. कायदा असतानाही गोहत्या केली जात असेल, तर भगवाधारी महायुतीच्या सरकारमध्ये कुणाचेही लांगुलचालून करु देणार नाही. कायदा प्रत्येकाला पाळावा लागेल, असा इशारा राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी दिला आहे.

महाराष्ट्रात महादेवाच्या नंदींचे व गोमातेच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवून शेतकरी समृद्ध व्हावेत. यासाठी पुण्याचे आराध्य दैवत भगवान श्री. ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाआरती करण्यात आली.

राज्यातील गोरक्षक, गोभक्त आणि गोसेवकांच्या वतीने महादेवासमोर गोरक्षण व गोसंवर्धनासाठी संकल्प केला. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार महेश लांडगे आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये महाआरती संपन्न झाली. महाआरतीचे नियोजन गोरक्षक शिवशंकर स्वामी, सोमनाथ भोसले यांनी केले होते.



आमची सगळी मुलं गोरक्षणासाठी दिवस रात्र पळत आहेत. हिंदुत्वाचा विचार जपत गो-सेवक नि:स्वार्थपणे काम करीत आहेत. हिंदू धर्मातील आठरा पगड जाती, बारा बलुतेदार या सर्वांना सोबत घेवून देव-देश अन् धर्म रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. गोमातेच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालून काम करणारे गोरक्षक यांच्या पाठीशी महायुती सरकार राहणार आहे. "
**— महेश लांडगे,** आमदार, भाजपा.

### महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार- नितेश राणे

- कॅबिनेट मंत्री नितेश राणे म्हणाले की, गोमातेकडे कुणीही वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही. हिंदू म्हणून थाटात फिरा. कुणाला घाबरण्याची आवश्यकता नाही. जो अधिकारी गाईच्या कत्तलीला प्रोत्साहन देत असेल, त्याचे फक्त नाव द्या. गाईला राज्यमातेचा दर्जा देणारे महायुती सरकार आहे. गोरक्षकांनी आता चिंता करण्याची आवश्यकता नाही. गोहत्या बंदीचा कायदा आणखी कडक करण्यासाठीसुद्धा आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार आहोत. आगामी काळात महाराष्ट्राला कत्तलखानामुक्त करणार आहोत, असेही नितेश राणे यांनी म्हटले आहे.

## महाआरती श्री ओंकारेश्वराची...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे** महाराष्ट्रात महादेवाच्या नंदींचे व गोमातेच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवून शेतकरी समृद्ध व्हावेत. यासाठी पुण्याचे आराध्य दैवत भगवान श्री. ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरात महाआरती करण्यात आली. भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रंगीबेरंगी फुग्यांमुळे प्रदुषणात भर; बंदीची केली मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या पुण्यात वाढदिवस, नवीन वर्ष तसेच कोणताही इव्हेंट असला की आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडले जाते. हे फुगे नगरिकांची डोकेदुखी ठरू लागली आहे. पुण्यात कोणतेही सण, उत्सव असो जल्लोषात साजरे केले जाते.

प्रदूषण

फुग्यांमुळे पर्यावरण दूषित होत असल्याने शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिकांनी यावर बंदी घालण्याची मागणी पालिकेकडे केली आहे. या सोबतच जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे देखील लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. जे फुगे लेटेक्स आणि मायलर (फॉइल-लेपित) पासून बनविलेले असतात त्यामुळे पर्यावरणाला सर्वाधिक हानी पोहोचते. लेटेक्स फुगे जमिनीत विघटित होत असतांना अनेक घातक रसायने जमिनीत सोडतात. तसेच हे फुगे विघटित होण्यास अनेक वर्षे लागतात. जेव्हा फुगे हवेत सोडले जातात, तेव्हा ते शेवटी जमिनीवर पडून पाण्यात, नद्यांमध्ये पडतात. त्यामुळे जल प्रदूषण देखील होते. मायलर फुगे वीजवाहिन्यांच्या संपर्कात आल्यास वीज पुरवठा खंडित होऊ शकतो आणि आग लागू शकते. मायलर फुगे वन्यजीवांना, विशेषत: पक्ष्यांना देखील हानी पोहोचवू शकतात. या प्रकारचे फुगे विघटित होण्यास शेकडो वर्षे लागू शकतात आणि कचरा व प्रदूषणास कारणीभूत ठरू शकतात.

# महावितरणच्या सौर पंपाला मिळतेय ‘ महाउर्जा’....!

**उर्जा**

**गेल्या काही वर्षांच्या कालावधीत निसर्गाने कृपा केल्याने शेतपिकांना मुबलक पाणी मिळत आहे, त्यातूनच विहिरी अथवा नदीतील पाण्याच्या उपस्यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वीजेचा वापर होत असून उपलब्ध वीज आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसविताना महावितरण प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे, त्यावर महावितरण प्रशासनाने सौर पंपाचा जालिम उपाय शोधला आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के, तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेच्या अंमलबजावणीला गती आली आहे. डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आले आहेत, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी दिली.



राज्यामध्ये महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दि. २६ पर्यंत २१,९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले. अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. राज्यात २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनेत १,८०,००० सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, या वर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १,५८,००० सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे.

सौर उर्जा ही शेतीसाठी अतिशय वरदान ठरत आहे ही बाब महावितरण प्रशासनाच्या वतीने शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आम्हाला अपेक्षित यश आले आहे, सध्या याची मागणी वाढत असल्याने त्याचेच हे फलित आहे.
**—राजेंद्र पवार ,** मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे. या योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते. त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे.

# कॉमन मॅनने दिला 'दारू नको दूध प्या' संदेश

## आनंदवन व्यसनमुक्ती केंद्र व भाजपाच्या वतीने आयोजन : दूध वाटप करून दिला संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दारू नको दूध प्या, मानवतेचा बोध घ्या... बाटली फोडा, दूध जोडा... दारुचा पाश जीवनाचा नाश... दारु सोडा आनंद जोडा... अशा संदेश देत कॉमन मॅन च्या साथीने तरुणाईने व्यसनमुक्तीचा संदेश दिला. नववर्षाच्या पूर्वसंध्येला आनंदवन व्यसनमुक्ती केंद्र व महाविद्यालयीन तरुणाईने जनजागृती केली. नववर्षाचे स्वागत मद्यधुंद होऊन न करता चांगले विचार आणि संकल्प ठेवून करा, असे सांगत दूध वाटप करण्यात आले.

डेक्कन जवळील गुडलक चौक येथे आनंदवन व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रातर्फे दारू नको, दूध प्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमाला कात्रज डेअरी, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स आणि आपलं फाऊंडेशन यांनी सहकार्य केले. यावेळी केंद्राचे अध्यक्ष डॉ.अजय दुधाणे, दत्तात्रय सोनार, ऋषिकेश इंगळे,कृष्णा बाटाणे, विशाल शिंदे, सागर कांबळे, राहुल बॉम्बे, अनिरुद्ध आळंदी, संजय हिरवे, प्रकाश पवार, अमित शिंदे, कात्रज डेअरीचे चेअरमन बापू पासलकर, पांडुरंग कोंढाळकर, कुमार मारणे, मनोज लिमये, आपलं फाउंडेशनचे मनीष भोसले, अशोक टिहाळे, दीप गाठोळे, सिद्धी सावंत, एकता बोंबले, समृद्धी मैत्री, मराठवाडा वाणिज्य महाविद्यालयाचे दशरथ गावीत, प्रा. पुनम शिंदे, सिंहगड विधी महाविद्यालयाचे नितीन भंडारी, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे डॉ. गजेंद्र ढमाले यावेळी उपस्थित होते.



**पुणे :** डेक्कन जवळील गुडलक चौकातील कलाकार कट्टा येथे आनंदवन व्यसनमुक्ती व पुर्नवसन केंद्रातर्फे दारू नको, दूध प्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमाला कात्रज डेअरी, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स आणि आपलं फाऊंडेशन यांनी सहकार्य केले. उपक्रमात दुध वाटप करताना विद्यार्थी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

नववर्षाच्या स्वागताला सगळीकडे मोठ्या उत्साहात सेलिब्रेशन साजरे केले जात आहे. आज सेलिब्रेशन करताना अनेकांकडून दारू पिण्यास पसंती दिली जाते, परंतु दारूचा एक प्याला पुढे संपूर्ण आयुष्य उध्वस्त करू शकतो, त्यामुळे 'दारू नको तर दूध प्या' हा संदेश देत आमदार हेमंत रासने यांच्या नेतृत्वात कसबा मतदारसंघात अनोखा उपक्रम राबवण्यात आला. दारू नको दूध प्या जीवनाचा आनंद घ्या म्हणत पुणेकरांना दुधाचे वाटप देखील करण्यात आले.

आमदार हेमंत रासने आणि भाजपा कसबा मतदारसंघ यांच्या माध्यमातून अलका टॉकीज चौकामध्ये 'दारू नको तर दूध प्या' हा उपक्रम राबवला गेला. यावेळी "दारूची साथ सोडा, आनंदाची वाट जोडा, दुधात ताकद, दारूत विनाश, शरीराची काळजी घ्या, व्यसनमुक्त जीवन जगा आणि दारू नको दूध प्या जीवनाचा आनंद घ्या" अशा आशयाचे कार्यकर्त्यांनी हातात घेतलेले बॅनर्स सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

यावेळी मतदारसंघाध्यक्ष राजेंद्र काकडे, सरचिटणीस अमित कंक, प्रणव गंजीवाले, राजू परदेशी, उमेश अण्णा चव्हाण, चंद्रकांत पोटे, प्रशांत सुर्वे, वैशालीताई नाईक राणीताई कांबळे, शहर सरचिटणीस प्रमोद कोंढरे, नगरसेवक राजेश येनपुरे, अजय खेडेकर, योगेश समेळ, आरती कोंढर यांच्यासह मतदारसंघातील सर्व माजी नगरसेवक , पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



नवीन वर्षाचा पहिला दिवस हा अतिशय महत्त्वाचा असतो. या दिवसाची सुरुवात चांगले संकल्प करून करायला हवी. परंतु व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण बघता तरुणाई नवीन वर्षाचे स्वागत ही दारू पिऊन करताना दिसते. यामुळे व्यसनाधीनता वाढत जाते. नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या पद्धतीने करावी आणि व्यसनाधीनतेची झालर नववर्षाच्या पूर्वसंध्येला नसावी यासाठी दूधाचे वाटप करून दारू नको दूध प्या हा उपक्रम राबविला जातो.

**— हेमंत रासने,**
आमदार, कसबा



थर्टी फर्स्टच्या नावाखाली शहरात तरुणाईची दरवर्षीच हुल्लडबाजी होत असते, त्याचा त्रास अन्य नागरिकांना सहन करावा लागत असून त्याचा विपरीत परिणाम तरुण पिढी आणि लहान मुलांवर होत आहे, त्यामुळे अशा संस्कृतीला पायबंद घालणे हे प्रत्येक जागरुक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठीच भाजपाच्या वतीने ही मोहिम हाती घेण्यात आली असून आगामी काळातही ही मोहिम अशीच राबविण्यात येणार आहे.—

**डॉ. अजय दुधाणे,**
अध्यक्ष आनंदवन व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र

# मोफत कायदा मार्गदर्शन शिबिरातून जनजागृती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशन संचालित सूर्यदत्त विधी महाविद्यालयातर्फे गावकऱ्यांमध्ये कायदेशीर हक्कांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी, स्थानिक कायदेशीर तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आणि रहिवाशांना कायदेशीर सहाय्य देण्यासाठी भूगाव ग्रामपंचायत येथे मोफत कायदेशीर मदत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भूगाव ग्रामपंचायतचे जे. एम. भोंग, सूर्यदत्त विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मणियार, विधी सहाय्य समितीचे सदस्य ॲड. कलिश गोळे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मोनिका सेहरावत आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. विजयदीप मुंजनकर आदी उपस्थित होते.

जनजागृती

या शिबिरामध्ये ५० हुन अधिक विद्यार्थी-शिक्षक सहभागी झाले होते. कायद्यातील तज्ज्ञांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी वैयक्तिक पातळीवर प्रश्नांची उत्तरे देत, गावकऱ्यांना मोफत कायदेशीर सल्ला दिला. चर्चा केलेल्या सामान्य समस्यांमध्ये जमीन विवाद, कौटुंबिक संघर्ष आणि भाडेकरू-मालक मतभेद यांचा समावेश होता. या शिबिरात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांसह गावातील अनेक नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी ग्रामीण समुदाय आणि कायदेशीर व्यवस्था यांच्यातील दरी कमी करण्यासाठी भुगाव गावातील कायदेशीर मदत शिबिर हे एक महत्वाचे पाऊल असल्याचे नमूद केले.

### असा मिळाला प्रतिसाद....

- विद्यार्थी, विद्यार्थीनींचा लक्षणीय सहभाग
- ग्रामस्थांना मोफत कायदेशीर सल्ला
- भाडेकरु आणि मालक यांच्यात सुसंवाद
- ज्येष्ठ नागरिक, तरुणांचा प्रतिसाद
- महिला आणि तरुणीही सहभागी
- दरी कमी करण्यासाठी 'सूर्यदत्त' चा महत्वपूर्ण पुढाकार


# शरद पोंक्षे रंगमंचावर पहिल्यांदाच 'ब्लँक'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अभिनेता शरद पोंक्षे यांना काहीच आठवत नसल्याने नुकताच नाटकाचा एक प्रयोग रद्द करावा लागला. यावर रसिकांनी मात्र नाराजी न दाखवता आम्ही प्रयोगाला पुन्हा येऊ, असे सांगितले. हा प्रकार बालगंधर्व रंगमंदिरात घडला. पोंक्षे यांना काहीच आठवत नसल्याने त्यांची तब्येत बरी नसल्याचे समोर आले. आतापर्यंतच्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच घडल्याचे ते बोलले. रसिक हो...मी पुरता ब्लँक झालोय, मला काहीच आठवत नाहीये, मला जरा वेळ द्याल का?' अशी विनंती नाटक सुरू असताना रंगमंचावर अभिनेते शरद पोंक्षे यांनी केली. त्याला रसिकांनी टाळ्या वाजवून संमती दिली.

जयवंत दळवी यांच्या लेखणीतून साकारलेली 'पुरुष' ही कलाकृती सुमारे चाळीस वर्षांनंतर नाट्यप्रेमींना पुन्हा एकदा अनुभवायला मिळत आहे. या नाटकात स्पृहा जोशी, अविनाश नारकर, अनुपमा ताकमोगे, निषाद भोईर, नेहा परांजपे आणि शरद पोंक्षे प्रमुख भूमिकेत आहेत. नाटक रंगात आलं असताना एका प्रवेशानंतर अभिनेते शरद पोंक्षे अचानक सर्वकाही विसरले, ब्लँक झाले आणि थांबले.

रसिक प्रेक्षकांनी नाट्यगृह गच्च भरलेलं असताना मंचावर असलेले पोंक्षे सर्वकाही विसरून गेले. ते म्हणाले, "रसिकहो.. मी पुरता ब्लँक झालोय. मला काहीच आठवत नाहीये. मला जरा वेळ द्याल का?" त्यावेळी सगळ्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला आणि त्यांना संमती दिली. पुढे प्रयोग रद्द



झाल्याचं घोषित केलं गेलं. पण प्रेक्षकांच्या विनंतीला मान देऊन पोंक्षे पुन्हा मंचावर आले. ४० वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच असं झाल्यामुळे पोंक्षेंना गहिवरून आलं होतं. पण प्रेक्षकांनी त्यांना थांबवलं आणि आतापर्यंतचा प्रयोग उत्तम झाल्याचं सांगत यापुढचे सगळे प्रयोग यशस्वी होतील अशा सदिच्छाही दिल्या.

सोमवारी दुपारी १२:३० वाजता पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात "पुरुष" च्या प्रयोगाला गेलो होतो. पहिला अंक उत्तम झाला, पण दुसऱ्या महत्त्वाच्या सीनची सुरुवात झाली आणि शरद पोंक्षे नुसते प्रेक्षकांकडे बघत होते. आधी वाटलं कोणीतरी मोबाइलचा आवाज किंवा फोटो काढतंय. पण नंतर ते म्हणाले रसिक प्रेक्षकहो.. मी पूर्ण ब्लँक झालोय, मला काहीही आठवत नाहीये, २ मिनिटं थांबू का? प्रेक्षक म्हणाले, आम्ही तुमचे फॅन आहोत, तुम्ही वेळ घ्या, मग सगळे लाइट्स बंद केले, ते आत विंगेत गेले, २ मिनिटांऐवजी ५ मिनिटं झाली, १०/१५ मिनिटं झाली. मग दिग्दर्शकांनी स्टेजवर येऊन सांगितलं की, त्यांना थोडी विश्रांती घेतली की बरं वाटेल तेव्हा आम्ही आता मध्यंतर घेतोय.

## वाल्मिक कराडच्या साथीदारांची चौकशीची शिवसेनेची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमधील मुख्य आरोपी असलेला वाल्मिक कराड हा २२ दिवस महाराष्ट्र सरकारला , मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस प्रशासनाला गुंगारा देत फिरत होता, त्यावेळी तो मागील बरेच दिवस पुण्यात असल्याचे त्याच्या सोबत असलेल्या बिडच्या नगरसेवकाच्या मीडियासोबत स्टेटमेंट वरून सिद्ध झाले आहे, ह्याचा अर्थ आरोपी वाल्मिक कराड हा पुण्यात वास्तव्यास होता. पुण्यात त्याला कोणी मदत केली ह्याची पण सखोल चौकशी व्हावी आणि त्यांनाही सदर विषयात सहआरोपी करण्यात यावे. महाराष्ट्रातील गुन्हेगारी समूळ नष्ट व्हावी यासाठी आमचा नेहमी प्रयत्न राहील असे शहरप्रमुख संजय मोरे म्हणाले .

# मंत्री नितेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल करा -रोहन सुरवसे पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याचे मत्स्य आणि बंदर मंत्री नितेश राणे यांनी सासवड येथे आयोजित एका कार्यक्रमात लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी व वायनाडच्या खासदार, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांच्याबाबत बोलताना केरळ या राज्याची तुलना थेट पाकिस्तानशी केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

केरळ हे मिनी पाकिस्तान असून खासदार राहुल गांधी आणि खासदार प्रियांका गांधी तिथून निवडून येतात. केरळ मधील अतिरेकी राहुल गांधी व प्रियांका गांधी यांना मतदान करतात. अतिरेक्यांच्या पाठिंब्यामुळे गांधी खासदार होतात, असे वादग्रस्त वक्तव्य नितेश राणे यांनी केले आहे. राणेंच्या या वक्तव्यावरुन काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

मंत्री नितेश राणे यांच्यावर प्रक्षोभक वक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करा अश्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना दिले. याप्रसंगी पुणे शहर व जिल्हा विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस कृष्णा साठे, काँग्रेस कार्यकर्ते सचिन मोरे, बाबा मिसाळ हे उपस्थित होते. नितेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यासंदर्भात रोहन सुरवसे पाटील म्हणाले की, देशाची एकता, सहिष्णूता आणि अखंडतेला बाधा निर्माण करणारे विभाजनकारी, धार्मिक द्वेष पसरवणारे प्रक्षोभक व चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्या, संविधानचा अपमान करणाऱ्या नितेश राणे यांचा आम्ही जाहीर निषेध करतो. राणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी आम्ही महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कडून केली आहे.

नितेश राणे यांनी लोकसभा विरोधी पक्षनेते मा.राहुल गांधी, खासदार मा. प्रियांका गांधी तसेच त्यांना निवडून देणाऱ्या समस्त जनतेचा आणि केरळ या राज्याचा अपमान केला आहे. अशी प्रतिक्रिया पुणे शहर व जिल्हा विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस कृष्णा साठे यांनी दिली.

# नुमवीय १९६४ माजी विद्यार्थी संम्मेलन संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नुमवीय १९६४ च्या माजी विद्यार्थ्यांचे संम्मेलन आज दादासाहेब दरोडे हॉल, येथे संपन्न झाले. नु.म.वि.प्रशालेतील माजी अध्यापक ज.गं.फगरे, प्रसिद्ध साहित्यिक डॉ.न.म.जोशी, सत्कवी प्रा.सू..द.वैद्य प्रसिध्द लेखक अभिजित जोग, अभिनेत्री नंदिनी अ.जोग आणि पंचाहत्तरी ओलांडलेले सुमारेशंभरहून आधिक माजी विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबिय कार्यक्रमास उपस्थित होते. अरुण कुदळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दादासाहेब दरोडे हॉल, महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज,वसतिगृह आणि संस्था या विषयी संपूर्ण माहिती सांगीतली. बिहारचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते उज्जैन येथे गौरविले गेलेले गणेश गुर्जर व शुभदा गुर्जर यांचा नुमवीय ६४ संघटने तर्फे या वेळ विशेष सत्कार करण्यात आला.तसेच १८ नुमवीय ६४ माजी विद्यार्थ्यांचा वाढदिवस या कार्यक्रमात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अभिजित जोग म्हणाले " आता भारताचा इतिहास नव्याने लिहीणे आवश्यक झाले आहे.बाहेरुन आलेल्या आर्यांच्या आक्रमणाचा सिद्धांत मांडून इंग्रजांनी भारतात जास्तीत जास्त फुट पाडण्याचा प्रयत्न केला. हा सिद्धांत पूणर्पणे चुकीचा असून त्यासाठी एकही ठोस पुरावा उपलब्ध नाही.भारताचा इतिहास हा पराभवांचा इतिहास आहे हे आजवर करण्यात आलेले प्रतिपादन चुकीचे असून खरे तर तो दीर्घ कठोर संघर्षाचा इतिहास आहे. डॉ.न.म. जोशी म्हणाले "इतिहासाचे लेखन करतांना लेखक व संशोधक स्वत:च्या दृष्टीकोनातून लेखन करतात.

सांस्कृतिक

त्या मुळे इतिहास एकांगी होण्याची शक्यता असते. त्याच प्रमाणे इतिहासाची नवीन उपलब्ध साधने ,नवे पुरावे हाती लागे पर्यंत सांप्रतचा इतिहास खरा मानला जातो. इतिहासातील नव्या पुराव्यांची ,संशोधनाची काळजीपूर्वक नोंद घेऊन घेऊन इतिहासाचे वास्तविक रुप स्विकारले पाहिजे."प्रा.सू.द.वैद्य यांनी अजूनही नियमित एकत्र येणाऱ्या आणि शिक्षकांना आठवणीने बोलावणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीत आशिर्वाद दिले.कार्यक्रमाचे सूत्र संचलन सुरेश तपस्वी यांनी केले आणि आभार प्रदर्शन सुहास शाळिग्राम यांनी केले.

## जलमित्र पुरस्कार २०२४

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे** महाराष्ट्र विकास केंद्र या संस्थेच्या वतीन दिला जाणारा जलमित्र पुरस्कार या वर्षी मध्य प्रदेश राज्यातील आदिवासी भागात जलक्षेत्रात काम करणारे निलेश देसाई यांना जलक्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा समन्यायी पाणी हक्क परिषदेचे अध्यक्ष व भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# २०२४ चा जलमित्र पुरस्कार निलेश देसाई यांना प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशभर पाणी विषयक वेगवेगळ्या स्वरूपाचे प्रश्न निर्माण होत असताना त्यावर शासन स्तरावर तसेच विविध सामाजिक संस्था उपाय शोधून ते अंमलात आणण्याचे प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रात पाणी प्रश्नावर काम व्हायचं असेल तर पाण्याच्या विविध पैलूंबद्दल समाजात साक्षरता निर्माण व्हायला हवी असे प्रतिपादन यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी केले.

महाराष्ट्र विकास केंद्र या संस्थेच्या वतीन दिला जाणारा जलमित्र पुरस्कार या वर्षी मध्य प्रदेश राज्यातील झाबुआ जिह्यासह आदिवासी भागात जलक्षेत्रात काम करणारे संपर्क समाज सेवी संस्थेचेसंचालक .निलेश देसाई यांना जलक्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा समन्यायी पाणी हक्क परिषदेचे अध्यक्ष व भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. जलमित्र पुरस्कार सोहळ्याचे हे १२ वे वर्ष असल्याने संस्थेच्या सातत्यपुर्ण कामाबद्दल देखील गायकवाड यांनी गौरवोदगार काढले.

यावेळी पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी कुलगुरू नांदेड तथा निवृत्त संचालक उच्च शिक्षण विभाग मा.डॉ.के.एम.कुलकर्णी, निवृत्त सचिव जलसंपदा विभाग मा.श्री. अविनाश सुर्वे, ज्येष्ठ कृषी तज्ञ निवृत्त प्राचार्य मा.डॉ.मुकुंदराव गायकवाड यांनी जलक्षेत्रातील आपले अनुभव सांगितले. माजी रेल्वे मंत्री मा.डॉ. सुरेश प्रभु यांचा शुभसंदेश देखील वाचण्यात आला.

# विद्यापीठाच्या 'त्या' निर्णयाविरोधात विद्यार्थी संघटनांची नाराजी

आंदोलन

**पुणे विद्यापीठात पूर्वपरवानगी न घेता सभा, बैठका, कार्यक्रम घेतल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे जारी केलेल्या या निर्णयाविरोधात विद्यार्थी संघटनांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर, अहिल्यानगर उपकेंद्र आणि नाशिक उपकेंद्र येथे कोणत्याही स्वरूपाच्या सभा, बैठका, आंदोलने आणि तत्सम कार्यक्रम करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाची किमान आठ दिवस आधी परवानगी घेणे आवश्यक करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठात विद्यार्थी संघटना, प्राध्यापक, कर्मचारी संघटनांकडून विविध विषयांवर आंदोलने केली जातात, तसेच सभा, बैठका घेतल्या



जातात. गेल्या काही काळात विद्यापीठात अनुचित प्रकार घडले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, विद्यापीठात होणाऱ्या बैठका, सभा, आंदोलने या संदर्भात व्यवस्थापन परिषदेमध्ये चर्चा करण्यात आली. त्यानंतर आता पूर्वपरवानगी घेण्याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.


डॉ. भाकरे म्हणाल्या,'आंदोलने, सभा, बैठकांसाठी विद्यापीठाने पूर्वपरवानगी आवश्यक करणे वैध ठरत असल्याचा निर्णय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका प्रकरणात दिला आहे. तसेच आंदोलन करण्यापूर्वी त्याबाबत लेखी कल्पना दिल्यास प्रश्न काय आहे हे समजून घेऊन तो सोडवण्यासाठीच्या उपाययोजना करणे शक्य होऊ शकते.' गेल्या वर्षीही विद्यापीठाने विद्यार्थी संघटनांच्या आंदोलनांसाठी मार्गदर्शक कार्यपद्धती प्रस्तावित केली होती. त्याचा मसुदा जाहीर करण्यात आल्यानंतर माजी अधिसभा सदस्य डॉ. धनंजय कुलकर्णी यांनी या कार्यपद्धतीला विरोध केला होता. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थी संघटनांशी चर्चा केली. मात्र, या कार्यपद्धतीला तीव्र विरोध झाल्यामुळे विद्यापीठाला ती कार्यपद्धती स्थगित करावी लागली.

**आंदोलनासाठी आठ दिवस आधी परवानगीची अट लादणे हे विद्यार्थ्यांच्या हक्कांचे उल्लंघन आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, हुकूमशाही भूमिका राबवणे, विद्यार्थ्यांचे हक्क दडपणे सहन केले जाणार नाही."**
**—कुलदिप आंबेकर,**
स्टुडंट हेल्पिंग हँड ११

विद्यापीठाच्या निर्णयाविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यापीठाच्या निर्णयाला निषेध आंदोलनाने उत्तर देण्याचे ठरवले आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अंकुश ठेवणारा असल्याचे'अभाविप'ने म्हटले आहे.

## At a Glance

### गोळी न सुटल्याने वाचला तिघांचा जीव



**पिंपरी :** तरुणाने आपली पत्नी व सासू-सासऱ्यांना मारण्यासाठी पिस्तुल लोड केले. परंतु गावठी पिस्तुल असल्याने ट्रिगरचा दाबला गेला नाही आणि पत्नीसह तिघांचे प्राण वाचले. पत्नीने प्रसंगावधान राखत पतीच्या हातातील पिस्तुल हिसकाण्याचा प्रयत्न केला. तिच्या मदतीला आई वडिलही आले आणि त्यांनी पिस्तुल हिसकावून घेतले. जर ट्रिगर दाबला गेला असता तर जीव गेला असता. हरिष अशोक काकडे (वय २४, रा. शिवाजीवाडी, मोशी) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे.

### बनावट कपडे विक्री प्रकरणी कारवाई



**पिंपरी :** पिंपरी- पिंपरी कॅम्प परिसरात पिंपरी पोलिसांनी दोन दुकानांवर बनावट कपडे विक्री केल्याप्रकरणी कारवाई केली. यामध्ये दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सोमवारी (दि. ३०) सायंकाळी करण्यात आली.चेतन रवी पुजारी (वय २८, रा. कोथरूड), बन्सीलाल रमेशलाल पंजवाणी (वय ४१, रा. पिंपरी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी दीपक बाबुलाल पटेल (वय ४६, रा. मालाड वेस्ट, मुंबई) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# भोसरी पोलिस ठाणे 'सर्वोत्कृष्ट'

## शिरपेचात मानाचा तुरा : पोलिस आयुक्तालयाचे नाव उंचावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** राज्यातील गुन्हेगारीला प्रतिबंध घालणाऱ्या, कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिस ठाण्यांमध्ये पिंपरी-चिंचवडपोलिस आयुक्तालयातील भोसरी पोलिस ठाण्यानेही बाजी मारली आहे. राज्यातील पाच सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्यांमध्ये भोसरी पोलिस ठाण्याने चौथा क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे राज्य पोलिस दलात पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाचे नाव उंचावले आहे.

कायदा व सुव्यवस्था गुन्हे प्रतिबंध दोषसिद्धी यामध्ये सुधारणा व्हावी, यासाठी पोलिस ठाण्यांची निवड प्रक्रिया घेण्यात येते. देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्यांची निवड करण्याचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला होता. यासाठी राज्यातील पोलिस ठाण्यांची निवड देशपातळीवर करण्याच्या उद्देशाने ही निवड केली. यामध्ये राज्यातील पाच पोलिस ठाण्यांची निवड करण्यासाठी समित्यांची निवड केली होती. समितीच्या अहवालानुसार राज्यातील पाच सर्वोत्कृष्ट ठाण्यांची निवड झाली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजीनगर पोलिस ठाणे, नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलिस ठाणे, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील विरगाव पोलिस ठाणे, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील भोसरी पोलिस ठाणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ पोलिस ठाण्याची निवड झाली आहे."




### १० सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्यांची निवड करण्याचा निर्णय

● कायदा व सुव्यवस्था गुन्हे प्रतिबंध दोषसिद्धी यामध्ये सुधारणा व्हावी, यासाठी पोलिस ठाण्यांची निवड प्रक्रिया घेण्यात येते. देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्यांची निवड करण्याचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला होता. समितीच्या अहवालानुसार राज्यातील पाच सर्वोत्कृष्ट ठाण्यांची निवड झाली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजीनगर पोलिस ठाणे, नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलिस ठाणे, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील विरगाव पोलिस ठाणे, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील भोसरी पोलिस ठाणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ पोलिस ठाण्याची निवड झाली आहे.

### ..या अधिकाऱ्यांचे विशेष प्रयत्न

भोसरी पोलिस ठाण्याला सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्याचा मान मिळण्याकरता पिंपरी-चिंचवडचे तत्कालीन पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश, पोलिस आयुक्त अंकुश शिंदे, तत्कालीन सह आयुक्त संजय शिंदे, तत्कालीन अपर आयुक्त रामनाथ पोकळे, भोसरी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक भास्कर जाधव यांनी विशेष प्रयत्न केले.




### पोलिसांना प्रोत्साहन

पोलिस ठाण्यांची कार्यक्षमता आणि कामगिरी, गुणवत्ता वाढवणे, दिलेल्या मर्यादेमध्ये उत्कृष्ट पद्धतीने काम करण्याबाबत या कार्यमूल्यांकनातून पोलिसांना प्रोत्साहन दिले जाते. गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्ह्यांचा तपास कायदा - सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने यातून पोलिसांना प्रेरणा मिळण्यास मदत होते.



"भोसरी पोलिस ठाण्याची निवड होणे ही अभिमानास्पद बाब आहे. तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि पोलिस ठाण्यातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या कामाचा हा सन्मान आहे. आणखी चांगले काम करण्यास यातून प्रेरणा मिळाली आहे."

**— भास्कर जाधव,** पोलिस उपअधीक्षक तथा तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक, भोसरी



"या सर्वोत्कृष्ट सन्मानामुळे पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचा बहुमान वाढला आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा सन्मान खूप मोलाचा ठरणार आहे."

**— विनय कुमार चौबे,** पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

### संवेदनशील ते सर्वोत्कृष्ट पोलिस ठाणे

पिंपरी-चिंचवड पोलिस प्रशासनासाठी भोसरी पोलिस ठाणे हे 'हेवी' पोलिस ठाणे आहे. तसेच संवेदनशील पोलिस ठाणे म्हणूनही या पोलिस ठाण्याची ओळख आहे. त्यामुळे संवेदनशील ते सर्वोत्कृष्ट पोलिस ठाणे म्हणून राज्यात नावलौकिक मिळवणाऱ्या भोसरी पोलिस ठाण्याची देशपातळीवरील दहा सर्वोत्कृष्ट पोलिस ठाण्यांमध्ये निवड होणार का, याकडे आता लक्ष लागून आहे.

# प्रत्येकाने 'रस्ता सुरक्षा ब्रँड अँबेसिडर' बनावे !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आकुर्डी :** प्रत्येक नागरिकाने स्वतः वाहतूक नियमांचे पालन करून संपूर्ण समाजात रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती करण्यासाठी ब्रँड अँबेसिडर बनावे, असे आवाहन पिंपरी चिंचवडचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी केले.रोटरी क्लब ऑफ आकुर्डी व रोटरी क्लब ऑफ चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक विषयक जनजागृती करणारे कॅलेंडर तयार करण्यात आले आहे. त्याचे प्रकाशन बांगर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रांतपाल शीतल शहा, आकुर्डी रोटरी क्लबचे अध्यक्ष गौतम शहा, नियोजित अध्यक्ष पराग जोशी, माजी अध्यक्ष राजेश अग्रवाल, जसविंदर सिंग सोखी उपस्थित होते.

**प्रकाशन**

रस्ते सुरक्षा विषयक जनजागृतीसाठी आकुर्डी रोटरी क्लबने पुढाकार घेतल्याबद्दल पोलीस उपायुक्त बांगर यांनी सर्व सदस्यांचे कौतुक केले. रस्ते अपघात टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी रस्ता सुरक्षा ब्रँड अँबेसिडर होऊन जनजागृती करावी, असे ते म्हणाले.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात 2022 मध्ये 372 जणांचा अपघाती मृत्यू झाला. 2023 मध्ये ही संख्या 373 होती. हा आकडा गेली काही वर्षे वाढतच होता, मात्र यावर्षी हा आकडा 345 पर्यंत कमी करण्यात यश मिळाले आहे. 28 लोकांना यावर्षी मृत्यूपासून वाचवण्यात आपल्याला यश आले आहे. त्याचे श्रेय वाहतूक शाखेच्या सर्व कर्मचाऱ्यांना जाते, अशी माहिती बांगर यांनी दिली.शहरात अपघातात मरण पावलेल्यांमध्ये 205 दुचाकी स्वार तर सुमारे 100 पादचाऱ्यांचा समावेश आहे.

### बांगर यांचे आवाहन

● दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर केल्यास तसेच पादचाऱ्यांनी रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहून तसेच हात वर करून रस्ता ओलांडावा तसेच चालताना रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे. त्यामुळे बरेचसे अपघात व अपघाती मृत्यू टाळणे सहज शक्य आहे, असे मत बांगर यांनी व्यक्त केले.पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने एक दिवस शाळेसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना वाहतूक विषयक नि अशी माहिती व्हावी यासाठी एक पुस्तिका छापण्यात येणार आहे. त्यासाठी रोटरी क्लबने सहकार्य करावे, असे आवाहन बांगर यांनी केले.

# मेट्रो सिटी आयकॉन २०२४ पुरस्कार जाहीर

## खा. अमोल कोल्हेंच्या हस्ते वितरण : विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** दरवर्षी मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येतो. पुणे व पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कायदे, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो, यावर्षी संस्थेच्या वतीने मेट्रोसिटी आयकॉन पुरस्काराचे मानकरी जाहीर करण्यात आले आहे.

दोन जानेवारी रोजी संपन्न होत असलेल्या या पुरस्कार सोहळ्यात शिरूर लोकसभा मतदार संघाचे खा. अमोल कोल्हे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येत आहे. तसेच या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याचबरोबर सदर पुरस्कार सोहळ्यात चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप, पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष तथा माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, शिवसेना उपनेते तथा कामगार नेते इरफान भाई सय्यद, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले, सरिता साने सखी मंचच्या अध्यक्षा सरिता अरुण साने, प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या पुरस्कार सोहळ्याचे मानकरी अधिरा इंटरनॅशनल स्कूल पुनावळे, निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटल भोसरी, एडवोकेट कांता गोर्डे - शेजवळ, डॉक्टर सायली बारसे, युवा सामाजिक कार्यकर्ते बापू दिनकर कातळे, ज्योती गोफणे, ज्योती निंबाळकर, अंकिता राऊत, शैला निकम, श्रीमती शोभा उर्फ नानी जगताप, ज्योती भालके, विजय जरे, प्रवीण माळी, कीर्ती जाधव, व मनीषा चंद्रकांत शिंदे यांना मेट्रोसिटी आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे सदर कार्यक्रम हा दोन जानेवारी रोजी ऑटो क्लस्टर सभागृह चिंचवड येथे दुपारी ३ वाजता संपन्न होत आहे. तसेच या पुरस्कार सोहळ्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते राहुल कोल्हटकर , डॉक्टर शैलेश देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते संभाजी बारणे, वृत्तपत्र विक्रेते अनिल दळवी, माजी नगरसेविका अमिना पानसरे, पत्रकार बापू गोरे, एडवोकेट दीपक साबळे व सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर तसेच शिक्षक योगेश डावरे यांचा विशेष सन्मान होणार आहे.

### कार्यक्रमाची उपस्थिती

● दोन जानेवारी रोजी संपन्न होत असलेल्या या पुरस्कार सोहळ्यात शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येत आहे. तसेच या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# शिवसेना सचिन भोसले यांची नवी नोटीस आठ दिवसांसाठी स्थगित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शिवसेनेच्या यूबीटी पिंपरी चिंचवड युनिटचे शहर प्रमुख सचिन भोसले यांच्या विरोधात जारी करण्यात आलेली नवी नोटीस आठ दिवसांसाठी स्थगित ठेवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी पिंपरी चिंचवड पोलिसांना दिले. न्यायालयाने या वर्षी 21 ऑक्टोबर रोजी यापूर्वी जारी केलेल्या नोटीसवर प्रथम निर्णय घेण्याचे निर्देश पोलिसांना दिले. पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक आणि सेनेचे यूबीटी नेते भोसले यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत आपल्यावरील हकालपट्टीची कारवाई राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली . याआधी, त्याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी 21 ऑक्टोबर रोजी नोटीस बजावली होती आणि बाह्य प्रकरणावर पुढे जाण्यापूर्वी त्याचे म्हणणे विचारले होते आणि 4 डिसेंबर रोजी पुन्हा दुसरी नोटीस बजावण्यात आली होती, जी आधीच्या नोटीसवर निर्णय न घेताही बजावण्यात आल्याचा त्यांचा दावा आहे. भोसले म्हणाले की, राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस अगोदर यापूर्वीची नोटीस बजावण्यात आली होती, तर नुकतीच नोटीस बजावण्यात आल्याने महापालिका निवडणुकीची घोषणा केव्हाही होऊ शकते.

### खंडपीठाने काय नमूद केले

● ४ डिसेंबर 2024 रोजीची नोटीस कायम राहील. 21 ऑक्टोबर 2024 च्या पूर्वीच्या नोटीसचा निर्णय घेतल्यानंतर आठ दिवसांच्या कालावधीसाठी स्थगिती. भोसले यांच्यावर पिंपरी चिंचवडमध्ये 2009 ते 2023 या कालावधीत एकूण सात गुन्हे दाखल आहेत. 2009 मध्ये एकच गुन्हा दाखल झाला होता, तर उर्वरित गेल्या काही महिन्यांत दाखल झाल्याचा दावा त्यांनी केला.

## गुणगौरव सोहळा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**कासारवाडी** निवड : कु भाविका अहिरे हिची १९ वर्षाखालील T20 महिला क्रिकेट वर्ल्ड कप साठी भारतीय संघात निवड झाली आहे.तिचा गुणगौरव कार्यक्रम कासारवाडी येथे संपन्न झाला.

# ओम साई क्रिकेट अकॅडमीने सार्थ केला विश्वास; भाविका अहिरे हिला मोठे यश !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कासारवाडी :** ओम साई क्रिकेट अकॅडमी ची खेळाडू कु भाविका मनोजकुमार अहिरे हिने यशाला गवसणी घालत पिंपरी चिंचवड शहराचे नाव महिला क्रिकेट मध्ये मोठे केले आहे. कु भाविका अहिरे हिची 19 वर्षाखालील T20 महिला क्रिकेट वर्ल्ड कप साठी भारतीय संघात निवड झाली आहे.तिचा गुणगौरव कार्यक्रम कासारवाडी येथे संपन्न झाला.

ओम साई क्रिकेट अकॅडमी ची खेळाडू कु भाविका मनोजकुमार अहिरे हिने यशाला गवसणी घालत पिंपरी चिंचवड शहराचे नाव महिला क्रिकेट मधे मोठे केले आहे. कु भाविका अहिरे हिची 19 वर्षाखालील T20 महिला क्रिकेट वर्ल्ड कप साठी भारतीय संघात निवड झाली आहे.भाविका अहिरे हि वयाच्या १० व्या वर्षांपासून ओम साई क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक श्री. संजय हाडके सर यांचे कडून क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. भाविका हि फलदांज आणि विकेट-किपर म्हणून संघात खेळते.

भाविकाने पंधरा वर्षाखालील मुलींच्या महाराष्ट्र संघातून खेळताना संघाचे कर्णधार पद भूषविले आहे. तिने ह्या प्रदार्पणच्या सामन्यात मुंबई विरुद्ध खेळताना तिने १२९ धावांची शतकी खेळी केली होती आणि फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविले होते. त्याच्या पुढील वर्षी एकोणीस वर्षाखालील मुलींच्या महाराष्ट्र संघातून प्रदार्पणच्या सामन्यात मेघालय विरुद्ध खेळताना तिने ११९ धावांची शतकी खेळी केली होती. खेळातील सातत्यामुळे भाविकाची तीन वेळा नॅशनल क्रिकेट अकॅडेमि बंगलोर येथे उच्च क्रिकेट प्रशिक्षण शिबिरासाठी निवड करण्यात आली आणि त्यातूनच पहिल्या १९ वर्षाखालील महिलांच्या आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. भारताने आशिया कप स्पर्धेचे अजिक्यपद पटकावले. आता जानेवारी महिन्यात होणारी क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धा सुद्धा भाविका खेळणार आहे, हि समस्त पिंपरी चिंचवड शहरवासीयांची अभिमानाची बाब आहे.

भाविका हि भोसरी प्राधिकरण सेक्टर-१० मध्ये राहत असून तिने आपले प्राथमिक शिक्षण श्री श्री रविशंकर विद्यालय आणि माध्यमिक शिक्षण प्रियदर्शनी इंग्लिश स्कूल इंद्रायणीनगर येथे पूर्ण केले असून ती सध्या एस पी कॉलेजे पुणे येथून वाणिज्य शाखेत आपले शिक्षण घेत आहे.तिचा गुणगौरव कार्यक्रमासाठी कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका सौ. आशाताई शेंडगे, प्रतिष्ठित उद्योजक श्री. प्रताप मोहिते मामा, माजी रणजी खेळाडू श्री. प्रदीप इंगळे सर, श्री. युवराज कदम, महिला भारतीय क्रिकेपटू सौ. सोनिया डबीर, सौ. मनीषा कोल्हटकर, ज्युडिशियल क्रिकेट क्लब चे संचालक श्री. दीपक शिंदे सर, पिंपरी चिंचवड मधील नामवंत क्रिकेटपटू आणि वरिष्ठ प्रशिक्षक श्री. राजू कोतवाल असे अनेक मान्यावर उपस्थित होते. मा रणजी क्रिकेट पटू व बीबीसीआय लेव्हल (3) चे कोच मा श्री प्रदीप इंगळे सर मार्गदर्शन करत म्हणाले " भाविक इतिहास घडवेल व सध्याच्या पालकांचा पाल्य घडविण्यासाठीची धडपड, प्रत्नय वाखान्य जोगे आहे. भारतीय क्रिकेट खेळाडू सोनिया डबीर यांनी भाविकाला शुभेच्छा देत अपेक्षा व्यक्त केली की " पुढील काळात ती ओपनच्या महिला क्रिकेट संघातून भारताचे नाव मोठे करेल असा विश्वास दर्शविला आहे.

# सुहास दिवसे होणार महापालिका आयुक्त ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या महापालिका निवडणुका डोळ्या समोर ठेवून राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांची चर्चा सुरू आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची दोन दिवसांत बदली होणार असून त्याचा पदभार पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याकडे येण्याची शक्यत आहे. दरम्यान, याबाबत खुद्द शेखर सिंह यांच्याशी संपर्क केला असता तशी कोणती माहिती नाही आणि शक्यताही नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**महापालिका**

आयुक्त शेखर सिंह यांची १६ ऑगस्ट २०२२ रोजी महापालिका आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली. अद्याप सहा महिने त्यांची कारकिर्द संपायला बाकी आहेत. तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावेळी खासबाब म्हणून त्यांची शहरात नियुक्ती केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना त्यांच्या सोयिचे अदिकारी म्हणून सुहास दिवसे, योगेश म्हसे किंवा राजेंद्र देशमुख यांच्यापैकी एकाकडे हा पदभार सोपवायचा होता.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकित पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. महिनाभरात सरकार स्थिरस्थावर होताच त्यांनी आता स्वच्छ कारभार देणारे, कार्यक्षम अधिकारी मोक्याच्या ठिकाणी देण्यासाठी आदलाबदली सुरू केली आहे.

# एमआयडीसीमधून तीन बांगलादेशी घुसखोर ताब्यात

**क्राईम**

राज्यातील वेगवेगळ्या भागात सध्या बांगलादेशींना ताब्यात घेतले जात असल्याची कारवाई केली जात आहे. तर आता मावळ तालुक्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरातील नवलाख उंबरे गावातून तीन बांगलादेशी नागरिकांना पकडण्यात आले आहे. पोलिसांनी यांना ताब्यात घेत चौकशी करत आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ :** रामावळ तालुक्यातील तळेगाव एमआयडीसी परिसरातील नवलाख उंबरे येथे मागील सहा महिन्यांपासून हे बांगलादेशी नागरिक वास्तव्यास होते. नवलाख उंबरे याठिकाणी मोठ्या प्रमाणात मुस्लिम लोक राहत असल्याची तक्रार तळेगाव एमआयडीसी पोलिसांकडे आली होती. त्यानंतर पोलिसांनी या ठिकाणी तपास केला असता त्यांना हे तीन बांगलादेशी इसम आढळून आले. या इसमाकडे कागदपत्रांची पडताळणी केली असता त्यांच्याकडे बांगलादेश मधील रहिवासी पुरावे मिळून आले. आधार आणि पॅन कार्डही आढळले त्यानंतर पोलिसांनी या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. हुसेन शेख, मोनिरुल गाठी, अमीरुल साना अशी अटक करण्यात आलेल्या बांगलादेशी इसमांची नावे आहेत. ताब्यात घेण्यात आलेल्या तिघांकडे आधार कार्ड व पॅन कार्ड देखील सापडून आले आहे. अर्थात सहा महिन्यांपासून वास्तव्यास असताना या बांगलादेशी इसमांना भारतीय आधार कार्ड व पॅन कार्ड कोणी दिले; याबाबतचा तपास तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव करत आहेत.



संपादकीय विशेष

# नववर्षाचे स्वागत करताना...

काही वर्षांपूर्वीपर्यंत काळाची गती संथ होती. वर्षांचे येणे-जाणेही हलक्याशा झुळुकीसारखे सहज आणि सुखावणारे होते. जगण्याची स्पर्धा तीव्र नसताना सरते वर्ष नव्या वर्षाची नवी धास्ती देऊन जात नव्हते. मात्र आज एकीकडे नववर्ष स्वागताचा कल्लोळ वाढला असला तरी ते कसे जाईल, याविषयीच्या चिंता आणि भीतीचा सूरही तेवढाच तीव्र झाल्याचे दिसते. त्यामुळेच ग्रहणकाळात झाकोळणारे सूर्य वा चंद्रबिंब परछायेतून मुक्त होताच पूर्वीसारखे प्रकाशमान होणार आहे, हे ठाऊक असले तरी त्या काळात वाटणारी धास्ती आताशा वर्ष सरताना मनात डोकावून जाते. पूर्वी आणि काही प्रमाणात आजही ग्रहण लवकर सुटण्यासाठी 'दे दान, सुटे गुरान' म्हणत फिरणारे याचक दिसायचे. देवांना साकडे घातले जायचे. जपजाप्य पार पडायचे. ग्रहणकाळात न खाण्यापिण्याचा नेम पाळला जायचा. या सगळ्यामागे तमाची एक अदृश्य भीतीच दिसायची. आताही सरत्या वर्षाला निरोप देताना अस्थिर भविष्याविषयी अशी भीती दिसते. कर्कश्श होत जाणाऱ्या नववर्ष स्वागताच्या साजरीकरणावर तिची छटा स्पष्ट जाणवते. पुढे कधी असे सुख उपभोगायला मिळेल की नाही, या विचारातून अधिकाधिक आनंद लुटण्याचा प्रयत्न दिसतो. त्यामुळेच ही केविलवाणी स्थिती दूर सरुन लख्ख प्रकाश घेऊन येणारे नवे पर्व सुरू होईल, अशी आशा वाटते.



मागील वर्ष युद्धजन्य स्थितीने आणि देशपातळीवर निवडणूकज्वराने पोळलेले होते. उच्च शिक्षण, नोकरी-धंदा वा अन्य कारणांमुळे देश-विदेशात गेलेले आपले लोक सुखरुप असतील का, विदेशांमध्ये त्यांना तात्कालिक वा कायमच्या निवासासाठी आवश्यक असणारा परवाना मिळेल का, रोजगाराची उपलब्धता कशी असेल, त्यांना परत तर यावे लागणार नाही ना अशा एक ना अनेक प्रश्नांनी काही उच्च मध्यमवर्गीय घरांमधील वातावरणही ढवळून निघालेले दिसले. दुसरीकडे निवडणुकांदरम्यान दिली जाणारे आश्वासने, मिळालेली भरघोस मदत, नानाविध कल्याणकारी योजना आदींमधून समाजातील एका वर्गाने सुखाचा काळही अनुभवलेला दिसला. तेव्हा मोदीपर्वाची तिसरी टर्म सुरू झाल्यानंतर आणि उलथापालथ घडवून आणणारे राजकारण कडेला जात राज्यात स्थिर सरकार स्थापन झाल्यानंतर आता आपल्या जगण्याचे चक्रही सुरळित सुरू होईल, हीच आशा वर्षाला निरोप देणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आहे.

आता प्रौढावस्थेत असणारा आपला देश चौफेर घोडदौड करत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार करता विकासदरात सातत्यपूर्ण प्रगती करणाऱ्या भारताने जगात तिसरे स्थान पटकावले आहे. आगामी काळात अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनची करण्याचे ध्येय समोर ठेवून त्या अनुषंगाने आर्थिक निर्णय घेत, आंतरराष्ट्रीय पातळीवरील परस्परसंबंध वृद्धींगत करत, गर्तेतील देशांना मदतीचा हात देत आपण दमदार पावलांनिशी वाटचाल करत आहोत. जगाच्या कानाकोपऱ्यात भारतीयांना मिळणारा मान सुखावणारा आहे. वाढता दर्जा आपली बुद्धिमत्ता सर्वमान्य असल्याचे सिद्ध करणारा आहे. मात्र जगाच्या क्षितिजावर असे कौतुक मिळवणाऱ्या देशातील अंतर्गत स्थिती कशी आहे याचाही गांभीर्याने विचार करण्याची हीच वेळ आहे. एकीकडे आपण विस्तारत्या रस्त्यांचे, मेट्रोसेवा, मोनोरेल आणि अन्य दळणवळण यंत्रणेचे गोडवे गातो तर दुसरीकडे वाढत्या रस्ते अपघातामुळे परदेशांमध्ये बोलताना शरमेने आपली मान खाली जाते, असे दस्तुरखुद्द महनीय मंत्र्यांचे विधान ऐकतो. वेगावरील नियंत्रण सुटल्यामुळे कधी भररस्त्यात शिरलेले वाहन अनेक निरपराध सामान्यांना चिरडून जाते तर कधी भर समुद्रामध्ये खेळातील वाहने थडकावीत इतक्या थरारक पद्धतीने स्पीड बोट आणि प्रवासी नौकेची धडक होऊन लहानग्यांसह काहींना जलसमाधी मिळते. कधी वळणांवर तर कधी महामार्गांवर होणाऱ्या अपघातांमध्ये मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या तर गणतीतही नाही. ही स्थिती उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी ग्रहणाची दाहकता देणारी ठरते आहे.

एकीकडे जगातील अनेक देशांमध्ये स्त्रीला मातेसमान मानणारी आपली संस्कृती अभ्यासली जात आहे. मात्र दुसरीकडे देशामध्ये महिला-मुलींवरील अत्याचारांमध्ये वाढ होत आहे. वाढणारे कौर्य अंगावर भीतीचा शहारा उमटवून जात आहे. मुख्य म्हणजे 'पुरुष' या संज्ञेमध्ये अगदी पंधरा-सोळा वर्षीय किशोरांचाही समावेश होताना दिसतो. आज महिला सुरक्षित, संरक्षित, सुशिक्षित, स्वाभिमानी झाल्या असल्याच्या काळातही त्यांच्यावरील अत्याचारांचे पाढे वाचत, त्यांच्या समर्थनासाठी हाती मेणबत्त्या घेऊन लाखोंना मोर्चे काढावे लागतात तेव्हा अंधार किती गडद आहे, हे स्पष्टपणे समजते. नववर्षामध्ये हे चित्र बदलेल अशी अपेक्षा व्यक्त करु या.

सध्या आपण निसर्गाचा लहरीपणाही जवळून अनुभवत आहोत. एका दिवसात सर्व ऋतूंचे दर्शन घडवणारा काळ सोसत आहोत. गेली काही वर्षे होत असलेल्या चुका दुरुस्त केल्या नाहीत तर येत्या काळात हा लहरीपणा वाढणारच आहे. त्यामुळेच येणारे वर्ष निसर्गाला न पेलणारा विकास कमी करण्याच्या विचाराच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. थेंबाथेंबाने तळे साठते हे खरेच आहे. मात्र अतिउष्णतेने त्याची वाफ होण्यासही वेळ लागत नाही, हे वास्तव आहे. पर्यावरणाला, वन्य जीवनाला हानिकारक ठरणाऱ्या अनेक चुका आपल्या हातून झाल्या आहेत. अत्यंत संवेदनशील भागांमध्ये अट्टहासाने होणारा विकास आणि झालेले निकृष्ट काम खचणाऱ्या बोगद्यांच्या, पडणाऱ्या पुलांच्या, भेगाळणाऱ्या रस्त्यांच्या, थोडा पाऊस झाला तरी पाण्याखाली जाणाऱ्या मार्गांच्या रुपाने समोर आला आहे. त्यामुळे कुटुंबापासून समाजापर्यंत आणि ग्रामपातळीपासून देशपातळीपर्यंतच्या प्रत्येक पायरीवर याचा विचार होण्याची गरज आहे. पुढच्या पिढीसाठी उत्तम वातावरण निर्माण करणे, आहे ते जपणे हे वर्तमानातील पिढीचे कर्तव्य असते. मात्र सध्याची पिढी असेल, नसेल त्या साधनांचा चट्टामट्टा करत, सगळे काही संपवण्याच्या मागे आहे. मिळाले नाही तर ओरबाडून घेण्याचा अधाशी प्रयत्न करणाऱ्यांची भीड चेपल्याचे जाणवत आहे. याच प्रवृत्तीनिशी सामोरे गेलो तर नवीन वर्षात प्रवेश करणे हे केवळ दिनदर्शिकेचे नवे पान उलटण्यासारखे होईल. ते कोरे असेल पण करकरीतपणा पुढच्या पिढीचे भविष्य धोक्यात आणणारा ठरेल. म्हणूनच यंदा नववर्षाबरोबरच नवविचारांचेही स्वागत होणे गरजेचे आहे. देश आचार-विचाराने समृद्ध होईल तेव्हाच ग्रहणावस्थेतून बाहेर येत नव्या तेजाने झळाळून निघेल.

नववर्ष विशेष 2025

# नवे वर्ष, नवी अनुभुती!



सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून संपूर्ण मानवजातीनेच माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता 2025 मध्ये डोळे उघडून आपला प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे, तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे मला वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. या समेवर नववर्षाचे स्वागत करु या...

आपल्यापैकी प्रत्येकालाच नवीन वर्षाबाबत कुतुहल असते. तसे औत्सुक्य मलाही आहे. मागील काही काळाप्रमाणे येणारे वर्षही अनेक नवनवीन प्रोजेक्ट्सने भरलेले, फॉर्मवरील आयुष्यात नवे रंग दाखवणारे असेल, अशी आशा आहे. आज आमच्याच नव्हे, तर आपल्या सगळ्यांच्याच आयुष्याला प्रचंड वेग आला आहे. एक वर्ष कधी संपते आणि नवे कधी सुरू होते, याचा हिशेबही कधी कधी लागेनासा होतो. त्यामुळेच या संमिश्र भावनेतून सरत्या वर्षाला निरोप दिला जात आहे. खरे तर 2024 भरात आल्यासारखे वाटतेय. पण आता 2025 चे स्वागत करण्याची वेळ आली आहे. अर्थातच नवे वर्षही याच वेगाने पुढे सरकणार आहे. ऋतूबदलाचे एक चक्र अनुभवत आयुष्य पुढे सुरू राहणार आहे. तेव्हा या वर्षाचे आणि आयुष्याचे मोकळ्या मनाने स्वागत करु या.

सध्याच्या काळात पर्यावरणविषयक प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे झाले असून संपूर्ण मानवजातीनेच आता माणूस म्हणून आपण कुठे आहोत, याचा विचार करण्याची गरज जाणवू लागली आहे. हे लक्षात घेता 2025 मध्ये डोळे उघडून आपल्या प्रांत, राज्य वा देशाकडेच नव्हे तर संपूर्ण जगाकडे बघणे गरजेचे आहे, असे वाटते. शेवटी हद्दी माणसाने ठरवलेल्या असतात, निसर्गाने नव्हे. त्यामुळेच या हद्दींच्या पलिकडे जात होणारा विचारच भविष्याला आकार देणारा ठरणार आहे. चराचरातील एक प्रजाती म्हणून स्वतःला शोधण्याची गरज मला प्रकर्षाने जाणवते. कारण हे केले नाही तर आपण आपल्या प्रजातीच्या नाशाला कारणीभूत ठरु. वेळीच पावले उचलली नाहीत तर आज ना उद्या हे घडणारच आहे. असेच निष्काळजीपणाने जगत राहिलो तर पुढील दहा वर्षांमध्येच आपल्याला अनेक धोकादायक बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळेच एक वर्ष संपून नवे वर्ष सुरू होताना कधी कधी आनंदापेक्षा दडपणाचे प्रमाणच वाढल्याचा अनुभव सध्या येत आहे. मात्र या भीतीने गलितगात्र न होता, धीर न सोडता नव्या दमाने, नव्या विचारांनीशी दिवसाची सुरूवात करायला हवी, कारण निराश होत जगणे हे कधीच चांगले जगणे होत नाही. तेव्हा चांगले जगायचे तर आपल्याला आशावादी रहायलाच हवे. प्रत्येक वर्षाची सुरूवात मनात आशेचा अंकुर ठेवूनच झाली पाहिजे. तरच आपण शहाणे होऊ आणि वाढलेल्या बुद्ध्यांकांचा चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेऊ शकू. आधीपासून माणूस हुशार आहेच. पण आता तो शहाणा होणार का, हा खरा प्रश्न आहे. येत्या वर्षात याचे उत्तर शोधावे लागेल.

गेली काही वर्षे आम्ही निसर्गाचा निकटचा सहवास अनुभवत आहोत. नैसर्गिक शेतीमध्ये अनेक नवीन प्रयोग करत बरेच काही शिकत आहोत. या निमित्ताने वेगवेगळ्या लोकांना भेटत आहोत. त्यातच एका मान्यवरांचे एक वाक्य मनाला भावले. गप्पा मारताना ते म्हणाले, आपण आपले तर घेतच आहोत, पण पुढच्या पिढीचेही आपणच संपवत आहोत. निसर्गामध्ये वावरत असताना हे सत्य अधिक तीव्रतेने आणि प्रकर्षाने जाणवत आहे. खरे तर निसर्गाच्या जितक्या जवळ जाऊ, तितक्या तुमच्या जाणीवा प्रगल्भ होतात, प्रखर होतात आणि तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे काम करु शकता. त्यामुळे येत्या वर्षात अनेकांनी निसर्गाशी सोयरेपण जपण्याची गरज आहे, असे मला वाटते. त्या दृष्टीने आम्ही एक पाऊल उचलले आहेत. आता मागोमाग काही लोक येत आहेत.



मृण्मयी देशपांडे
प्रसिद्ध अभिनेत्री


अलिकडेच आम्ही फार्मवर काही कार्यशाळा सुरू केल्या आहेत. त्यातून काही समजून घेऊन आजूबाजूचे शेतकरीही आपल्या शेतजमिनींकडे बघत आहेत. त्यांना शेतीमध्ये नवे प्रयोग करायचे आहेत. सेंद्रिय शेतीतले नवे काही जाणून घ्यायचे आहे. रासायनिक खते न वापरता विषमुक्त शेती करण्याकडे लोकांचा कल वाढताना दिसतोय. आमच्याकडे बघून काही लोकांना असे करावेसे वाटणे ही देखील एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. शेवटी आम्ही स्वार्थासाठी म्हणजेच स्वच्छ हवा, चांगले आणि सकस अन्न, पुरेसा सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी, पाळलेल्या कुत्र्यांना चांगली आणि पुरेशी जागा देण्यासाठी हे पाऊल उचलले असले तरी यातून काहींना नवी दृष्टी मिळणे ही सुखावणारी बाब आहे. या पार्श्वभूमीवर लोकांपुढे चांगल्या गोष्टींचा आदर्श ठेवणे, त्यांना चांगल्या गोष्टींकडे वळवणे ही मला जबाबदारी वाटते. ती पार पाडली जात असल्याचा निखळ आनंद सरत्या वर्षाने आम्हाला दिला आहे आणि नवे वर्षही तो देत राहील याची खात्री आहे.

आपल्या देशामध्ये अगदी 60 वर्षांपूर्वीदेखील विषमुक्त शेती होती. घरोघरी हीच पद्धत अनुसरली जायचे. मात्र काळाच्या ओघात बरेच काही बदलले आणि बिघडले. ते सगळे पूर्ववत करणे आमच्या एकट्याच्या प्रयत्नाने साध्य होणारे काम नाही. पण किमान आमच्या कामाने समाजात जागृती निर्माण झाली आणि काही लोक प्रामाणिक प्रयत्न करुन चांगल्या दिशेकडे वळले तरी आपण बरेच काही मिळवू शकू, हा विचार सगळ्या कामामागे आहे. हे सगळे करत असताना माझ्या विचारांमध्ये झालेला बदलही प्रकर्षाने जाणवणारा आहे. अगदी आठ-दहा वर्षांपूर्वी पैसा असता तर एखादी आलिशान गाडी विकत घेण्यास मी प्राधान्य दिले असते. सगळी शक्ती पणाला लावली असती. पण आता पैसे असतानाही मला कोणत्याही ब्रँडच्या मागे धावण्याची इच्छा होत नाही. त्याऐवजी आणखी जमीन घेणे मला आवडेल.

आज जंगलातील काही भाग विकत घेऊन निगराणी करणे, संरक्षित करणे मला अधिक आवडेल, कारण ती खरी संपत्ती असल्याचे आता मला समजले आहेत. थोडक्यात, निसर्गाच्या सहवासात राहून प्रगल्भ झालेल्या जाणीवांचाच हा परिपाक आहे. चकमकत्या आणि दिखावू विश्वात कार्यरत असले तरी आता घर, गाडी, बंगला, नोकरचाकर आमचा प्राधान्यक्रम राहिलेला नाही वा त्याचे अप्रूपही राहिलेले नाही. शेवटी एखाद्याच्या जाणीवा प्रगल्भ होतात तेव्हाच तो शहाणा होऊ लागतो. हुशारी योग्य दिशेकडे वळते. असे असताना तुम्ही तुमच्याबरोबर समाजाचे भले केले नाही तरी किमान कुठला नाश तरी करत नाही. सध्या याच दिशेने आमचा प्रवास सुरू आहे आणि 2025 मध्येही तो अशाच वेगाने सुरू राहील.

बाकीचे सगळे कामही सुरू आहेच. चित्रपटांमधून वेगवेगळ्या भूमिका साकारायला मिळत आहेत, याचा आनंद आहेच. पण प्रामाणिकपणे सांगायचे तर मी शेतीच्या कामात अधिक रमतीये. इकडची ओढ वाढते आहे. याचे एक कारण असेही आहे की पर्यावरणाच्या दृष्टीने जागतिक पटलावरील भयावह परिणाम पाहता येत्या काही काळात काम करायला माझे क्षेत्र असेल की नाही, हेदेखील मला माहिती नाही. कारण आता मर मर करुन मी चित्रपट करेन, नाटक करेन पण एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर बंद पडणारे पहिले क्षेत्रही माझेच असेल. कोरोनाकाळाने हे दाखवून दिले आहे. विनाशाकडील आपली घोडदौड वेगाने सुरू आहे. म्हणूनच आता आपण आपल्या रक्षणासाठी काय करतोय, हा विचार अधिक प्रभावी होत आहे. नाच, गाणे, अभिनय, फिरणे याची पॅशन तर आधीपासून होतीच. ती आजही आहे. त्यापलिकडे मला काही येतही नाही आणि कधी काही वेगळे केलेही नाही. पण आता एकाच वेगाने आणि रेषेमध्ये या दोन्ही गोष्टी सुरू आहेत.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आता विकत घेण्याच्या कोणत्याही गोष्टींची अभिलाशा राहिलेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून अनेक गोष्टी माझ्या आयुष्यातून बाद झाल्या आहेत. सतत काही तरी विकत घ्यायचे, ड्रेस रिपीट करायचा नाही हे विचारही आता स्पर्श करत नाहीत. यशस्वी अभिनेत्री असूनही मला साधे राहणे जमते आहे. आता मी भारंभार कपडे विकत घेत नाही. ब्रँडेड चपलांचा अट्टहास तर कधीचाच संपला आहे. दोन-तीन हिल्स, दोन बूट आणि रोज वापरण्याच्या एका चपलांच्या जोडीवर मी राहू शकते, कारण या कशाचा आणि तुमच्या कामाचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, हे आता समजले आहे. तुम्ही सेलिब्रिटी असाल तर समाजापुढे चांगले आदर्श उभे करण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ आहे, असे माझे ठाम मत आहे. त्यामुळेच या नवीन कामात झोकून द्यायचे, घरात आधी कोणीच पायाखाली न घेतलेल्या वाटेवर प्रवास करण्याचे माझे प्रयत्न तर सुरू आहेत. 2025 मध्ये ते अधिक यशस्वी होतील, या आशेनेच 2024 ला निरोप देते. नव्या वर्षाचे स्वागत करते.




## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात प्रगती साधता येईल. कलेचा विकास होईल. शारीरिक बाबतीत काळजी घ्यावी.
- **वृषभ** : आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. वाद-विवादाचे प्रसंग निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **मिथुन** : नव्या वर्षाचा प्रारंभ उत्साहात होईल. योजलेली कामं मनासारखी होतील. येणे रक्कम वसुल होईल.
- **कर्क** : हातातून गेलेल्या संधी लाभणार आहेत. कौटुंबिक जीवनात समाधान लाभेल. महत्त्वाचे निर्णय घ्यावे.
- **सिंह** : शिक्षण, अनुभवातून संधी लाभतील. अपेक्षित कामं होतील. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **कन्या** : समस्या कमी होत जाणार आहेत. कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. कला-गुणांचा गौरव होईल.
- **तूळ** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. मनासारखा खर्च कराल.
- **वृश्चिक** : नव्या विचारांना चालना मिळेल. कार्यक्षेत्रात अपेक्षित संधी लाभतील. नोकरीत जबाबदारी वाढेल.
- **धनु** : कलेतून अर्थार्जन घडेल. कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील. समस्यांवर मात करा.
- **मकर** : कामांना गती प्राप्त होईल. अपेक्षित संधी लाभतील. चिंता करू नका. मनासारखं घडत जाईल.
- **कुंभ** : कार्यक्षेत्रात धडाडी वाढणार आहे. नव्या योजना अंमलात आणता येतील. कामाचा उत्साह राहील.
- **मीन** : नव्या कामांना गती मिळेल. उपजत कला-गुणांचा गौरव होईल. सरकारी कामं यशस्वी होतील.

सल्ला मोलाचा

## नवी ऊर्मी, नवा उत्साह

आयुष्याच्या वाटचालीत दिवस येतात आणि जातात. मागं राहतात त्या कटू-गोड आठवणी आणि आजवरचा झालेला प्रवास. मात्र, त्याचंही अवलोकन कधी तरी करायलाच हवं. ती संधी सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचं स्वागत करताना लाभते. आता २०२५ चं मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आलं. नवी ऊर्मी, नवा उत्साह घेऊन हे नवं वर्ष सुरु झालं. पण गतवर्षीच्या घटना, घडामोडींमधून आपण काही बोध घेणार आहोत का, त्यांचं आत्मपरिक्षण करून स्वतःत काही बदल करणार आहोत का, हा खरा प्रश्न आहे. नाही तर नेहमीप्रमाणं नवं वर्ष आलं आणि गेलं असं होईल. गतवर्षात झालेल्या चुका टाळणं, नव्या वर्षात काही नव्या गोष्टी शिकणं, आपापल्या क्षेत्रात अपेक्षित साध्य करण्यासाठी पुरेशा परिश्रमाची तयारी ठेवणं या बाबी गरजेच्या ठरणार आहे. कुटुंबातील प्रत्येकानं या गोष्टी लक्षात घेत कामाची, जबाबदाऱ्यांची आखणी केली. त्यानुसार साऱ्याच गोष्टी होतील असं नाही. परंतु जे काही होईल त्यातील समाधान वेगळंच असणार आहे.

## १ जानेवारी

दिनविशेष

- १९०८ : पुण्यात कृषी महाविद्यालयाची स्थापना.
- १९१९ : भारतात कायदेमंडळाची स्थापना. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट लागू.
- २०१३ : माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या निधनाने रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी काँग्रेसने रजनी पटेल यांची उमेदवारी जाहीर.
- २०१४ : राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी लोकपाल विधेयकावर स्वाक्षरी केली.
- २०१८ : दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांचा राजकारणात प्रवेश.

महत्त्वपूर्ण काही...

## सुख-संपत्तीचा सांगावा

प्रत्येक देशामध्ये वास्तुशास्त्राचे वेगवेगळे नियम बघायला मिळतात. आज भारतामध्ये भारतीय वास्तुशास्त्रातील नियमांचं पालन होतंच त्याचप्रमाणे चीनी वास्तुशास्त्र फेंगशुईच्या नियमांचंही पालन केलं जातं. बाजारामध्ये या शास्त्रावर आधारित विविध प्रतिकृती, प्रतिमा पहायला मिळतात. फेंग म्हणजे वायू आणि शुई म्हणजे जल... म्हणजेच फेंगशुई हे चीनी वास्तुशास्त्र जल आणि वायुवर आधारित आहे. या शास्त्रानं घरामध्ये कारंजी कोठे असावीत याचे काही संकेत सांगितले आहेत. या नियमांचं पालन केल्यास सुखसमृद्धीचा लाभ होतो. * घराच्या पूर्व कोपऱ्यामध्ये कारंज असावं. घरातील कारंज आकारानं छोटं असावं. ते घराच्या दिशेनं उडणारं असावं. घराच्या बाहेर पाण्याची दिशा असता कामा नये. * फेंगशुईमध्ये बांबुच्या रोपाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान दिलेलं आहे. बांबुची रोपं लाल धाग्यामध्ये गुंडाळून मुख्य खोलीमध्ये ठेवावीत. या ठिकाणी घरातल्या सदस्यांची सततची उठबस असते. बाबुंच्या हिरव्यागार रसरशीत रोपांमुळे तयार होणारं सकारात्मक वातावरण नातेसंबंध दृढ करतं असं फेंगशुई हे शास्त्र सांगतं.

आरोग्यमंत्र

## पोटदुखीवर सुलभ उपचार

पोटदुखीची समस्या ही तशी साधारण मानली जाते. कोणत्या ना कोणत्या कारणामुळे पोटदुखीचा त्रास सुरू होतो. त्यावर डॉक्टरी इलाज करणं गरजेचं ठरतं. मात्र काही घरगुती उपायांनीही या दुखण्यावर मात करता येते. पोट दुखत असल्यास नारळाचं पाणी, लिंबू सरबत आदी पेयं घ्यावीत. पोटदुखीबरोबरच जुलाब होत असतील तर सारक गुणधर्म असलेलं अन्न टाळावं. पालेभाज्या, कच्च्या भाज्या, कच्ची फळंही टाळावीत. त्याऐवजी पचायला हलकं अन्न घ्यावं. भात आणि मुगाचं वरण पचायला हलकं असतं. त्याचं सेवन फलदायी ठरतं. जुलाबाने त्रस्त असणाऱ्या रूग्णांसाठी गर असणाऱ्या भाज्या गुणकारी ठरतात. या रुग्णांनी बटाटा, दुधी भोपळा, सुरण, रताळी शिजवून खावी. पिकलेली गरयुक्त फळ खाण्यासही हरकत नाही. केळी, चिकू, वाफवलेलं सफरचंदही चालेल. फळांचे रस काढताना स्वच्छता पाळणं गरजेचं आहे. ज्यूसमध्ये चोथा असेल तर ते सारक ठरू शकतात, याबाबतही काळजी घ्यावी.



जुलाब होत असतील तर मसालेदार, कच्चे, तळलेले पदार्थ टाळावेत. आंबट दही-ताकापेक्षा अदमुरं दही आणि गोडसर ताक घ्यावं. पालेभाज्याचं सूपही योग्य ठरेल. वरील बाबींमुळे जुलाब कमी होतातच त्याचबरोबर पोटदुखीही कमी होते. या घटकांमधून शरीराला आवश्यक असणारे पोषक पदार्थ मिळत असल्यामुळे आरोग्यसंवर्धन होतं.

### पंचांग

**बुधवार, १ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. २, नक्षत्र : उत्तराषाढा
चंद्राशी : मकर, व्याघात योग
सूर्योदय : ७.११, सूर्यास्त : ६.१२

### फॉरवर्डस

आयुष्यात येणाऱ्या संकटातून माणूस बरंच काही शिकतो.

**हादसे जिंदगी में कुछ ऐसे हो गये,**
**हम समंदर से भी ज्यादा गहरे हो गये...!**

### वाचा तर खरं

मैत्री हा आयुष्यातील एक कंगोरा असला तरी मैत्रीशी संबंधित विविध पैलूंचा अभ्यास मानसशास्त्रज्ञांच्या संशोधनाचाही विषय आहे. त्यांच्या मते, मित्रांमध्ये मैत्री सात वर्षं किंवा त्यापेक्षा अधिक काळ टिकते तेव्हा ती जन्मभर कायम राहते. ती अभंग राहते. क्षणिक रागलोभ, रुसवे-फुगले रहात असले तरी त्यांची मैत्री तुटत नाही. मानसशास्त्रज्ञ प्रेम या भावनेकडेही शास्त्रीय दृष्टीने पाहतात तेव्हा सांगतात की पुरुष अवघ्या तीन दिवसांत महिलेच्या प्रेमात पडतो मात्र पुरुषांच्या प्रेमात पडायला सरासरी १४ दिवस लागतात.

फॅशन पॅशन

## हटके कॉम्बिनेशन



दोस्तांनो, या मस्त थंडीचा आनंद तुम्हीही घेत असाल. खरं तर आजकाल स्वेटर म्हणजे थंडीपासून बचाव करण्याचा पर्याय राहिलेला नाही तर स्टाईल स्टेटमेंट बनून गेला आहे. मित्रांबरोबर पार्टीला जायचं असो किंवा ब्रंचचा प्लॅन ठरला असो, जीन्सवर स्वेटर घालून आरामात मिरवू शकता. हे कॉम्बिनेशन कसं करायचं याविषयी...

* ब्लॅक स्वेटर, ब्लॅक स्कीनी जीन्स, काळे बूट असं कॉम्बिनेशन करा. काळ्या स्वेटरच्या आत पांढरा शर्ट किंवा टी शर्ट घालता येईल.
* ग्रे स्वेटर, व्हाईट डिस्ट्रेस्ड जीन्स आणि ग्रे शूज हे कॉम्बिनेशन मस्त ठरेल. किंवा लाल स्वेटर, ब्लॅक जीन्स, ब्राउन लोफर्स हे कॉम्बिनेशन कॅरी करता येईल.
* पोलका डॉटवाला स्वेटर, डिस्ट्रेस्ड जीन्स आणि व्हाईट स्नीकर्स या कॉम्बिनेशनमध्ये तुम्ही अगदी उठून दिसाल. ब्लॅक स्वेटर, ग्रे जीन्स आणि ब्लॅक स्लीप ऑन्स हे बेस्ट आहे.
* व्हाईट स्वेटर, लाईट ग्रे जीन्स आणि ब्राउन बूट हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. निळा स्वेटर, ब्लू जीन्स, ब्राउन शूज ही रंगसंगती मस्त दिसेल.

खेचाखेची

## ओव्हरटाईम!

राजाभाऊची एके ठिकाणी नोकरीसाठी मुलाखत सुरू असते.

**मुलाखतकार** : तुम्ही यापूर्वी किती वर्षे नोकरी केली आहे?
**राजाभाऊ** : पंचवीस वर्षे.
**मुलाखतकार** : आणि तुमचं वय किती?
**राजाभाऊ** : अट्ठावीस.
**मुलाखतकार** : अहो कसं शक्य आहे हे?
.
**राजाभाऊ** : (शांतपणे) ओव्हर टाईम केल्यामुळे...

### वेगळे काही

पहाटेच्या वेळी, सूर्य डोक्यावर असताना अथवा मावळत्या तिन्हीसांजेला कधीही घराबाहेर पडल्यावर नभाकडे आपोआप नजर जाते. कापूस पिंजून ठेवल्यासारखे ढग हलकेचं आपलं लक्ष वेधून घेतात. हे सतत तरंगत असलेलं, दिसणारं पण हाती न गवसणारं छप्पर, त्याचं विलोभनीय रूप, त्याचे बदलते रंग आपल्याला मोहात पाडतात. कधी त्यात दूर गेलेल्या एखाद्या प्रियजनाचा शोधावंस वाटतं तर कधी मनातलं चांदणं अंधारात गुडूप होणाऱ्या ढगांआड चमचमत राहतं. ढगांचे हे विभ्रम पाहणं ही अनेकांची सवय, अनेकांचा छंद तर अनेकांचा विरंगुळा असतो. मग याच शोधाशोधीत असे देखणे आकार दृष्टीस पडतात आणि हरखून जायला होतं.

सौंदर्यसाधना

## टिकवा त्वचेचं तारूण्य

साधारणपणे तिशीनंतर चेहरा निस्तेज दिसू लागतो. मग महिला महागड्या अँटी एजिंग क्रीम्सचा वापर करतात. पण यातल्या रसायनांमुळे सुधारण्याऐवजी त्वचेचा पोत बिघडतो. त्यामुळे अशा क्रीम्सऐवजी नैसर्गिक घटकांचा वापर करून त्वचेचं तारूण्य टिकवता येतं हे लक्षात घ्यावं. याविषयी...



* जोजोबा ऑईल्च्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या, फाईन लाईन्स कमी होतात. त्वचा कोरडी, सैल होत असताना जोजोबा तेलातले नैसर्गिक घटक टिश्यूंना दुरूस्त करून तारूण्य टिकवून ठेवतात.
* डाळिंबाच्या दाण्यातील अँटी ऑक्सिडंट्समुळे शरीरातल्या फ्री रॅडिकल्सचं प्रमाण कमी होतं. अँटी एजिंग गुणधर्मामुळे त्वचेचा पोत टिकून राहतो. याच्या सेवनाने सैल पडलेल्या त्वचेला टाइटनिंग इफेक्ट मिळतो. आहारात डाळिंबाचा समावेश करा. याचा फेसपॅक किंवा रस चेहऱ्याला लावावा.
* ग्रीन टी मध्ये बी १२ आणि ई ही जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतात. बी १२ मुळे त्वचेचा तजेला टिकून राहतो तर ई जीवनसत्त्व नव्या पेशींच्या निर्मितीला चालना देतं. यामुळे त्वचा मुलायम बनते. दिवसातून दोन वेळा ग्रीन टी प्यावा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## थारमुळे पोलिसांच्या गाडीला अपघात

**पिंपरी :** नो एन्ट्रीतून अचानक समोर आलेल्या थार गाडीमुळे पोलिसाला आपल्या शासकीय वाहनाला अचानक ब्रेक लावावा लागला. यावेळी झालेल्या अपघातात पुढील काचेवर धडकून कर्मचारी जखमी झाला. थार वाहनाला असलेल्या फॅन्सी नंबर प्लेटमुळे पोलिसांनी पाठलाग करूनही नंबर मिळविता आला नाही. ही घटना पुणे नाशिक महामार्गावर मोशी येथे घडली. पोलीस अमंलदार सागर यशवंत भोसले (वय ४०) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी काळ्या रंगाच्या काळ्या काचा असलेल्या थार वाहन क्रमांक ८०८० (नंबर प्लेट स्पष्ट दिसत नसलेल्या) अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## पोलीस कर्मचाऱ्यांची आई, बहिणीला गोळ्या घालण्याची धमकी

**पिंपरी :** प्रॉपर्टीच्या वादातून एका पोलीस कर्मचाऱ्याने स्वतःच्या आई व बहिणीला अश्लिल शिवीगाळ केली. तसेच त्या दोघींनाही गोळ्या घालण्याची धमकी दिली. ही घटना काळेवाडी येथे घडली. याबाबत काळेवाडी येथे राहणा-या ५४ वर्षीय बहिणीने विनयभंगाची फिर्याद दिली आहे. पोलिसांनी ५३ वर्षीय भावाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पोलीस कर्मचारी आणि त्यांची बहीण यांच्यात आई वडिलांच्या प्रॉपर्टीवरून वाद सुरू आहे. शनिवारी दुपारी पावणेदोन वाजताच्या सुमारास आरोपी पोलीस कर्मचारी आपली पत्नी आणि मुलीसह बहिणीच्या घरी आला. बहिणीसोबत आईदेखील होती.

# तब्बल १२८ मालमत्ता जप्त!

## शनिवार व रविवारी मालमत्ता जप्तीची धडक कारवाई मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून तीन लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, ओद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राध्यान्याने जप्त करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार, विभागाने शनिवार, दिनांक, 28 डिसेंबर व रविवार, दिनांक, 29 डिसेंबर यादिवशीसुद्धा जप्तीची धडक मोहिम राबविली. यामध्ये शनिवारी 65 मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून रविवारी 63 मालमत्तावर जप्तीची कारवाई करण्यात आली. करसंकलन विभागाची जप्तीच्या धडक मोहीम लक्षात घेऊन आणि आपली मालमत्ता जप्त होऊ नये म्हणून शनिवारी 139 मालमत्ताधारकांनी 2 कोटी 91 लाख 13 हजार 770 तसेच रविवारी 89 मालमत्ताधारकांनी 1 कोटी 80 लाख 24 हजार 13 इतका एकूण तब्बल 4 कोटी 71 लाख 37 हजार 783 रुपयांच्या रकमेचा मालमत्ता कराचा भरणा केला.

सदरची मोहिम सात जानेवारीपर्यंत सलग राबविण्याय येणार असून 1 लाखाहून अधिक थकबाकी असणारी एकही बिगरनिवासी, औदयोगिक आणि मिश्र मालमत्ता जप्ती कारवाईमधून वगळली जाणार नाही. शनिवार व रविवार यादिवशी राबविण्यात आलेल्या जप्ती मोहिम यापुढे तीव्र मोहीम स्वरूपात सतत 7 जानेवारीपर्यंत चालूच राहणार असून 1 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या 100 % बिगरनिवासी, ओद्योगिक, मिश्र मालमत्तावर प्राधान्याने मालमत्ता जप्तीची कारवाई करणेत येणार असून यामधून एकही मालमत्ता वगळण्यात येणार नाही. करसंकलन विभागाकडून अन्य कामास प्राधान्य न देता थकबाकीदारांकडून रक्कम वसुलीस /जप्ती मोहिमेस सर्वाधिक प्राधान्य देणार आहे.

त्यामुळे थकबाकीदारांनी आपल्या कराचा ऑनलाईन स्वरूपात भरणा तात्काळ करून मालमत्ता जप्तीची कारवाई टाळावी. तसेच जप्त कार्यवाहीचे वेळेस पुढील दिनांकाचे धनादेश कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत असे सांगण्यात आले.



पिंपरी धडक मोहिम: महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने सलग दोन दिवस जप्तीची धडक मोहिम राबविली होती.





"शहरातील जागरूक नागरिकांनी कायम जागरूकपणे कराचा भरणा करून शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे. महानगरपालिकेने नागरिकांना मालमत्ता करामध्ये विविध सवलती दिल्या असून नागरिकांनी त्याचा लाभ सुद्धा घेतला आहे. आता थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा भरणा करून मालमत्ता जप्तीची कटू कारवाई टाळावी."

**— शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका



"नागरिकांनी कर भरण्यासाठी महानगरपालिकेकडून विविध माध्यमातून वेळोवेळी आवाहन करण्यात आले. अद्यापही ज्या नागरिकांनी कर भरला नाही अशा नागरिकांना आपली मालमत्ता जप्तीस पात्र असल्याची जप्ती पूर्व नोटीस सुद्धा पाठविण्यात आली. तरी अद्याप ज्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तावर मालमत्ता जप्तीची कारवाईची धडक मोहिम सुरू करण्यात आली असून नागरिकांनी थकीत कराचा त्वरित भरणा करून जप्तीची कारवाई टाळावी."

**— प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त(1), पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

# अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी यंत्रणा सज्ज

## पोलिसांकडून असणार विशेष गस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** नववर्षाच्या स्वागतासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील रेस्टो-बार पहाटे पाच वाजेपर्यंत खुले ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. नववर्षाच्या जल्लोषासाठी विविध ठिकाणी खास पार्ट्यांचे आयोजन करण्यात येणार असून, मद्यविक्री मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहरभर कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.

करडी नजर

वाहनांवरील कारवाई

कर्कश आवाज करणारे किंवा ट्रिपल सीट वाहन चालवणाऱ्यांवरही पोलिस तातडीने कारवाई करतील. नववर्षाच्या जल्लोषात सार्वजनिक ठिकाणी अराजकता माजवणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यात येणार आहे.

शहरात सुरक्षेसाठी 1 पोलिस आयुक्त, 6 सहायक आयुक्त, 46 पोलिस निरीक्षक, 154 उपनिरीक्षक, 1520 अंमलदार, 8 स्टायकिंग पथके, 70 वॉर्डन आणि 5 एसआरपीएफ पथक तैनात करण्यात आले आहेत.

ध्वनिप्रदूषणावर विशेष लक्ष

नववर्षाच्या उत्सवात ध्वनिप्रदूषण होऊ नये, यासाठी पोलिसांनी खास खबरदारी घेतली आहे. अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

नववर्षाच्या निमित्ताने धार्मिक स्थळे, मॉल्स, हॉटेल्स, लॉजेस आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांकडून विशेष गस्त घालण्यात येणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी पॉईंट्सवर वाहनांची तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई केली जाईल. मद्यप्राशन करून वाहन चालवणारे, भरधाव वेगाने गाडी चालवणारे किंवा सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्यांवर पोलिसांचे लक्ष असेल.



# माजी सैनिकांनी उद्योजक व्हावे - सतीश हंगे

## भारतीय माजी सैनिक संस्थेची आकुर्डीत वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** माजी सैनिकांनी ज्याप्रमाणे देशाच्या रक्षणासाठी सेवा केली. त्याचप्रमाणे सैनिकांनी सेवा निवृत्तीनंतर उद्योजक म्हणून कार्य करत; देशाचा आर्थिक विकास, सामाजिक उन्नती, प्रगती मध्ये हातभार लावावा असे मत जिल्हा सैनिक कल्याण केंद्राचे अधिकारी सतीश हिंगे यांनी व्यक्त केले.

भारतीय माजी सैनिक संघ, पुणे जिल्हा केंद्राची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, आकुर्डी खंडोबा मंदिर, सांस्कृतिक भवन येथे झाली. यावेळी बँक ऑफ बडोदाचे अधिकारी प्रवीण याज्ञिक, माजी उपमहापौर शैलजा मोरे, राजू मिसाळ, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत उर्फ बाळा शिंदे, ब्रिगेडियर डॉ. संजीव देवस्थळी (नि) बँक ऑफ बडोदा डिफेन्स बँकिंग ॲडवायसर , आयइएसएल, पीडीसी अध्यक्ष सुभेदार मेजर (नि) वाय. एस. महाडिक, उपाध्यक्ष डी. आर. पडवळ, सचिव डी. एच. कुलकर्णी, सहसचिव बी. एच. अबनावे, खजिनदार एम. एन. भराटे, सहसचिव व्ही. व्ही. निकम सदस्य डी. डी. लोहोकरे एस. डी. राजाराम, यु. डी. सुर्वे, कर्नल आर. ई. कुलकर्णी (नि), ले. कर्नल व्ही. व्ही. वेसविकर, श्याम परसोळकर वर्धा, कर्नल साहेबराव शेळके, कैलास जाधव, कमांडर (नि) रामसींग आदी उपस्थित होते.माजी सैनिकांसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना आहेत परंतु याची माहिती बहुतांश माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना नाही. ही माहिती माजी सैनिक संस्थेच्या वतीने सदस्यांपर्यंत पोहोचवावी. उद्योग व्यवसाय उभारणीसाठी शासनाने विविध योजना सुरू केल्या असून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिलेला आहे. मोठे स्वप्न बघून एकत्र येत उद्योग व्यवसायाची उभारणी केल्यास अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. माजी सैनिकांच्या बचत गटामार्फत अनेक व्यवसाय सुरू करता येतील. माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत. या योजनांचा अधिकाधिक निवृत्त माजी सैनिक कुटुंबीयांनी फायदा घ्यावा असे आवाहन सतीश हंगे यांनी केले.

प्रारंभीच्या सत्रात संस्थेची ४१ वी वार्षिक सभा पार पडली. या सर्वसाधारण सभेत माजी सैनिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, त्यांना येणाऱ्या अडचणींची योग्य प्रकारे सोडवणूक व्हावी, संरक्षण विभागाच्या खडकी रूग्णालयात जाण्या - येण्यासाठी वाहतूक व्यवस्थेची सुविधा मिळावी, घर बांधणी, पाल्यांचे शिक्षण, आरोग्य यासाठीच्या योजनांचा फायदा मिळावा यासाठी प्रयत्न करावेत आदी बाबत सर्वानुमते ठराव संमत करण्यात आले.



# ज्येष्ठ नागरिकांनी दिला सरत्या वर्षाला निरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** भावभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण, वाढदिवसानिमित्त सत्कार आणि नववर्षातील संकल्पाची आखणी करत पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या सदस्यांनी सरत्या वर्षाला निरोप दिला. कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर सोमवार दि. ३० रोजी सायंकाळी असोसिएशनच्या वतीने वर्षाअखेरचा कार्यक्रमाचा आयोजित करण्यात आला होता. गुरुवंदनेने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात माजी पंतप्रधान मनमोहनसिंग आणि वर्षभरात असोसिएशनच्या दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. डॉ. सुभाष पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सखाराम ढाकणे, सुभाष पाटील, अनिल कुलकर्णी, निर्मला कासार, शोभा राजगुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. वर्षा अखेरचे औचित्य साधून असोसिएशनचे सदस्य अशोक येळंमकर, पद्मजा गवळी, माधुरी मुलमुले, डी. बी. कडते, अरविंद मनवेलीकर, घनश्याम आणि भगवती स्वामी यांनी यावेळी वैविध्यपूर्ण गाणी सादर करत उपस्थितांचे मनोरंजन केले. दोन ते अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतिश पिंगळे, विवेकानंद लिगाडे, सुभाष विधाते, रमेश वाणी, विजय रोकडे, अशोक येळंमकर, जयपाल सिदनाळे आदींनी परिश्रम घेतले.



पान १ वरून

## वाल्मिक कराड पोलिसांना शरण

होता. सीआयडीच्या पथकाने रविवारी त्याची संपत्ती गोठवली. यानंतर वाल्मीकला अटक कधी होणार हा प्रश्न विरोधक उपस्थित करत होते.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत त्यांनी बीडचा पालकमंत्री व्हावं किंवा नाही व्हावं हा त्यांचा अंतर्गत विषय आहे. पण संतोष देशमुख यांच्या मुलीनं तशी मागणी केल्यानं तिचं कौतुक करावं तितकं कमीच आहे. यासाठी एक सर्वपक्षीय बैठक बोलवावी अन् सर्व पक्षांसोबत चर्चा करून या विषयावर कारवाई करावी.

## प्रदूषण नियमकांचे पालन न करणाऱ्यांवर होणार गुन्हा दाखल!

जाणार आहे. आयुक्तांनी यावेळी बोलतांना, मुंबईत सुमारे २२०० खासगी विकासक तथा संस्था यांची विकासकामे सुरू असून या व्यतिरिक्त शासकीय नागरी सुविधा कामे आणि पायाभूत प्रकल्पांची कामे सुरू असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी दुषित प्रदूषित हवामानाचा निर्देशांक २०० च्या वर आढळून आलेल्या ठिकाणांची म्हणजे बोरिवली पूर्व आणि भायखळा आदी भागांमध्ये सर्व खाजगी व शासकीय विकासकामे बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. येथील सर्व विकासकामे तातडीने बंद करण्यात येत असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली. तर प्रदूषित हवामानाचा निर्देशांक २०० च्या खाली आहे अशा वरळी आणि कुलाबा नेव्ही नगर येथील कामांना प्रदूषण नियंत्रणात आणण्याचा सूचना केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न झाल्यास तेथील कामे आहे तातडीने बंद करण्यात येतील अशा प्रकारची माहिती दिली.

## कर्जबाजारी झाल्याने..

तातडीने रुग्णालयात दाखल केले. कात्रज घाटात चोरट्यांनी अडविले. पैसे न दिल्याने चोरट्यांनी पिस्तुलातून गोळीबार केल्याची माहिती तरुणाने पोलिसांना दिली.त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. कात्रज घाटातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले. तरुणाने दिलेली माहिती संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांची चौकशी केली. चौकशीत कर्जबाजारी झाल्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती त्याने दिली. त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संबंधित तरुणाने बाळगलेले देशी बनावटीचे पिस्तूल कोठून आणले, यादृष्टीने तपास सुरू आहे.

## मोहिनी वाघसह सहा आरोपींची कारागृहात रवानगी

आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आलेली आहे.

नऊ डिसेंबर रोजी सकाळी सव्वासहाच्या सुमारास सतीश वाघ मॉर्निंग वॉकला गेले असताना त्याचवेळी फुरसुंगी फाटा परिसरातून नंबरप्लेट नसलेल्या चारचाकी गाडीतून चौघांनी त्यांचे अपहरण केले होते. याप्रकरणी सतीश यांचा मुलगा ओंकार वाघ (वय 27) याने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. वाघ यांच्या अपहरणाची माहिती मिळताच गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या पथकांनी आरोपींचा शोध सुरू केला होता. मात्र, सतीश वाघ यांचे अपहरण केल्यानंतर दहा ते पंधरा मिनिटांतच आरोपींनी सतीश वाघ यांचा गाडीतच खून केला असल्याची माहिती समोर आली. वाघ यांना तब्बल 72 वेळा चाकूने भोसकण्यात आले. सतीश वाघ यांच्या गळ्यावर सर्वाधिक वार करण्यात आले होते, पाठीवर देखील वार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले होते. वाघ यांचा जीव गेल्यानंतर आरोपींनी मृतदेह शिंदवणे घाटातील निर्जनस्थळी फेकून दिला. सायंकाळी त्यांचा मृतदेह स्थानिक नागरिकांना आढळला.

## धस यांचा विषय...

महिलांची माफी मागितली, दिलगिरी व्यक्त केली. दादा खूप धन्यवाद. असे करून तुम्ही दाखवून दिलात की, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे विचारांचे पाईक आहात.. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेदेखील मनापासून आभार मानते. त्यांनी जातीने लक्ष घातले. अत्यंत संवेदनशीलपणे त्यांनी हा विषय पुढे नेला आणि मार्गी लावला.

## तब्बल एक वर्षात 53 कोटी 97 लाखाचे दान

वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम मंदिर समितीने सुरू केले आहेत. तसेच श्रींच्या पुजेसाठी वाढती मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत २ भाविक कुटुंबियांना संधी, अन्नछत्र सहभाग योजना, महानैवेद्य सहभाग योजना, तुळशी अर्चन पुजा सुरू केल्या असून, त्याची नोंदणी देखील ऑनलाईन करण्यात आली आहे, यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मंदिर समितीस वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, मिळालेल्या दानातून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना चांगल्या व अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

## हिटलरशाही विरोधात अभाविप आक्रमक

घेण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना स्वतःचे हक्क मागण्यासाठी ८ दिवस आधी परवानगी घ्यावी हा नियम अत्यंत चुकीचा आहे. आणि हे परिपत्रक तत्काळ रद्द न झाल्यास अभाविप अजून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल."

"पुणे विद्यापीठ कॅम्पस मध्ये अनेक प्रकारच्या समस्या वेळोवेळी येत असतात, मग त्या हॉस्टेल, मेस किंवा कोणत्याही स्वरूपातील असतील, त्यासाठी ८ दिवस आधी परवानगी कशी मागणार? आणि कोणताही कार्यक्रम किंवा महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यासाठी सुद्धा विद्यापीठाची ८ दिवस आधी परवानगी मागणे हे अत्यंत चुकीचे आहे." असे मत आदित्य डुंबरे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अध्यक्ष यांनी व्यक्त केले.

## संनियंत्रण समिती बैठक संपन्न

**पिंपरी:** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १७ ते १९ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या 'पर्पल जल्लोष- दिव्यांगाचा महाउत्सव' या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आज नियोजनाबाबत संनियंत्रण समिती बैठक पार पडली.

मोरवाडी येथील दिव्यांग भवन येथे आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीस दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, श्रीनिवास दांगट, किरणकुमार मोरे, कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, कैलास दिवेकर, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहायक प्रशासन अधिकारी रझिया खान, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाउंडेशनचे सल्लागार विजय खान्हेकर, अभिजित मुरुगकर, गिरीश परळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, प्रहार दिव्यांग संघटनेचे राजेंद्र वाकचौरे, रामचंद्र तांबे, महिला अध्यक्ष संगीता जोशी यांच्यासह संबधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत 'पर्पल जल्लोष' अर्थात 'उत्सव दिव्यांगत्वचा' या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनाबाबत सर्वंकष चर्चा करण्यात आली. हा कार्यक्रम उत्तम पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वांनी योग्य समन्वय ठेवून नेमून दिलेली जबाबदारी पार पाडावी आदी सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

## पै. पांडुरंग खानेकर यांची पुणे जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड

**भोसरी :** पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाच्या कार्याध्यक्षपदी मुळशी तालुक्यातील नामवंत मल्ल महाराष्ट्र चॅम्पियन पै. पांडुरंग लक्ष्मण खानेकर यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै.संदीप भोंडवे यांच्या प्रमुख उपस्थितीत संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष पै. मेघराज कटके यांनी पुढील पाच वर्षाकरिता नवीन पदाधिकाऱ्यांची जंबो कार्यकारणी जाहिर केली आहे.

2024 ते 2029 या 5 वर्ष कार्यकाळासाठी निवडलेल्या कार्यकारणीत पुणे जिल्ह्यातील 13 तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांना स्थान देण्यात आलेले आहे. पै. पांडुरंग खानेकर हे राष्ट्रीय पंच असून नॅशनल चॅम्पियन, महापौर केसरी, पुणे कामगार केसरीचा किताब मिळविलेले नामवंत मल्ल आहेत.

मुळशीतील अनेक कुस्तीगीर त्यांनी घडविले असून यापूर्वी त्यांनी मुळशी तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्षपद तसेच जिल्हा कार्यकारिणी मध्ये खजिनदार म्हणून काम केले आहे. त्यांचे संघटनात्मक काम पाहून भोंडवे व कटके यांनी त्यांच्यावर जिल्हा कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे.

नवीन कार्यकारणी पुढील प्रमाणे – अध्यक्ष पै. मेघराज कटके, वरिष्ठ उपाध्यक्ष – पै. माऊली ताकवणे कार्याध्यक्ष पै. पांडुरंग खानेकर, खजिनदार पै. नवनाथ घुले, सरचिटणीस पै. प्रदीप बोत्रे, उपाध्यक्ष पै. मारुती मारकड, गणेश दांगट, खंडू वाळुंज, मदन खुटवड , झेंडू पवार, राजेंद्र जगताप, विलास कदम आदी उपस्थित होते.

## केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार - खा. श्रीरंग बारणे

# रतन टाटा यांना भारतरत्न द्यावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतात उद्योग विश्वाची पायाभरणी टाटा कुटुंबीयांमुळे झाली आहे. आज पुणे जिल्ह्याचा औद्योगिक पट्टा जागतिक पातळीवर ऑटोमोबाईल हब म्हणून ओळखला जातो. पिंपरी चिंचवड मधील टाटा मोटर्स आणि राज्यातील टाटा कंपनीच्या इतर उद्योगामुळे महाराष्ट्र देशात नेहमीच उद्योग क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे. कामगारांप्रती आणि सामाजिक उत्तरदायित्व निभवण्यामध्ये देखील टाटा कुटुंबीय नेहमीच अग्रेसर राहिले आहे. यामध्ये रतन टाटा यांचे योगदान मोठे आहे.त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे यासाठी आपण केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.आ. उमा खापरे आणि टीम पिंपरी चिंचवडचे समन्वयक जयदीप उमा गिरीश खापरे यांनी स्वर्गीय रतन टाटा यांना केंद्र सरकारने मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे यासाठी पिंपरी चिंचवड शहरात स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.

त्या अंतर्गत शनिवारी रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यासाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खा. बारणे बोलत होते, आमदार उमा खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली टीम पिंपरी चिंचवडने सुरू केलेले सामाजिक उपक्रम उल्लेखनीय आहेत. यामध्ये रतन टाटा यांना भारतरत्न देण्याची मागणी मागणी महत्वपूर्ण आहे. मी खासदार या नात्याने केंद्र सरकारकडे त्यासाठी पाठपुरावा करणार आहे. या अभिवादन सभेला भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप, उमा खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, भाजपा शहर पदाधिकारी राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे आदी उपस्थित होते.



#रा

## At a Glance

### सीबीआय निरीक्षकाचे पदक जप्त

**नवी दिल्ली :** सीबीआयचे निरीक्षक राहुल राज यांना १० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आल्यानंतर, सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. आता त्यांना मिळालेले पदक सरकारने रद्द केले आहे. सीबीआयचे संचालक प्रवीण सूद यांच्या शिफारशीनुसार सीबीआयच्या अंतर्गत दक्षता प्रक्रियेत आढळलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

### बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेसाठी प्रार्थना

**कोलकाता:** शेख हसीना सरकार कोसळल्यापासून बांगलादेशातील हिंदूंना हल्ल्यांचा सामना करावा लागत असून, तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेसाठी इस्कॉनच्या भाविकांनी मंगळवारी कोलकात्यात प्रार्थना केली. इस्कॉनच्या (इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्ण कॉन्शियसनेस) शेकडो अनुयायांनी 'हरे कृष्णा'चा जयघोष केला.

### निवासी मालमत्तांच्या नोंदणीत वाढ

**नवी दिल्ली :** पुणे, मुंबई महानगर प्रदेश, बेंगळुरू, हैदराबाद आणि नोएडा सह आठ शहरांमधील निवासी मालमत्तांची नोंदणी या वर्षी ४ टक्क्यांनी वाढून ५.७७ लाख युनिट झाली आहे. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, बेंगळुरू, हैदराबाद, नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गाझियाबाद मधील बाजारपेठांमध्ये २०२४ मध्ये ५.७७ लाख निवासी व्यवहारांची नोंद झाली.

# युक्रेननंतर फिनलँडचा नंबर?

## रशिया फिनलँडसह बाल्टिक देशांवर हल्ल्यांच्या तयारीत

रशिया फिनलँड आणि इतर बाल्टिक देश आणि शेजारच्या देशांवर हल्ले करण्याच्या तयारीत आहे. नाटोच्या सूत्रांनी सदस्य देशांना रशियाच्या हेतूबद्दल इशारा दिला असून, सावधगिरी बाळगण्यात सांगितले आहे



मॉस्को
रशिया आणि युक्रेन यांच्यात जवळपास तीन वर्षांपासून युद्ध सुरू असून त्याचे हे संग्रहित छायाचित्र.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** रशिया आणि युक्रेन यांच्यात जवळपास तीन वर्षांपासून युद्ध सुरू आहे. रशिया युक्रेनवर धोकादायक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे हल्ला करत आहे आणि अंतर्गत भागातील युक्रेनचे तळ उद्ध्वस्त करत आहे. दरम्यान, उत्तर युरोपातील देश आणि रशियाचा पश्चिम शेजारी देश फिनलँड आणि त्याच्या शेजारी देशांना रशियन हल्ल्याचा धोका निर्माण झाला आहे. माध्यमातील वृत्तानुसार, रशिया फिनलँड आणि इतर बाल्टिक देश आणि शेजारच्या देशांवर हल्ले करण्याच्या तयारीत आहे. नाटोच्या सूत्रांनी सदस्य देशांना रशियाच्या हेतूबद्दल इशारा दिला असून, सावधगिरी बाळगण्यात सांगितले आहे. मात्र, हे हल्ले किती काळ होऊ शकतील, याबाबत कोणतीही स्पष्ट कालमर्यादा नमूद करण्यात आलेली नाही.

या अहवालात रशियाच्या मागील लष्करी सरावांचा हवाला देत म्हटले आहे की, मॉस्कोने २०१७ मध्ये लष्करी सराव केला होता. यावेळी पुतिन यांच्या सैन्याने नॉर्वे, फिनलँड आणि बाल्टिक देशांवर हल्ले करण्याचा छद्म सराव केला. रशियाने अद्याप आपल्या आक्रमणाची योजना सोडलेली नसून, युक्रेनमधील युद्ध संपल्यानंतर रशिया पश्चिम किनाऱ्यावरील इतर देशांना आपले पुढचे लक्ष्य बनवू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

भविष्यात उत्तर फिनलंड आणि नॉर्वेमध्ये बफर झोन तयार करण्याच्या रणनीतीवर ही रशिया काम करत आहे, असेही अहवालात म्हटले आहे. रशियाचे क्षेपणास्त्र दल फिनलंडच्या दक्षिण आणि आग्नेय किनारपट्टीलाही लक्ष्य करू शकते. त्याचवेळी मॉस्कोचे सहावे सैन्य एस्टोनिया आणि लॅटव्हिया आणि जॉर्जिया या बाल्टिक देशांच्या राजधानींवर हल्ले करून त्यांना तोडण्याचा प्रयत्न करू शकते. रशियाला कालिनिनग्राड आणि बेलारूस दरम्यान लँड कॉरिडॉर स्थापन करायचा आहे आणि त्यासाठी बेलारूसचा मार्ग म्हणून वापर करण्याचा प्रयत्न करत असल्याने लिथुआनिया या आणखी एका बाल्टिक देशाला धोका असल्याचेही अहवालात सूचित करण्यात आले आहे.

या अहवालाला उत्तर देताना फिनलँडच्या संरक्षण दलांनी म्हटले आहे की, लष्करी सराव हा कोणत्याही लष्करी कारवाईचा एक सामान्य भाग आहे आणि संभाव्य हल्ला म्हणून त्याकडे पाहू नये. तथापि, भीतीदायक बाब म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आपला जुना आणि ऐतिहासिक प्रदेश परत मिळवण्याचा आपला हेतू आणि आपली दृष्टी बऱ्याच काळापासून स्पष्ट केली आहे.



### रशिया एकाच वेळी हल्ले करू शकतो

● वृत्तपत्राने नाटोच्या सूत्रांच्या हवाल्याने असेही म्हटले आहे की, रशिया नाटो सदस्य देशांच्या पूर्व भागावर एकाच वेळी हल्ला करण्याची योजना आखू शकतो. यात रशियाच्या १४ व्या आर्मी कॉर्प्सचा समावेश असू शकतो. रशिया इवालो विमानतळ ताब्यात घेण्यासाठी लॅपलँड (फिनलँडचा सर्वात उत्तरेकडील प्रदेश) येथे सैन्य तैनात करू शकतो आणि कोला द्वीपकल्पावर तैनात रशियन क्षेपणास्त्र सैन्य संभाव्यत: फिनलंडला लक्ष्य करू शकते.

### आर्क्टिक पासून भूमध्य सागरापर्यंत

● नाटोच्या संरक्षण धोरणाचे महत्त्वाचे केंद्र असलेल्या सुवाळ की कॉरिडॉरवर कब्जा करण्याचा रशियाचा प्रयत्न असण्याची शक्यता या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. फिनिश सरकारच्या अहवालानुसार, रशियाची ही सुरक्षा रणनीती आर्क्टिकपासून भूमध्य सागरापर्यंत बाल्टिक समुद्र आणि काळ्या समुद्राला घेरणारा बफर झोन तयार करण्याच्या इच्छेने प्रेरित आहे. स्वीडनच्या सशस्त्र दलांचे माजी प्रमुख मिकेल बायडेन यांनी बाल्टिक समुद्रावर नियंत्रण प्रस्थापित करणे हे रशियाचे दीर्घकालीन ध्येय असू शकते.

# मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांची हिंसाचाराप्रकरणी माफी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी गेल्या वर्षी राज्यात घडलेल्या घटनांबद्दल तीव्र खेद व्यक्त केला असून जनतेची माफी मागितली आहे. 'हे संपूर्ण वर्ष अत्यंत दुर्दैवी आहे. मला खूप खेद आहे आणि मी राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की ३ मे पासून आतापर्यंत जे काही घडले त्याबद्दल मी माफी मागतो. या घटनांमध्ये अनेकांनी आपले प्रियजन गमावले आणि अनेकांना आपले घर सोडावे लागले. याचा मला खूप पश्चाताप आहे, मी सर्वांची माफी मागू इच्छितो, असेही ते म्हणाले. मात्र, गेल्या तीन-चार महिन्यांत राज्यात शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने सकारात्मक प्रगती झाली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

नवीन वर्ष २०२५ पर्यंत मणिपूरमध्ये संपूर्ण शांतता आणि सामान्य परिस्थिती प्रस्थापित होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व समाजाला आवाहन करताना म्हटले की, जे काही झाले ते झाले. भूतकाळातील चुका विसरून आता नव्या नेत्याची सुरुवात करायची आहे.

शांत मणिपूर, समृद्ध मणिपूर, आपण सर्वांनी मिळून येथे राहायला हवे, असे आवाहन त्यांनी केले.



"जे काही झाले ते झाले. भूतकाळातील चुका विसरून आता नव्या नेत्याची सुरुवात करायची आहे. शांत मणिपूर, समृद्ध मणिपूर, आपण सर्वांनी मिळून येथे राहायला हवे"
**— एन. बिरेन सिंह**
मुख्यमंत्री, मणिपूर

**धुमसते मणिपूर**

इंफाळमध्ये पत्रकार परिषदेत हिंसाचार हाताळण्याच्या पद्धतीवरून विरोधकांच्या टीकेला सामोरे गेलेले मुख्यमंत्री म्हणाले की, मणिपूरमध्ये शांतता परत येत आहे. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित होत असून चर्चा आणि चर्चेतूनच एकमेव तोडगा निघतो, जो केंद्र सरकारने यापूर्वीच सुरू केला आहे, असे सिंह म्हणाले.

मणिपूरमध्ये ३ मे २०२३ पासून आरक्षण आणि आर्थिक लाभांवरून बहुसंख्य मेइती आणि कुकी यांच्यात तुरळक हिंसाचार सुरू आहे. सध्या सुरू असलेल्या हिंसाचारात २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे तसेच हजारो लोक विस्थापित झाले.

# मुर्शिदाबाद : दोघा घुसखोरांना अटक

## दहशतवादी संघटनेशी होता संबंध: आत्मघातकी हल्लेखोरांचे जाळे उभारण्याचा कट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगाल पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने (एसटीएफ) सोमवारी मुर्शिदाबाद जिल्ह्यातून दोघांना अटक केली आहे. सजीबुल इस्लाम (२४) आणि मुस्तकीम मंडल (२६) अशी आरोपींची नावे आहेत. हे दोघेही अल-कायदाशी संबंधित अंसारुल्ला बांगला टीम (एटीबी) या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचे सांगितले जाते. जिल्ह्यातील मिनारुल शेख आणि मोहम्मद अब्बास यांना यापूर्वी अटक करण्यात आली होती. मिनारूल आणि अब्बास यांच्यावर मुलांना कट्टरतावादी बनवणे आणि आत्मघातकी हल्लेखोर तयार केल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिनारूल आणि अब्बास हे १२ ते १६ वयोगटातील मुलांना लक्ष्य करून स्थानिक मदरशांमध्ये कट्टरपंथी विचारसरणीच्या मुलांना भरती करत होते. या मुलांना आत्मघातकी हल्ल्यांचे प्रशिक्षण दिले जात होते. मुर्शिदाबाद, नादिया, उत्तर दिनाजपूर आणि अलीपुरद्वार येथे ३० आत्मघातकी हल्लेखोरांचे जाळे उभारण्याचा कट पोलिसांनी आखला होता. मदरशांमध्ये एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून मुलांना प्रशिक्षण देण्यात आल्याचेही समोर आले. एटीबीच्या बंगाल शाखेचे नेते आमीर आणि जसीमुद्दीन हे प्रशिक्षण घेत होते.

### राजकीय उलथापालथ सुरू

● या मुद्द्यावरून तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षात राजकीय युद्ध सुरू झाले आहे. सीमा सुरक्षा राखण्यात केंद्र सरकार अपयशी ठरल्याने दहशतवादी बंगालमध्ये घुसखोरी करत असल्याचा आरोप टीएमसीने केला आहे. राज्यातील सत्ताधारी पक्ष बंगालला दहशतवाद्यांचे नंदनवन बनवत असल्याचा आरोप भाजपने केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. मुर्शिदाबाद आणि लगतच्या जिल्ह्यांमध्ये एटीबीच्या जाळ्याची चौकशी तीव्र करण्यात आली आहे. येत्या काळात आणखी मोठे खुलासे होऊ शकतात, असा दावा पोलिसांनी केला आहे.



## पालघर प्रकरणी कठोर कारवाई करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** पालघर शहरात आठ वर्षाच्या मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करा, असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत. या घटनेतील आरोपी रसूल इब्राहिम सोळंकी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीचे किराणा मालाचे दुकान असून रविवार दि. २९ डिसेंबर रोजी तो खाऊ देण्याच्या बहाण्याने मुलीला दुकानात घेऊन गेला. तिथे त्याने तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. त्यानंतर मुलीने घडलेला प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. त्यानंतर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# समृद्धी महामार्गावर वाहनांच्या रांगा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर एक विचित्र घटना घडली आहे. येथे एकापाठोपाठ ५० वाहने पंक्चर झाली. याचे कारण म्हणजे रस्त्यावर पडलेला लोखंडी बोर्ड. ही घटना २९ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास वाशिम जिल्ह्यातील मालेगाव ते वनोजा टोला प्लाझादरम्यान घडली. यावेळी अनेक चारचाकी व मालवाहू ट्रक पंक्चर झाले. त्यामुळे महामार्गावर लांबच लांब कोंडी झाली होती. बराच वेळ मदत न मिळाल्याने प्रवाशांना रात्रभर तेथेच थांबावे लागले.

हा फलक स्वत:हून रस्त्यावर पडला की कोणी मुद्दाम तिथे फेकला, याचा तपास आता केला जात आहे. हायस्पीड कॉरिडॉरच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असताना ही घटना घडली आहे. जून महिन्यात दोन कारच्या धडकेत सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर चार जण जखमी झाले होते. जालना जिल्ह्यातील कडवंची गावात समृद्धी महामार्गावर हा अपघात झाला. समृद्धी महामार्ग हा सहा पदरी आणि ७०१ किलोमीटर लांबीचा द्रुतगती महामार्ग असून, तो अद्याप पूर्णपणे तयार झालेला नाही. मुंबई आणि नागपूरला जोडणारा हा देशातील सर्वात मोठा ग्रीनफिल्ड रोड प्रकल्प आहे. ५५ हजार कोटी रुपये खर्च करून हा महामार्ग बांधण्यात आला.



## नाशिक @ ९.५ डिग्री सेल्सियस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** दोन दिवसांच्या बेमोसमी पावसामुळे शहरातून गायब झालेली थंडी पुन्हा जाणवायला सुरुवात झाली आहे. नाशिकमध्ये गारठा मोठ्या प्रमाणावर वाढला असून, वातावरणात चांगलाच गारवा वाढला आहे. मागील दोन दिवसांपासून नाशिकचा पारा सारखा खाली सरकत असल्याचे दिसून येत आहे. रविवार, दि. ८ डिसेंबर रोजी १२.५ अंश असलेले तापमान सोमवार, दि. ९ डिसेंबर रोजी ३ अंशांनी घसरुन ९.५ अंशांवर आले. तर मंगळवार, दि. १० डिसेंबर रोजी पारा आणखी खालावत ९.४ अंशावर पोहोचला. सलग तीन दिवस घसरलेल्या पाऱ्यामुळे नाशिककरांना रात्रीसोबत दिवसाही चांगलीच हुडहुडी भरल्याचे दिसून येत आहे. बुधवार, दि. १८ डिसेंबर रोजीपर्यंत थंडी कायम राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## मना मनातून आज उजळले आनंदाचे लक्षदिवे

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



ऑकलंड
**हॅपी न्यू इयर!** न्यूझीलंडची राजधानी ऑकलंडमधील नागरिकांनी जगात सर्वप्रथम नववर्ष साजरे करण्यास सुरुवात केली. येथे ३१ डिसेंबरच्या रात्री १२ वाजता नागरिकांनी रस्त्यावर उतरून नव्या वर्षाचे जोरदार स्वागत केले.

## मुंबई-गोवा महामार्गास प्राधान्य देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात रस्त्यांचे जाळे विकसित करून ग्रामीण भागांना शहरांशी जोडण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या विभागाचा मंत्री म्हणून मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामास प्राधान्य देणार असल्याची ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंगळवारी दिली. सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राज्याची सर्वांगीण प्रगती ही पायाभूत सुविधांवर अवलंबून असते. राज्यात दर्जेदार रस्त्यांचे जाळे विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे.

# नितेश राणे यांनी केरळची बदनामी केली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**केरळ :** केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी नितेश राणे यांच्यावर केरळची बदनामी केल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय आणि जहाजबांधणी मंत्री नितेश राणे यांनी केरळला मिनी पाकिस्तान म्हटले आहे. राणे यांचे हे विधान अत्यंत आक्षेपार्ह आणि निंदनीय आहे. संघ परिवार केरळविरोधी अजेंडा कसा राबवत आहे आणि त्याची बदनामी करत आहे, हे अशा भाषणांतून दिसून येते. केरळ ही धर्मनिरपेक्षता आणि सांप्रदायिक सलोख्याची भूमी आहे. केरळविरोधात अशा आक्षेपार्ह वक्तव्यांचा आम्ही निषेध करतो. इतकंच नाही तर केरळच्या जनतेने आरएसएसच्या या घृणास्पद अजेंड्याच्या विरोधात एकत्र यायला हवं, असा दावा पिनराई विजयन यांनी केला आहे.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते नारायण राणे यांचे चिरंजीव नितेश राणे यांनी यापूर्वीही अशी वादग्रस्त विधाने केली आहेत. नुकतेच त्यांनी वायनाड लोकसभा मतदारसंघातून प्रियांका गांधी यांच्या विजयावर भाष्य केले होते. नितेश राणे म्हणतात की, राहुल गांधी आणि प्रियांका वाड्रा हे दोन्ही भाऊ-बहीण केरळमधून निवडणूक लढवायला जातात कारण तिथून त्यांना जिंकणं सोपं जातं. केरळमधील मुस्लीम लोकसंख्येबाबत वादग्रस्त वक्तव्य करताना, केरळला 'मिनी पाकिस्तान' असे संबोधले होते. नितेश राणे म्हणाले होते की, केरळ हा मिनी पाकिस्तान आहे.

# अजिंठा लेणीसाठी इलेक्ट्रिक बसेस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र पर्यटन विभागाने पर्यटकांना विनाअडथळा अजिंठा लेणीपर्यंत नेण्यासाठी २० इलेक्ट्रिक बसेसचा ताफा सुरू केला आहे, अशी माहिती शुक्रवारी एका अधिकाऱ्याने दिली. जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी पहिली इलेक्ट्रिक बस सुरू करण्यात आली.

**पर्यटन**

या बसेस सर्व आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहेत. या बसेस प्रवाशांना पार्किंगमधून गुहा संकुलापर्यंत पोहोचवतील.अजिंठा लेण्यांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी आरामदायी, त्रासमुक्त आणि पर्यावरणपूरक अशी सुलभ वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे हा यामागील उद्देश आहे. या बसेसमुळे पर्यटकांचा प्रवास अविस्मरणीय होणार आहे.

पर्यटन विभागाचे सहाय्यक संचालक विजय जाधव म्हणाले, २० इलेक्ट्रिक बसेसचा हा ताफा अजिंठा लेणी या जागतिक वारसास्थळाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांसाठी सोईस्कर ठरणार आहे. यापूर्वी पारंपारिक डिझेल बसेस वापरात होत्या, परंतु बसच्या फेऱ्यांमुळे पर्यटकांना बराच वेळ वाट पाहावी लागत असे. आता या नवीन इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्यामुळे वाहतूक तर जलद होईलच, शिवाय ती पर्यावरणपूरकही असेल.

# श्रीसाईचरणी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद

**नवीन २०२५ हे वर्ष संपूर्ण मानव जातीसाठी सुखकारक आणि भरभराटीचं जावो**

**"मी माझं सौभाग्य मानतो की नववर्षाच्या पूर्वसंध्येला शिर्डीला येवून साईबाबांच दर्शन घेता आलं. संपूर्ण मानवजातीच्या सुख शांतीसाठी साईंच्या चरणी प्रार्थना केली. तसंच देश आणि अखंड जग ज्या आव्हानांना सामोरं जात आहे, त्या आव्हानांना पेलण्यासाठीदेखील साई चरणी प्रार्थना केली असून येणारं नवीन २०२५ हे वर्ष संपूर्ण मानव जातीसाठी सुखकारक आणि भरभराटीचं जावो,"**
**— रामनाथ कोविंद**
भारताचे माजी राष्ट्रपती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिर्डी :** भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंगळवारी शिर्डीत येत पत्नी कविता कोविंद यांच्यासह साई मंदिरात जावून साईंच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. यावेळी कोविंद यांनी साईबाबांच्या समाधीवर वस्त्रही अर्पण केलं. याप्रसंगी साईबाबा संस्थानचा वतीनं शाल आणि साईबाबांची मूर्ती देवून कोविंद यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना कोविंद यांनी,"मी माझं सौभाग्य मानतो की नववर्षाच्या पूर्वसंध्येला शिर्डीला येवून साईबाबांच दर्शन घेता आलं. संपूर्ण मानवजातीच्या सुख शांतीसाठी साईंच्या चरणी प्रार्थना केली. तसंच देश आणि अखंड जग ज्या आव्हानांना सामोरं जात आहे, त्या आव्हानांना पेलण्यासाठीदेखील साई चरणी प्रार्थना केली असून येणारं नवीन २०२५ हे वर्ष संपूर्ण मानव जातीसाठी सुखकारक आणि भरभराटीचं जावो," अशी प्रार्थना साई चरणी केल्याचं म्हटलंय.



**कोणते राष्ट्रपती आले शिर्डीत**
**देशाचे राष्ट्रपती असताना शंकरदयाल शर्मा, प्रतिभाताई पाटील, प्रणव मुखर्जी, रामनाथ कोविंद आणि विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिर्डीत येवून साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं आहे.**

दरम्यान, रामनाथ कोविंद मंदिर परिसरामधून साई मंदिरात जात असताना उपस्थित असलेल्या भाविकांना त्यांनी अभिवादन केलं. तसंच यावेळी मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या काही लहान मुलांनी कोविंद यांना गुलाबपुष्प देवून शुभेच्छाही दिल्या. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद साईंच्या दर्शनासाठी येणार असल्यानं भाविकांनी त्यांना पाहण्यासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती.

यापूर्वी रामनाथ कोविंद राष्ट्रपतीपदी असताना १ ऑक्टोबर २०१७ रोजी साई समाधी शताब्दी वर्षाचे तसंच शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन देखील कोविंद यांच्या हस्ते पार पडलं होतं.

» Selected

## वाघाळे सरपंचपदी अनिता शेळके



**रांजणगाव गणपती :** वाघाळे येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अनिता दिलीप शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळत्या सरपंच नलिनी थोरात यांनी राजीनामा दिल्याने ही पोटनिवडणूक घेण्यात आली. मंडलाधिकारी स्वाती तावरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पहिले तर कामगार तलाठी तेलंग, ग्रामसेवक शितल भालसिंग यांनी त्यांना सहाय्य केले. याप्रसंगी मावळत्या सरपंच नलिनी थोरात, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भोसले, राजेंद्र धायबर, विकास कारकुड, नंदा शेळके, अनिता गावडे, संगीता थोरात यांसह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयाचे विज्ञान प्रदर्शनात यश



**जुन्नर :** राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या अनुषंगाने, पुणे जिल्हा परिषद, पंचायत समिती जुन्नर (शिक्षण विभाग) व जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने तालुका विज्ञान प्रदर्शन व मेळावा समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, बेल्हे (बांगरवाडी) या ठिकाणी संपन्न झाला. यामध्ये विज्ञान प्रकल्प स्पर्धेबरोबरच संगणकीय सादरीकरण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा, पोस्टर सादरीकरण स्पर्धा, चला प्रयोग करूया, आयडिया बॉक्स या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय, जुन्नरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले. पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सुधीर ढोबळे, उपाध्यक्ष संजय बुट्टे पाटील, कार्याध्यक्ष धनेश संचेती, सचिव अविनाश थोरवे, जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे सर्व कार्यकारिणी सदस्य, विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक सदानंद उकिर्डे यांनी विद्यार्थ्यांचे व विद्यालयातील विज्ञान शिक्षक सुष्मा बनकर, शिला मोढवे, प्रशांत थोरात, रेशमा लेंडे,सारिका मोरे,श्वेता चौगुले यांचे अभिनंदन केले.

## चित्रकला स्पर्धा वडवलीत उत्साहात



**पारगांव :** जिल्हा परिषद पुणे च्या शिक्षण विभाग अंतर्गत केंद्रस्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पारगाव केंद्रातील सर्व १४ शाळांनी सहभाग नोंदवला. इयत्ता पहिली दुसरीचा गट व तिसरी ते पाचवीचा गटाच्या दोन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता पहिली दुसरी साठी निसर्ग चित्र आणि तिसरी चौथीसाठी माझी शाळा यासारखे विषय देण्यात आले होते. मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी केंद्रप्रमुख कैलास आढागळे, महादेव दिवेकर, शिवाजी वामन, किसन दिवेकर, संतोष कांबळे, सुभाष वीर, भानुदास भोसले, संदीप थोरात, नितीन ताकवणे यांनी नियोजनात भाग घेतला. प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## बारवमधील बारा बावडीची दुरवस्था

**जुन्नर :** जुन्नर शहरालगतच्या बारव गावातील जुन्नर नगर परिषद मालकीच्या बारा बावडी विहिरीची सध्या मोठी दुरवस्था झालेली असून या विहिरीचा कोणताही वापर गेल्या अनेक वर्षांपासून होत नाही. वापरा विना असलेल्या या विहिरीमध्ये पडून काही जणांचे मृत्यू झालेले असल्याने धोकादायक असलेली ही विहीर तातडीने बंदिस्त करून घ्यावी, अशी मागणी बारव ग्रामस्थांच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आलेली आहे. बारव हे गाव नव्याने विकसित होत असुन येथील लोकवस्ती वाढत आहेत. या गावाच्या एका टोकाला बारा बावडी ही ऐतिहासिक मोठी विहीर आहे. पूर्वी या विहिरीतील पाण्याचा वापर जुन्नर शहराकरिता होत होता. नगर परिषद मालकीची ही विहीर गेल्या अनेक वर्षांपासूनची आहे. परंतु या ऐतिहासिक विहिरीकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष असल्याने या विहिरीची मोठी पडजड झालेली असून ती ढसाळत चाललेली आहे. कोणत्याही वापरा विना ही विहीर आहे. या विहिरीच्या पाण्यात बुडून दोन मुलांचा मृत्यू गेल्या काही दिवसांपूर्वी झालेला आहे. या बाबत तातडीने उपाय योजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आलेला आहे.

# मानवंदनेला झाली सुरुवात

## कोरेगाव परिसरात हजारों भिमसैनिकांची उत्साहात हजेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शौर्य दिनी कोरेगाव भीमा येथे असलेल्या ऐतिहासिक विजयरणस्तंभ या ठिकाणी मानवंदना देण्यासाठी देशभरातून अनेक भीमसैनिक येत असून या वर्षी विजयस्तंभावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह व संविधान प्रतिमा लावून विशेष सजावट करण्यात आलेली असताना नुकतीच सजावट पूर्ण होऊन येथे मानवंदना देण्यासाठी अनेक भीमसैनिक एक दिवस आधीच परिसरात दाखल झाले असताना पोलिसांचा मोठा फौजफाटा या ठिकाणी दाखल झाला असल्याने विजयस्तंभ परिसर दुमदुमून गेला आहे.

कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी शौर्यदिनी झालेल्या हिंसाचारामुळे कोरेगाव भीमा परिसराला वेगळे रूप आलेले होते, त्यांनतर प्रत्येक वर्षी प्रशासनाने योग्य खबरदारी घेतली असताना या वर्षी मोठ्या प्रमाणात भीमसैनिक येथे दाखल होणार असल्याने प्रशासनाने जय्यत तयारी केली असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झालेले आहेत.

कोरेगाव भीमा व पेरणे परिसरात सुमारे आठ ते दहा हजार पोलिसांचा बंदोबस्त, अग्निशामक बंब, रुग्णवाहिका, कॅमेरे, द्रोण कॅमेरे, दुर्बीण, वज्र वाहन यांसह आदी अत्यावश्यक सुविधांची सोय करण्यात आली आहे, तर आता एक जानेवारी रोजी साजरा होणाऱ्या २०७ व्या शौर्यदिनाच्या च्या कार्यक्रम साठी अनेक ठिकाण हून भीम सैनिक कोरेगाव भीमा, पेरणे परिसरात दाखल झाले आहेत. तर प्रशासनाच्या वतीने देखील बंदोबस्ताचा आढावा घेण्यात आला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त दाखल झाला असल्यामुळे कोरेगाव भीमा, सणसवाडी, शिक्रापूर, पेरणे परिसराला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तर भीम सैनिक येथे दाखल होऊ लागले असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भीम सैनिकांची हजेरी येथे लागली आहे





कोरेगाव भीमा : येथे येथील ऐतिहासिक विजय स्तंभाला करण्यात आलेली सजावट व विजयस्तंभ परिसरात दाखल झालेले भीमसैनिक ( छायाचित्र - शेरखान शेख )

पुणे

## शिक्रापूर व कोरेगाव भीमात वरुण वज्र वाहन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे १ जानेवारी रोजी झालेल्या हिंसाचारानंतर प्रत्येक वर्षी प्रशासन विशेष खबरदारी घेत असून या वर्षीचा एक जानेवारी रोजीचा मानवंदना कार्यक्रम शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन वेगवेगळे पर्याय वापरत विशेष खबरदारी घेऊन कार्यक्रम तयारी पूर्ण करत असताना आता कोरेगाव भीमा सह शिक्रापूर परिसरात वरुन वज्र वाहन देखील दाखल झले आहे.

कोरेगाव भीमा व सणसवाडी परिसरात १ व २ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमिवर प्रत्येक वर्षी प्रशासन विशेष खबरदारी घेत आहे. मात्र या वर्षी कोरेगाव भीमा सह परिसरामध्ये हजारो पोलिसांच्या फौजफाट्यासह वरुन व वज्र वाहने, दाखल. कोरेगाव भीमा येथे दाखल झालेल्या वरुन वज्र वाहनातून शंभर ते सव्वाशे फुट उंच व लांब अंतरावर मोठ्या वेगाने पाण्याचे फवारे मारले जातात. त्यामुळे काही अडचण निर्माण झाल्यास तसेच जमाव लांबविण्यासाठी याचा वापर केला जातो. वज्र वाहनातील पाण्यामध्ये रंग मिसळून वेगवेगळ्या रंगाचे पाणी या वाहनाद्वारे टाकून, जमाव लांबविण्यास मदत होते. तसेच उंचावर अथवा लांब लागलेली आग सदर वाहनाद्वारे विझविण्यास मदत होते. अशा पद्धतीचे वरुण वज्र वाहन कोरेगाव भिमा व शिक्रापूर परिसरात दाखल झाले आहे.

# आयुक्तांची विजयस्तंभाला भेट

## डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व अमितेश कुमार : यांनी कली पाहणी


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमासह पेरणे येथे १ जानेवारी रोजी होणाऱ्या २०७ व्या अभिवादन दिनाची प्रशासनाकडून तयारी पूर्ण होत असताना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विजयस्तंभाला भेट देत तयारीची पाहणी केली आहे.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे १ जानेवारी रोजी २०७ वा शौर्यदिन साजरा होत असताना येथे प्रशासनाकडून तयारी सुरु असताना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी भेट देत विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची पाहणी केली. यावेळी पोलीस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, कोरेगाव भीमा विजयस्तंभ सेवा संघाचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे, भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विजयस्तंभाचे सुशोभीकरण, गर्दी व्यवस्थापन, रांगा व्यवस्थापनाचे केलेले नियोजन, आजूबाजूच्या जागेचे सपाटीकरण तसेच परिसरात उभारण्यात येत असलेली शौचालये, पेंडाल, पोलीस सूचना मनोरे यांसह आदी तयारीची व सोयी सुविधांची पाहणी करून संबंधित विभागांना सूचना देत विजयस्तंभ परिसरात उपस्थित विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहे.

**पाहणी दौरा...**

● कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे १ जानेवारी रोजी २०७ वा शौर्यदिन साजरा होत असताना येथे प्रशासनाकडून तयारी सुरु असताना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी भेट देत विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची पाहणी करुन योग्य त्या सूचना दिल्या.



## २३४ प्रकरणातून १ लाख ८५ हजार २५० रुपयांची व २७ बुलेटसह २३४ वाहनांवर दांडात्मक बडगा...

# वाहतूक शाखेची कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** वाहतूक नियमांची पायमल्ली करून बेशिस्तपणे दुचाकी चालवणाऱ्या टुकार वाहनचालकांना बारामतीच्या वाहतुक शाखेने चांगलाच दणका दिला आहे. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांचेकडून वाहतूक पोलिसांसोबत दोन दिवस करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २३४ कारवाया करून या दुचाकीचालकांना तब्बल १ लाख ८५ हजार २५० रुपयांचा आर्थिक दंड करण्यात आला आहे.

दि. २७, २८, २९ डिसेंबर या कालावधीत वाहतूक शाखेकडून दुचाकी चालकांकडून ट्रिपल सीट दुचाकी चालवणे, वाहन परवाना जवळ न बाळगणे, दुचाक्यांना अवाढव्य आवाजाचे सायलेंसर बसवणे, दुचाकी चालवताना मोबाईलवर बोलणे अशा अनेक कारणांवरून कारवाया करण्यात आल्या. विशेष म्हणजे यात बुलेट गाड्यांवर अधिक लक्ष केंद्रित करून कारवाईची मोहीम राबवण्यात आली. बारामती येथील कसबा चौक व न्यायालय कॉर्नर चौक, फलटण चौक व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथे ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत ट्रीपल सीट २५, वाहन चालक परवाना जवळ न बाळगणे ५५, नंबर प्लेट संदर्भात ५६, विना परवाना वाहन चालविणे ०४, वाहन चालवताना मोबाईल फोनवर बोलणे ०६, बुलेटचे मूळ सायलेंसर बदलणे २७ व इतर ५० अशा एकूण २३४ प्रकरणांमधून तब्बल १ लाख ८५ हजार २५० इतका दंड करण्यात आला आहे. वाहतूक पोलिसांनी याअगोदरही मोठ्या दंडात्मक कारवाया करून वाहतूक व्यवस्था व नियमांची अंमलबजावणी करण्यात आली होती.



> **बारामती शहरातील काही भागात बुलेट गाड्यांचे सायलेंसर काढून फटाका आवाज काढतात. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून दुचाकीवरून स्टंटबाजी करणे, महिला-मुलींना त्रास देणे असे प्रकार करू नयेत. अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. येत्या कालावधीत शाळा कॉलेजेस मध्ये जनजागृती मोहीम सुद्धा सुरू करण्यात येणार आहे.**
>
> **~चंद्रशेखर यादव,** पोलीस निरीक्षक, बारामती वाहतूक शाखा.

# मांजरवाडीत बिबट्या जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील मांजरवाडी येथील खंडागळे मळ्यातील शेतकरी खंडू रुखमा खंडागळे यांच्या घराजवळ लावलेल्या पिंजऱ्यात ३ वर्षांचा नर बिबट्या जेरबंद झाला आहे, मांजरवाडी येथे १८ डिसेंबर रोजी शेतकरी खंडू खंडागळे यांच्या घरात सायंकाळी साडेसातच्या दरम्यान बिबट्याने घरात घुसण्याचा प्रयत्न केल्याने वन विभागाने या ठिकाणी तातडीने पिंजरा लावला.

रविवारी (दि. २९) सकाळी पिंजऱ्याचा दरवाजा बंद झाला म्हणून खंडू खंडागळे हे पाहण्यास गेले असता त्यांना बिबट्या पिंजऱ्यात शांतपणे बसल्याचे दिसले. त्यांनी वन विभागाचे वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांना याबाबत माहिती दिली. ते घटनास्थळी ताबडतोब दाखल झाले. नारायणगाव पोलिस ठाण्याच्या ग्रामसुरक्षा दलाचे जवान तुषार टेके, रामकृष्ण चोपडा, आपदा मित्र सुशांत भुजबळ, मांजरवाडीचे पोलिस पाटील सचिन टाव्हरे, ग्रामपंचायत सदस्य उदय खंडागळे, खंडू खंडागळे, उपसरपंच संतोष मोरे यांनी पिंजरा वन खात्याच्या गाडीत टाकण्यास मदत केली. बिबट्याला पकडण्यात उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहायक वनसंरक्षक स्मिता राजहंस, जुन्नर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण, वन परिमंडळ अधिकारी अनिता होले, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांची विशेष मदत झाली. बिबट्या पकडला असला तरी या परिसरात बिबट्या व तिचे बछडे यांचा वावर असल्याचे नागिरकांचे म्हणणे आहे. त्यामुळे परिसरात पुन्हा पिंजरा लावण्याची मागणी होत आहे.

कारवाई

## सोन्याची जेजुरी

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे

जेजुरी : सोमवती अमावस्येनिमित्त संपूर्ण जयाद्री खंडोबा गड रोषणाईने उजळला होता. (छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्र)

# प्रा. सुमती पवार यांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन जिल्हा जळगावचे तिसरे राज्यस्तरीय शिव बाल,किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन आळंदी देवाची या ठिकाणी ४ जानेवारी शनिवारी आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र विभागीय सल्लागार तथा सुप्रसिद्ध कवयित्री नाशिक येथील प्रा. सुमतीताई पवार यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन उज्जैनकर फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप गोसावी व उज्जैनकर फाउंडेशनचे नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. प्रशांत रणसुरे सर यांनी निवड पत्र, व पुष्पगुच्छ देऊन नुकताच सत्कार केला. प्रा. सुमतीताई पवार यांचे बाल साहित्यामध्ये सुद्धा विपुल लेखन असून, त्या उज्जैनकर फाउंडेशनशी गेल्या पाच सहा वर्षांपासून जोडलेल्या आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या आणि आदिशक्ती संत मुक्ताई यांच्या ७४५ व्या जयंती महोत्सवी वर्षानिमित्त हा सोहळा आळंदी येथे संपन्न होत आहे. याप्रसंगी आदिशक्ती मुक्ताई कडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांना ७५० फुटाची राखी सुद्धा प्रदान करण्यात येईल. या सोहळ्यात सकाळी ग्रंथदिंडी उद्घाटन सोहळा तापी पूर्णा राज्यस्तरीय साहित्य व इतर पुरस्कार वितरण सोहळा पुस्तक प्रकाशन ओळख श्री ज्ञानेश्वरी व ताटी उघडा ज्ञानेश्वरा असे दोन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर बोलीभाषेतील सांस्कृतिक कार्यक्रम, समारोपीय सत्र आणि रात्री ८ ते १० या वेळात कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी, साहित्यिक, रसिक उपस्थित राहणार आहेत.



## युवा शेतकऱ्याचे होतेय कौतुक

# थोरांदळ्यात तब्बल साठ कांडी ऊस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** थोरांदळे (ता. आंबेगाव) येथील युवा शेतकरी योगेश पोपट टेमगिरे यांनी उसाचे यशस्वी पीक घेतले आहे. त्यांनी घेतलेल्या २६५ जातीच्या उसाला तब्बल ५५ ते ६० कांडी आली आहेत. अथक परिश्रम व सुयोग्य नियोजनाच्या जोरावर या तरुणाने यशस्वी उसाचे पिक घेतले आहे. सध्या उसाची तोड सुरू आहे. थोरांदळे परिसरातील अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या उसाच्या शेताची पाहणी करून युवा शेतकऱ्याचे कौतुक केले आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात थोरांदळे गाव आहे. डिंभे ( हुतात्मा बाबू गेणू जलसागर ) धरणाच्या डाव्या कालव्या वरिल घोड शाखेच्या पाण्यावर थोरांदळे गावातील शेती अवलंबून आहे. नजीकच्याच अंतरावर पारगाव येथे भीमाशंकर सहकारी साखर कारखाना झाल्यानंतर अनेक शेतकरी ऊस पिकाकडे वळाले. थोरांदळे गावातील अनेक शेतकरी देखील ऊस पिकाकडे वळाले. पाच सहा किलो मीटर अंतर असलेल्या चांडोली बुद्रुक येथील घोड नदी पात्रातून पाईप लाईनद्वारे पाणी थोरांदळे गावात आणून उस पिक घेण्यास सुरुवात केली.त्यातच योगेश टेमगिरे हे युवा शेतकरी आहेत. थोरांदळे गावातील डोंगर मळ्यातील शेतकरी भिवा राधू टेमगिरे यांच्या शेतात योगेश टेमगिरे यांनी उसाची पीक घेतले आहे. मागील आठ वर्षांपासून ते उसाची शेती करत आहेत. त्यांनी पाच एकर २६५ जातीच्या ऊसाचे पीक घेतले आहे.

सध्या ऊसतोड सुरू झाली आहे. त्यांनी घेतलेल्या ऊसाला तब्बल ५५ ते ६० कांडे आले आहेत. थोरांदळे परिसरातील अनेक ऊस उत्पादक यांच्या शेताला भेट देऊन उसाचे पिक पाहत आहेत.



थोरांदळे (ता. आंबेगाव) येथे ऊसाला तब्बल ५५ ते ६० कांडे आहेत. या उसाची पाहणी करताना परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी. (छाया : रोहीत खुडे).

> **मागील आठ वर्षापासून मी उसाचे पीक घेत आहे. चार वर्षांपूर्वी पिकविलेल्या २६५ जातीच्या खोडवा उसाचे बेणे म्हणून कारखान्याने ऊस तोडून नेला होता. ऊस लागवडीच्या वेळी शेण खत, कोंबड खत, मळीचा वापर केला. त्यानंतर रासायनिक खते, युरिया, १०:२६:२६ या खतांचा वापर केला. काही खते ही पाण्यातून देखील उस पिकाला दिली. जय मल्हार अॅग्रोचे प्रवीण यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.**
>
> **- योगेश टेमगिरे,** ऊस उत्पादक शेतकरी, थोरांदळे.

#रा

» Selected

## न्यू इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**रांजणी :** पारगाव (ता.आंबेगाव)येथिल भीमाशंकर शिक्षण संस्था संचलित डी.जी. वळसे पाटील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. यामध्ये प्री-प्रायमरी व प्रायमरी विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक नृत्य अविष्काराचे सादरीकरण यावळी करण्यात आले. तसेच प्रबोधनात्मक नाटक सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, उपाध्यक्ष भीमाशंकर शिक्षण संस्था भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक, भीमाशंकर शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, पालक वृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा हा वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा अगदी उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना व पालकांना पौष्टिक असा अल्पोपहार देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या पूजा लोखंडे व मोनिका थोरात यांनी केले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ऊस दराची कोंडी फोडावी

## स्वाभिमानी शेतकरीच्या युवा आघाडीचे अमरसिंह कदम यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**भवानीनगर :** जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू होऊन दीड महिना झाला असून साखर कारखान्यांनी उसाची पहिली उचल जाहीर केलेली नाही त्यामुळे प्रांत अधिकाऱ्यांनी ऊस दराची कोंडी फोडावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष अमरसिंह कदम यांनी केली आहे

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने बारामती येथील प्रांत कार्यालयामध्ये निवेदन दिले. यावेळी बाबासाहेब झगडे, नितीन घोळवे, राहुल घोळवे, रामदास शिंदे, औदुंबर आव्हाड, सागर घोळवे, दत्तात्रय गायकवाड, संतोष घोळवे, संदीप सपकळ उपस्थित होते.

कदम म्हणाले की, जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गाळात हंगाम सुरू होऊन ४० ते ४५ दिवस झाले आहेत शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसाच्या आत गाळप झालेल्या उसाचा पहिला हप्ता देणे बंधनकारक असताना, साखर कारखानदारांनी उसाचा भाव जाहीर करण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. साखर कारखान्यांचा गाळप हंगाम उशिरा सुरू झाल्यामुळे गहू, मका, हरभरा यासारख्या भुसार पिकांचे उत्पादन शेतकऱ्यांना घेता आलेले नाही. याला केंद्र राज्य सरकार जबाबदार आहे. शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप झाल्यानंतर, १४ दिवसांच्या आत पहिला हप्ता देणे बंधनकारक असताना, साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एक रुपयाही दिलेला नाही, असा आरोप त्यांनी केला.

केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. शासनाने रासायनिक खतांच्या किमती भरमसाठ वाढवल्याने उसाचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. उसाच्या पिकावर शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन असते. कर्ज काढून उधारीवर शेतकरी शेतीमालाचे उत्पादन घेतात. साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू होऊन, दिड महिना झाला, तरी पैसे अद्याप न मिळाल्याने, शेतकऱ्यांना कर्जाचे नवे जुने करता आलेले नाही, तसेच उधारीवर घेतलेल्या खतांचे पैसे देता आलेले नाहीत. याबरोबरच दवाखाना, लग्न समारंभ, शैक्षणिक खर्च, शेती मशागत यासाठी शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्रांत अधिकाऱ्यांनी साखर कारखानदारांना सूचना करून उसाचा पहिला हप्ता ३५०० जाहीर करून, दोन दिवसात गाळप झालेल्या उसाचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावे. अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला तीव्र आंदोलन करावे लागेल. या आंदोलनाला साखर कारखानदार व प्रशासनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा कदम यांनी दिला आहे.

## वासुंदे येथील अपघातात दोघे ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** पाटस-बारामती श्री. संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील वासुंदे (ता. दौंड) हद्दीत भरधाव चारचाकी दुभाजकाजकावर आदळून झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एका महिलेचाही समावेश आहे. चालकाचा ताबा सुटल्याने मोटार दुभाजक व नंतर पुलाच्या कठडयाला धडकुन सोमवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अक्षय बाळासाहेब चव्हाण (रा. चिंचणी, ता. शिरुर), व प्रिती विशाल भोसले (रा. पाटस, ता. दौंड) असे अपघातात ठार झालेल्या दोघांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री. संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरून अक्षय चव्हाण व पाटस येथील प्रिती भोसले हे दोघे सोमवारी चारचाकी स्विप्ट मोटारीतून बारामतीला निघाले होते. वासुंदे गावच्या हद्दीत येताच अक्षय चालवत असलेल्या चारचाकीवरील ताबा सुटला. यावेळी मोटार रस्त्याच्या दुभाजकाला व नंतर पुलाच्या कठडयाला धडकली. या अपघातात चारचाकीचे मोठे नुकसान झाले.

## सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात



**ओतूर :** श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई संचलित श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा, ओतूर येथे कार्यरत असलेले ज्येष्ठ लिपिक राजकुमार मिरगे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन नुकतेच शाळेच्या सरदार वल्लभभाई पटेल सभागृहात करण्यात आले. राजकुमार मिरगे यांनी ३७ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत, शाळेच्या कामकाजात अमूल्य योगदान दिले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापिका वैशाली डुंबरे यांनी राजकुमार मिरगे यांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांची शिस्तबद्धता, प्रामाणिकता आणि नम्रता याबाबत गौरवोद्गार काढले.पद्मश्री गिरीश प्रभुणे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नितीन पाटील, अरुण वाकचौरे, महेंद्र गणपुले, शैलेश मिरगे, नामदेव नंदकर, शाहीर भीमराव ठोँगिरे, सचिव आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर देवराम मुंढे, उपाध्यक्ष मुख्याध्यापक संघ पुणे जिल्हा तबाजी वागदरे, अशोक काकडे, वरिष्ठ सहाय्यक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव दादाभाऊ लोहकरे, शरदअण्णा चौधरी, हभप गंगाराम महाराज डुंबरे, ज्ञानेश्वर डोके, पंकज घोलप, प्रदिप गाढवे, बाळासाहेब होनराव, शेखर डुंबरे, यशवंत दाते, मुख्याध्यापिका सुमन घाडगे, विद्यालय मुख्याध्यापक संपत माने, स्वाती सोनवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा तांबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनिल डुकरे यांनी केले.

# चाकण, आळंदी एकाच महापालिकेत

## राज्य सरकारकडे प्रस्ताव दाखल, हद्दवाढीला पुढाऱ्यांचा विरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील चाकण, आळंदी नगरपरिषद हद्दवाढ गेल्या अनेक वर्षापासून रखडलेली आहे. ती लालफितीत अडकली आहे. या हद्दवाढीलाही शेजारील गावातील काही गावपुढाऱ्यांचा तीव्र विरोध आहे. चाकण, आळंदी या दोन्ही नगरपरिषदांची तसेच लगतच्या गावांची मिळून एकच महापालिका करण्याचे प्रयत्न राज्यसरकारच्या विचाराधीन आहे.

नवीन महापालिका करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी विभागीय आयुक्तांकडून अहवाल आणि अभिप्राय मागविले होते. चाकण,आळंदी नगरपरिषद तसेच त्यांच्या लगतच्या परिसरातील गावांची नवीन महापालिका निर्माण करण्याबाबत काहींची मागणी आहे. तर चाकण, आळंदी, राजगुरूनगर या तीन नगर परिषदांची मिळून एक महानगरपालिका करण्याचाही प्रस्ताव आहे.

खेड तालुक्यातील तीन नगरपरिषदा तसेच लगतच्या परिसरातील आसपासच्या गावांचे एकूण क्षेत्रफळ, लोकसंख्या, हद्द इत्यादी तपशील घेऊन त्यांच्याकरिता एक स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याबाबत जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे जिल्हाधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चे आयुक्त,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका आयुक्त , चाकण,आळंदी, राजगुरूनगर नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांचा अहवाल मागवून अभिप्रायासह शासनास पाठवावे याबाबतचे पत्र राज्य शासनाने पुण्याचे विभागीय आयुक्तांना यापूर्वी पाठविले होते. त्यामुळे चाकण,आळंदी नगरपरिषद तसेच राजगुरुनगर नगरपरिषद यांची मिळून महापालिका करण्याचा प्रयत्न राज्य सरकारचा आहे का असे दिसून येते.

पिंपरी -चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सांगितले की, "विभागीय आयुक्तांनी यापूर्वी नवीन महानगरपालिकेबाबत अभिप्राय पाठविण्याचे निर्देश दिले होते त्यानुसार अभिप्राय पाठविले होते. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेला जवळ असलेल्या खेड तालुक्यातील कोणत्याही गावाचा पिंपरी -चिंचवड महानगर पालिकेत समावेश करण्याचा प्रस्ताव नाही."

चाकण, आळंदी,राजगुरुनगर नगरपरिषदांची हद्दवाढ काही गावे,वाड्या, वस्त्यांचा समावेश करून झाली तर रस्ते, कचरा, पाणीपुरवठा , सांडपाणी व इतर बाबींचे नियोजन करणे सोपे होईल असे प्रशासन व काही लोकांचे मत होते.परंतु नगरपरिषद हद्दवाढ करण्यास शेजारील गावच्या सरपंचांनी तीव्र विरोध केल्याने हा प्रस्ताव लालफितीत अडकला.परंतु काही लोक, उद्योजक यांचा मात्र नगरपरिषदेच्या हद्दवाढीस पाठींबा होता.

महापालिकांचे वाढते कर यामुळे महापालिका नको असाही काही लोकांचा मतप्रवाह आहे सांडपाण्याची व्यवस्था अवघड आहे. कचऱ्याची समस्या बिकट आहे. ग्रामपंचायत, नगरपरिषदा सोयी सुविधा देण्यासाठी सक्षम नाही. त्यासाठी महापालिकेची गरज आहे असे अनेकांचे म्हणणे आहे.

## विद्यार्थी दशा जोपासण्याचे काम मेळाव्यातून



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** मानवी जीवनामध्ये विद्यार्थी दशा ही जन्मापासून शेवटच्या क्षणापर्यंत मानवासोबत असते आणि ही विद्यार्थी दशा जोपासण्याचे काम माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याच्या माध्यमातून होत असल्याचे प्रतिपादन शिरूर तालुक्याचे माजी आमदार काकासाहेब पलांडे यांनी केले आहे. पन्नास वर्षानंतर प्रथमच एकत्र आलेले हे तुम्ही सर्व विद्यार्थी विद्यालयाशी, शिक्षकांशी व समाजाशी समरस असल्याचे एक ज्वलंत उदाहरण असल्याचेही पलांडे यांनी आपल्या मनोगतच व्यक्त केले

मंगलमूर्ती विद्याधाम रांजणगाव गणपतीच्या शाळेतील इयत्ता अकरावी मधील १९७४ बॅचमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे तब्बल ५० वर्षानंतर स्नेह मिलन अत्यंत उत्साहात रांजणगाव महागणपती देवस्थानच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडले. या सर्व माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना माजी आमदार काकासाहेब पलांडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी १९७४ बॅचचे माजी शिक्षक सतीश राठोड हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून शिरूर तालुका माजी आमदार सूर्यकांत पलांडे, शिरूर पंचायत समितीचे माजी उपसभापती आबासाहेब पाचुंदकर, राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती दत्तात्रय पाचुंदकर, ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. सुरेखा कटारिया, मंगलमूर्ती विद्याधाम प्रशालेचे मुख्याध्यापक सुनिल थोरात, तसेच १९७४ बॅचमधील ५२ विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे फेटे बांधून व

## रेल्वे रुळावर गॅस सिलिंडर ठेऊन घातपाताचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी कांचन:** उरुळी कांचन येथील रेल्वे रुळावर गॅस सिलिंडर ठेऊन घातपाताचा प्रयत्न करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. रविवारी रात्री पाऊणे अकरा वाजण्याच्या सुमारास उरूळी कांचन गावच्या हद्दीत रेल्वे विद्युत पोल किलोमीटर नंबर २१९/७-५ च्या जवळ पुणे बाजूकडे जाणाऱ्या रेल्वे ट्रॅकवर ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी अज्ञात व्यक्तींच्या विरोधात उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी शरद शहाजी वाळके (वय – ३८, व्यवसाय- नोकरी, केसनंद रोड वाघोली, ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## वाडेबोल्हाईतील जोगेश्वरी विद्यालयात स्टेम लॅबचे उद्‌घाटन



**वाडेबोल्हाई :** (ता.हवेली) येथे जोगेश्वरी माता माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्पिरुल फाऊंडेशन व ईवाय फाऊंडेशनच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या स्टेम लॅबचे उद्‌घाटन ईवाय फाऊंडेशनचे प्रमुख संतोष पाठक व आशिष श्रीवास्तव यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कार्यकारी संचालक कृष्णा भट्ट,स्पिरुल फाऊंडेशनच्या भावना मॅडम,रुपाली मॅडम,श्वेता मॅडम,जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतिश धूमाळ सर,सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील गरजू व वंचित विद्यार्थ्यांना स्टेम शिक्षणाचे लाभ देण्याचा स्पीरुल फाऊंडेशनचे इरादा आहे.या उपक्रमाचा फोकस किफायतशीर अभ्यासक्रमावर आधारीत स्टेम लॅबोरेटरीजची रचना,आणि विकास यावर आधारीत आणि याद्वारे संकल्पनेची कल्पना करणे,शोहा प्रक्रिया,प्रयोगशिलता आणि शिकवण्याच्या संपूर्ण नाविण्यपूर्ण पद्धती दाखल करण्यावर आहे.याबरोबर विद्यालयास एक विज्ञान शिक्षकही फांऊडेशनने उपलब्ध करून दिलेला आहे.याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक आर.बी.कोल्हे,राजेंद्र गायकवाड,गणेश फलके यांनी आभार मानले. अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य सतिश धुमाळ यांनी दिली.

# शिरुरचे वीस सहाय्यक निरीक्षक नाशिकच्या दिक्षांत समारंभात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात एकाच शाळेतील पन्नासच्या संख्येने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा व राज्य गुणवत्ता यादीत चमकण्याची अभूतपूर्व परंपरा शिरुरकरांनी अनेक वर्षापासून कायम ठेवली असताना, आता नुकतेच शिरुर तालुक्यातून सहाय्यक पोलीस निरीक्षक झालेल्या अधिकाऱ्यांचा दिक्षांत समारंभात नाशिक मध्ये पार पडला. शिरुर तालुक्यातील वीस अधिकाऱ्यांनी एकाच वेळी दिक्षांत समारंभात सहभाग घेत शिरुर तालुक्याचे नाव उंचावले आहे.

महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सन २०२० च्या एमपीएससीच्या परीक्षेत फौजदार परीक्षेत यशस्वी झालेल्या तब्बल ६२० जणांचे १३ महिन्यांचे प्रशिक्षण नाशिक येथे पूर्ण होऊन सर्वांचा दिक्षांत समारंभात नाशिक पोलिस अ‍ॅकेडमीचे मुख्य संचालक तथा अतिरिक्त पोलिस महासंचालक राजेशकुमार मोर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी राज्याच्या इतिहासात प्रथमच एकाच तालुक्यातील वीस सहाय्यक पोलीस निरीक्षक झाल्याचा प्रसंग समोर आल्याने शिरुरचा डंका कसा असतो त्याची प्रचिती नागरिकांना आली. नाशिक येथील दिक्षांत समारंभात एकाच वेळी तब्बल वीस शेतकरी कुटुंबातील शिरुरकरांनी आपल्या आई वडीलांसमवेत अधिकारी म्हणून खाकी वर्दीची शपथ घेतली. नाशिक पोलिस अ‍ॅकेडमीचे मुख्य संचालक तथा अतिरिक्त पोलिस महासंचालक राजेशकुमार मोर व नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश श्रीचंद दौलतराम जगमलानी यांनी सर्व शिरुरकरांना शपथ दिली आणि सर्वांनी आपापल्या आई वडीलांसमवेत हा आनंदसोहळा मोठ्या उत्साहासह भावूक होवून साजरा केला.



### शिरुर तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील दिक्षांत समारंभात शपथ घेतलेले गाव निहाय सहाय्यक पोलीस निरीक्षक व त्यांचे नियुक्ती पोलिस स्टेशन पुढील प्रमाणे.



- अतुल नरसिंग पवार - जातेगाव बुद्रुक - नेमणूक - नागपूर शहर, जयराम सोमनाथ देशमुख – कुरुळी - नेमणूक - नागपूर शहर, आकाश पिराजी साकोरे – केंदुर - नेमणूक - नागपूर शहर, सुप्रिया धनंजय गजरे – करंदी - नेमणूक - नागपूर शहर, अनिरुद्ध राहुल गवारे – विठ्ठलवाडी - नेमणूक – सांगली, विशाल रंगनाथ नवगिरे - पिंपळे खालसा - नेमणूक – अमरावती, अमर शामराव तिखे – वाजेवाडी - नेमणूक – मुंबई, सौरभ गोरक्षनाथ दसगुडे – रामलिंग - नेमणूक – मुंबई, स्वप्नील यशवंत साठे - तर्डोबाची वाडी - नेमणूक – मुंबई, आदिती गंगाराम भोसले – आपटी - नेमणूक – मुंबई, अक्षय धनंजय थोपटे - चिंचोली मोराची - नेमणूक - नागपूर शहर, ऋषिकेश बाळासाहेब लांघे - कान्हूर मेसाई - नेमणूक – मुंबई, अक्षय पोपट ढोरमले – अण्णापुर - नेमणूक - नागपूर शहर, सागर मोहन चव्हाण - वडगाव रासाई - नेमणूक – गडचिरोली, विक्रांत अशोक तळोले - कान्हूर मेसाई - नेमणूक – गडचिरोली, रेश्मा शिवाजी गुंजाळ - आलेगाव पागा - नेमणूक – मुंबई, विनोद हरिभाऊ आफळे – उरळगाव - नेमणूक – मुंबई, अविनाश बाळासाहेब शिवले - वढू बुद्रुक - नेमणूक – मुंबई, अमित रामदास तळोले - कान्हूर मेसाई - नेमणूक – बुलढाणा, प्रज्ञा जनार्दन गायकवाड - शिरसगाव काटा - नेमणूक – मुंबई हे आहेत शिरुर तालुक्यातील नवीन अधिकारी.

## उद्योग व्यवसाय सांभाळून पारंपरिक शेती पद्धतीला आधुनिकतेची जोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव/प्रतिनिधी** - येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय लहान मोठ्या कंपन्याचे जाळे पसरलेले आहे. जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत.बऱ्याचशा लोकांनी आपल्या जमिनी विकून झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग अवलंबिला मात्र शेती न विकता स्वतःचा उद्योग व्यवसाय सांभाळून पारंपरिक शेती पद्धतीला आधुनिकतेची जोड देत उजाड माळरानावर आपली वडिलोपार्जित शेती पिकविण्याची किमया रांजणगाव येथील प्रगतशील शेतकरी गणेश भगवंत लांडे यांनी केली आहे. मात्र सध्या निसर्गाच्या लहरी व ढगाळ वातावरणामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो



की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.प्रगतिशील शेतकरी लांडे यांनी आपल्या दोन एकर क्षेत्रात कांद्याचे नगदी पीक घेतले आहे. त्यासाठी त्यांना एकरी २० ते २५ हजार रु.खर्च आला आहे.लांडे यांनी कांद्याबरोबर ऊस हे नगदी पीक तर घरी कुटुंबाला वर्षभर पुरेल इतके गव्हाचे व हरभऱ्याचे पीक घेतले आहे. या पिकांनाही या वातावरणाचा फटका बसत आहे.लांडे यांनी कांदा लागवडीसाठी दोन पायली बी टाकून घरच्या घरी रोपे तयार केली.रोपे तयार होईपर्यंत शेत उभे आडवे नांगरून त्यात चांगले कुजलेले शेणखत टाकले. कांदा लागवडी साठी वाफे तयार करून घेतली. साधारण पणे ऑक्टोंबरच्या मध्यावर रोपांची शेंडे छाटून एकरी आठ हजार प्रमाणे मजूरी देऊन मजुरांच्या साहाय्याने दोन एकर कांद्याची लागवड केली. त्यावेळी काही प्रमाणात नत्र आणि स्फुरदाची मात्रा दिली. लागवडीनंतर आंबवणी देऊन कांद्याची जोमदार वाढ होण्यासाठी चार बॅग नत्र, स्फुरद खत टाकले. कीड व रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून प्रतिबंधक औषधांची तीन वेळा फवारणी केली. तद्नंतर जमिनीत कांदा पोसून चांगला रंग येण्यासाठी नत्र, स्फुरद व पालाश युक्त खतांच्या चार बॅग टाकून पाणी दिले. सध्या कांदा पीकाची जोमदार वाढ होऊन पात हिरवीगार झाली आहे.

## कारखान्याचा पेपरलेस कामकाजावर भर, मोबाईलवर मिळणार माहिती

# सोमेश्वर कारखान्याचे 'सोमेश्वर शुगर' अ‍ॅप सादर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** राज्यात अग्रेसर असलेल्या सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत दैनंदिन कामाचे डिजीटलायझेशन करत ऊस लागण, तोडणी वाहतूक, वे ब्रीज नंबर टेकर, स्मार्ट कार्ड ऑनलाईन सभासद साखर विक्री हे मॉडयुल्स कार्यान्वीत केलेले आहेत. यामध्ये सुसूत्रता येणेसाठी कारखान्याने श्री सोमेश्वर शुगर अ‍ॅप विकसीत केला आहे. याचा वापर करीत पेपरलेस कामकाजावर भर देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ऑनलाईन सिस्टीम व अ‍ॅन्ड्रॉईड अ‍ॅपसाठी कारखाना संगणक विभागाला प्रत्युष एंटरप्राईजेस व श्री डब्ल्यूडी सॉफ्टवेअर यांचे विशेष सहकार्य मिळाले असल्याची माहिती ईडीपी मॅनेजर यांनी दिली. या अ‍ॅपचे उद्‌घाटन नुकतेच कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांच्या उपस्थितीत झाले. सभासद, शेतकरी, वाहतूकदार, तोडणीदार, मुकादम यांनी कारखान्याकडे आपला मोबाईल नंबर रजिस्टर करुन गुगल प्ले स्टोअरवरुन श्री सोमेश्वर शुगर हे अ‍ॅप सर्च करुन डाऊनलोड करुन या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी केले आहे.

**स्मार्ट ऊस तोडणी**


- ऑनलाईन अ‍ॅपव्दारे जे प्लॉट कारखाना प्रशासनाने ठरवून दिलेल्या तोडणी प्रोग्रामप्रमाणे ओपन आहेत त्याच प्लॉटची तोडणी स्लीप ऑनलाईन पध्दतीने देण्याची सोय व स्मार्ट ऊस तोडणी व्यवस्थापन.

**केनयार्ड व्यवस्थापन**

- यामध्ये आर.एफ.आय.डी. व एन.एफ.सी. तंत्रज्ञानाचा वापर करीत एखादे ऊस वाहतूक करणारे वाहन ऊस घेवून आले तर त्या वाहनाचे स्कॅनिंग होवून त्याचा नंबर आपोआप लावला जातो. तसेच आर.एफ.आय.डी. व एन.एफ. सी. व्दारे संबंधीत वाहनाचे ऊस वजन होते.

**स्मार्ट कार्ड**

- स्मार्ट कार्डचा वापर करुन सभासदांना सवलतीच्या दरामध्ये साखर विक्री होते. संपुर्ण साखर दुकान याव्दारे पेपरलेस केले आहे. याशिवाय एम.आय.एस. अ‍ॅप मोबाईलवर व्यवस्थापनाला ऑनलाईन ऊसाचे गाळप, ऊस नोंद, प्रोडक्शन, विक्री व साठा अहवाल तसेच शेतकऱ्यांच्या ऊसाची केलेली नोंद, गाळपास आलेल्या ऊसाच्या खेपा व त्याचे वजन, बिले, त्यातील कपात व देय रक्कम याची माहिती तसेच सभासद साखरसाठा व शिल्लक साखरसाठा याबाबतची अचूक माहिती त्यांचे अ‍ॅण्ड्रॉईड मोबाईलवर ऑनलाईन मिळणार आहे.



**ऑनलाईन लागण नोंद**

- चिटबॉय ऊस उत्पादक यांचे क्षेत्रातूनच लागण केलेल्या क्षेत्राची ऑनलाईन पध्दतीने नोंद करीत आहेत. तसेच नोंद झालेल्या क्षेत्राचे मोजणीसाठी जिओ टॅगींग फेन्सींग या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सदर नोंदीची शेतकऱ्यांना अ‍ॅपव्दारे माहिती दिली जात आहे.

#रा

राष्ट्रसंचार
निरामय
बुधवार, १ जानेवारी २०२५

## लिची की चेरी?

आहारतंत्र

मधुमेहींसाठी कोणती फळं योग्य, याबाबत सतत चर्चा झडत असतात. मधुमेह झाल्यानंतर काही फळं आहारातून वर्ज्य करावी लागतात तर काही फळं काही प्रमाणात खाता येतात. काही फळं मधुमेहींसाठी लाभदायी ठरतात. पावसाळ्यात मिळणाऱ्या लिची आणि चेरी या फळांबाबतही हाच प्रश्न उपस्थित होतो.

एखादं फळ किंवा पदार्थ मधुमेहींसाठी योग्य की अयोग्य हे त्याच्या ग्लायसेमिक इंडेक्सवरून ठरतं. कर्बोदकयुक्त पदार्थांच्या रक्तातल्या साखरेवर होणाऱ्या



परिणामावरून त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स (जीआय) ठरतो. कमी ग्लायसेमिक इंडेक्सचे पदार्थ मधुमेहींसाठी योग्य मानले जातात. ५५ किंवा त्यापेक्षा कमी जीआय असणाऱ्या घटकांचा रक्तात साखर सोडण्याचा वेग खूप कमी असतो. म्हणजेच रक्तातली साखरेची पातळी अचानक वाढत नाही. लिची आणि चेरी यांचा जीआय अनुक्रमे ५० आणि २२ आहे. त्यामुळे मधुमेहींनी चेरी खायला हरकत नाही. मात्र लिची प्रमाणात खायला हवी. एका वेळी मध्यम आकाराच्या चार ते पाच लिची खाता येतील, असं तज्ज्ञ सांगतात.

## धोका गर्भाशयाच्या कर्करोगाचा

आरोग्यवेध

भारतामध्ये दर आठ मिनिटांनी एका महिलेचा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. ही हृदयद्रावक सत्यता परिस्थितीची गंभीरता दर्शवते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमधील कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंचा प्रमुख कारण ठरतो. या रोगामुळे दरवर्षी ७६ हजार महिलांचा मृत्यू होतो. भारतातील महिलांमध्ये हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वसामान्य कर्करोग ठरतो. हा आजार टाळता येण्यासारखा असूनही, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग आणि त्याच्या जोखमींबाबत सर्वांत अज्ञान आहे. त्यामुळे उशिरा निदान होते आणि मृत्यूदर वाढतो.



गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण म्हणजे 'ह्युमन पॅपिलोमाव्हायरस' (एचपीव्ही) या विषाणूंच्या उच्च-जोखीम प्रकारामुळे होणारा संसर्ग. २०० हून अधिक प्रकारांच्या या विषाणूंपैकी काही प्रकार असामान्य पेशींमध्ये बदल घडवून आणून कर्करोगाला कारणीभूत ठरतात. भारतामध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण आहे. ग्रामीण भागांमध्ये, जागरूकतेचा अभाव आणि आरोग्यसेवा सुविधांपर्यंत पोहोचण्याची अपुरी क्षमता लवकर निदानास अडथळा ठरते. महिलांना लक्षणांबद्दल माहिती नसते आणि ती लक्षणे चुकीच्या पद्धतीने समजली जातात किंवा दुर्लक्षित केली जातात. जसे की संभोगानंतर रक्तस्राव, असामान्य स्त्राव, पोटदुखी, सूज आणि क्रिएटिनिन पातळी वाढणे.

**✻ दरवर्षी १.३२ लाख नवे रुग्ण**

भारतामध्ये दरवर्षी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे अंदाजे १.३२ लाख नवीन रुग्ण आढळतात. चिंताजनक बाब म्हणजे फक्त १८ टक्के लोकांना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती आहे, आणि त्याहीपैकी फक्त ४-११ टक्के लोकांनी एचपीव्ही लसीकरण केले आहे. ही लस गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची ८५ टक्के प्रकरणे टाळू शकते.

**✻ ग्रामीण भारतातील आव्हाने**

ग्रामीण भारतामध्ये आरोग्यसेवेच्या सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यात अडचणी येतात. याशिवाय, महिलांना योग्य वयात 'एचपीव्ही लस देणे हेही एक आव्हान आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी तपासणी ही लवकर निदान आणि प्रतिबंधासाठी महत्त्वाची पायरी आहे. 'पॅप टेस्ट' आणि 'एचपीव्ही टेस्ट' या प्रमुख तपासण्या आहेत. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग झाल्यास शस्त्रक्रिया, रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी या उपचार पद्धती आहेत. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या उपचारांमध्ये किरणोत्सर्ग थेरपी महत्त्वाची भूमिका बजावते. योग्यवेळी आणि योग्यप्रकारे दिलेला किरणोत्सर्ग, इतर उपचार पद्धतींसह एकत्रित केल्यास कर्करोगाचे व्यवस्थापन प्रभावीरीत्या करता येते आणि रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा करता येते.

**✻ एकत्रित प्रयत्नांची गरज**

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान आणि प्रतिबंधासाठी लसीकरण आणि लवकर तपासणी ही दोन मुख्य साधने आहेत. ही दोन साधने योग्यरित्या वापरल्यास कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी केले जाऊ शकते.

## पॅरासिटामॉलच्या गोळ्या घेताय, सावधान!

आरोग्य चर्चा

छोट्या मोठ्या दुखण्यासाठी पॅरासिटामॉलचा वापर करत असाल, तर ते घातक ठरू शकते. पॅरासिटामॉल घेतल्याने शरीराच्या अनेक भागांवर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे.

पॅरासिटामॉलचा वापर आजकाल सर्रास झाला आहे. डोकेदुखी, ताप किंवा सौम्य वेदनांसाठी डॉक्टरांचा सल्ला न घेता पॅरासिटामॉलचा वापर केला जातो. पॅरासिटामॉलचा वृद्धांच्या मूत्रपिंड आणि हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे. पॅरासिटामॉल हे अंगदुखी आणि ताप कमी करण्यासाठी औषध आहे. यामुळे मेंदूतील रसायनांचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे वेदना आणि ताप येतो. हे सहसा सौम्य ते सौम्य वेदना, ताप, मायग्रेन आणि संधिवातमध्ये दिले जाते; मात्र ते मर्यादित प्रमाणात घ्यावे. ओव्हरडोजसाठी किंवा दीर्घकाळ हे औषध घेतल्यास शरीराच्या अनेक महत्वाच्या अवयवांचे नुकसान होऊ शकते.



**✻ पचनसंस्था, मूत्रपिंडावर परिणाम**

ब्रिटनमधील नॉटिंघम विद्यापीठातील संशोधकांनी आपल्या अभ्यासात असे सिद्ध केले आहे, की पॅरासिटामॉलच्या जास्त किंवा दीर्घकालीन वापरामुळे पचनसंस्था आणि मूत्रपिंडावर वाईट परिणाम होऊ शकतो. पॅरासिटामॉलचे सेवन विशेषत: वृद्धांसाठी धोकादायक ठरू शकते. पॅरासिटामॉल हे जास्त काळ घेतल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता वाढते. हे पोटाच्या पडद्याचे नुकसान करू शकते. त्यामुळे पचन समस्या उद्भवू शकतात. याशिवाय हे औषध मूत्रपिंडावरही परिणाम करते. मूत्रपिंड शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते; परंतु पॅरासिटामॉलच्या सतत वापरामुळे मूत्रपिंडावरील दबाव वाढू शकतो. वृद्धांमध्ये मूत्रपिंडाचे कार्य आधीच कमकुवत असते, म्हणून पॅरासिटामॉल घेतल्यास ही स्थिती बिघडू शकते.

**✻ हृदयावरही परिणाम**

पॅरासिटामॉलचा परिणाम केवळ पचनसंस्था आणि मूत्रपिंडापुरता मर्यादित नसून त्याचा परिणाम हृदयावरही होतो, असे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. वृद्धांमध्ये पॅरासिटामॉलचा सतत वापर केल्यास हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. पॅरासिटामॉलमुळे रक्तदाबावर ही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हृदयावर अधिक दबाव पडतो. ज्यांना आधीच हृदयाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी हे औषध अधिक धोकादायक ठरू शकते.

**✻ बचाव कसा करायचा?**

✻ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय पॅरासिटामॉल घेऊ नका.

✻ पॅरासिटामॉल दीर्घकाळ सतत घेणे टाळा.

✻ वारंवार वेदना किंवा ताप येत असेल तर डॉक्टरांना भेटा.

✻ निरोगी आहार आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा.

## नखांकडे दुर्लक्ष नको!

व्याधी विचार

नखं हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. नखांमधला साधासा बदलही एखाद्या रोगाचा संकेत असू शकतो. जीवनसत्त्वाच्या कमतरतेपासून जंतूसंसर्गापर्यंत बरंच काही नखांमधून अधोरेखित होत असतं. नखांवर पडलेले पांढरे चट्टे किंवा डाग जीवनसत्त्वं किंवा विशिष्ट अन्नघटकाच्या कमतरतेचं द्योतक असू शकतं किंवा नखांच्या मुळाशी दुखापत झाल्याने अशा खुणा दिसू शकतात. ॲलर्जीमुळेही या खुणा दिसू शकतात. अर्थात याची लक्षणं लवकर लक्षात येत नाहीत. त्यामुळे नखांवरचे पांढरे चट्टे किंवा डागांकडे आपण दुर्लक्ष करतो. यासोबतच मेनिक्युअर आणि नेल पेंट्सचा सततचा वापर यामुळेही नखांचं बरंच नुकसान होऊ शकतं. क्वचित प्रसंगी हृदयविकार, मज्जासंस्थेशी संबंधित विकार आणि अनारोग्यामुळेही नखांवर विशिष्ट खुणा दिसतात.



प्रत्यक्षात नखं किंवा त्यांच्या आसपासच्या त्वचेत झालेल्या बदलाकडे दुर्लक्ष करू नये. दाह, दुखापती आणि पांढऱ्या डागांसोबतच नखांवर काळपट,करड्या रंगाचे चट्टे आढळले तर अधिक सतर्क होण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत तातडीने तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

नखांखाली रक्त साकळणं, काही औषधांचे दुष्परिणाम या कारणांमुळेही नखांवर काळपट डाग पडू शकतात. मात्र हे एका दुर्धर व्याधीचं लक्षण असू शकतं हेही आपण लक्षात घ्यायला हवं. अमेरिकन अकादमी ऑफ डर्मिटॉलॉजीच्या म्हणण्यानुसार नखांवरची काळी रेष किंवा डाग त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतो. हा छोटासा काळा डाग सर्वात घातक अशा मेलानॉमा या कॅन्सरकडे अंगुलीनिर्देश करू शकतो यावर आपला विश्वास बसू शकणार नाही. त्वचेचा कॅन्सर आपल्या नखांखालीही वाढू शकतो.

कमकुवत नखं, नखांवर चिरा पडणं, नखांच्या आसपास रक्तस्राव होणं, नखांवरचा वाढत जाणारा काळपट डाग, नखांच्या आसपासच्या त्वचेचा रंग बदलणं, नखांमध्ये पू होणं, त्वचेवरच्या तीळाचा रंग बदलणं ही सुद्धा त्वचेच्या कॅन्सरची काही लक्षणं असू शकतात. याकडे दुर्लक्ष झालं तर हा कॅन्सर संपूर्ण शरीरात अगदी झपाट्याने पसरू शकतो.

नखांमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाकडे आपण पटकन लक्ष देत नाही. असेल एखादी दुखापत असं म्हणून साफ दुर्लक्ष करतो. मात्र नखांमधला साधासा बदलही कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाचं लक्षण असू शकतो यावर आपला पटकन विश्वास बसणार नाही. म्हणून नखांवरचा कोणताही डाग नेल पॉलिशखाली लपवू नका. साधीशी दुखापत म्हणून त्याकडे दुर्लक्षही करू नका. अर्थात यामुळे घाबरून जाण्याचं काहीच कारण नाही. काळपट डाग हे त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. त्यामुळे कोणताही धोका टाळण्यासाठी आपण प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं योग्य ठरतं. त्यामुळे शरीरातच्या प्रत्येक अवयवाकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## सप्लिमेंट्स ठरतात घातक!

नवसंशोधन

वजन कमी करणं असो, स्नायूंची क्षमता वाढवणं असो किंवा शरीरातली ऊर्जा टिकवून ठेवणं असो; सध्याच्या काळात आहाराला पूरक अशी सप्लिमेंट्स घेतली जातात. जीवनसत्त्वांचा अभाव दूर करण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. स्नायूंची क्षमता वाढवणाऱ्या विविध पावडरच्या जाहिराती येत असतात. मात्र हे सर्व आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.



त्यातही लहान मुलं आणि तरुणांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशी सप्लिमेंट्स घातक ठरू शकतात. शून्य ते २५ या वयोगटातल्या लोकांवर सप्लिमेंट्सच्या परिणामांचा होणारा वापर शास्त्रज्ञांनी अभ्यासला. अशा सप्लिमेंट्सच्या वापरामुळे अकाली मृत्यू, अपंगत्व किंवा रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येऊ शकते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

## कशी राखायची तोंडाची निगा?

दंतारोग्य

तोंडाची स्वच्छता आरोग्याच्या दृष्टीने किती गरजेची आहे हे आपण जाणतो. पण त्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. तोंडाच्या स्वच्छतेबाबत भरपूर माहिती उपलब्ध असल्यामुळे नेमकी सुरुवात कशी करायची, असा प्रश्न आपल्याला पडतो. खरं तर तोंडाची स्वच्छता राखण्याची सवय लहानपणापासूनच अंगी बाणायला हवी. दात घासण्यासाठी योग्य ब्रशचा वापर करणं गरजेचं आहे. शक्यतो मऊ ब्रशचा वापर करा. नायलॉनच्या धाग्यांपासून बनवलेला गोलाकार ब्रश वापरणं गरजेचं आहे, असं तज्ज्ञ सांगतात.



## सॅनिटायझर : योग्य की अयोग्य?

आपण कुठे चुकतो?

सध्याच्या काळात हातांच्या स्वच्छतेसाठी हँड सॅनिटायझरचा वापर होतो. प्रवासादरम्यानही हँड सॅनिटायझरमुळे हात झटपट स्वच्छ होतात. लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण हँड सॅनिटायझर बाळगतो. मात्र वारंवार सॅनिटायझर वापरणं योग्य ठरतं का? याचे काही दुष्परिणाम आहेत का? जाणून घेऊ या.



बाजारात विविध प्रकारचे हँड सॅनिटायझर मिळतात. तुमच्या सॅनिटायझरच्या निवडीवर बरंच काही अवलंबून असतं. प्रत्येक सॅनिटायझर वेगळा असतो. तज्ज्ञांच्या मते किमान ६० टक्के अल्कोहोल असणारा सॅनिटायझर वापरायला हवा. अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा फारसा उपयोग होत नाही. असे सॅनिटायझर्स प्रभावीपणे जंतू नष्ट करू शकत नाहीत. त्यातच ते आरोग्यासाठीही हानिकारक ठरतात. काही काळानंतर जंतू अशा सॅनिटायझर्सना प्रतिकारही करू लागतात. त्यामुळे अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा वापर करू नये.

ट्रायक्लोसॅन हा घटक असणारे सॅनिटायझर्सही टाळायला हवेत. ट्रायक्लोसॅनच्या सततच्या संपर्कामुळे शरीरातल्या काही थायरॉइड हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं आणि जंतू प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागतात.

## ही फळं आहेत प्रभावी

आयुर्वेद आणि विकार

उच्च रक्तदाबावर फक्त औषधांनी नियंत्रण मिळवता येत नाही. या औषधांनी काही काळासाठी बरं वाटलं तरी त्यांचा दीर्घकालीन वापर आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम हा रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा एक मार्ग आहे. यासोबतच फळांच्या रसांचं योग्य पद्धतीने सेवन केल्याने बरेच लाभ होऊ शकतात. काही फळं उच्च रक्तदाबाच्या दृष्टीने गुणकारी ठरतात.



साखरविरहित फळांचे रस आहारात समाविष्ट करायला हवेत.

डाळिंबामध्ये रक्तदाब नियंत्रणात ठेवणारे गुणधर्म असतात. यात अ, क आणि ई ही जीवनसत्त्वं आणि फॉलिक ॲसिड असतं. यातल्या पोटॅशियममुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते. डाळिंबातले ॲंटिऑक्सिडंट्सही प्रभावी ठरतात. डाळिंबाच्या रसाचा आहारात समावेश केल्याने जंतूसंसर्ग टाळता येतो.

संत्र हा क जीवनसत्त्व आणि फायबरचा प्रमुख स्रोत आहे. यातले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक रक्तदाब नियंत्रणात ठेवतात. संत्र्याच्या रसामुळे चयापचय क्रियाही सुधारते.

उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी क्रॅनबेरीचा रस घ्यायला हरकत नाही. या फळातही क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो.

## करा प्रदूषणापासून बचाव

डोळ्यांचं आरोग्य

वाढत्या प्रदूषणामुळे वातावरणात धूर आणि धुक्याचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे डोळ्यांना बराच त्रास होतो. अशा वातावरणात डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. धुरामुळे डोळे जळजळत असतील तर बाहेरून घरी आल्यावर डोळ्यांवर थंड पाणी मारा. डोळ्यांची सतत उघडझाप करत रहा. मोबाईल, कॉम्प्युटरचा वापर करत असताना डोळ्यांची उघडझाप करणं महत्त्वाचं आहे. बाहेर जाताना मोठ्या आकाराचा गॉगल लावा. प्रदूषित कण डोळ्यात गेल्यानंतर चोळू नका. महत्त्वाचं म्हणजे 'अ' जीवनसत्त्व आणि 'ओमेगा ३' फॅटी ॲसिड्सयुक्त आहार घ्या. हिरव्या भाज्या, गाजर यांचं आहारातलं प्रमाण वाढवा.



## प्रदूषणामुळे रक्तात गुठळ्या होण्याचा धोका

वेगळं काही

थंडीमुळे आरोग्य बिघडत असून प्रदूषणाची थंडी आणखीनच धोकादायक बनली आहे. ताज्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की प्रदूषणामुळे रक्तवाहिन्यांमधील रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका शंभर टक्क्यांनी वाढतो.

नसांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार होणे म्हणजे उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि ब्रेन स्ट्रोक. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ब्रेन स्ट्रोकमुळे होणाऱ्या ५० लाख मृत्यूंना प्रदूषण मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. इतकेच नाही तर प्रदूषणात सतत श्वास घेतल्याने मानसिक आजारांचा धोकाही वाढतो. ज्या लोकांना रक्तातील साखरेची समस्या आहे किंवा त्यांना आजार आहे. त्यांनी परिस्थिती लक्षात घेता अधिक सतर्क राहावे लागेल. मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या या धोकादायक मिश्रणामुळे हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी वाढेल. अशा परिस्थितीत आपण सर्दी आणि प्रदूषणाचा प्रभाव कसा कमी करू शकतो आणि साखर आणि रक्तदाब कसे नियंत्रित करू शकतो.



**✻ गंभीर आजाराचा धोका**

हवेतील लहान कण श्वासोच्छवासातून फुफ्फुसात, फुफ्फुसातून रक्तापर्यंत, रक्तापासून संपूर्ण शरीरात आणि नंतर सर्व अवयवांपर्यंत पोहोचून नुकसान करतात. त्यामुळे गंभीर आजारांचा धोका वाढतो. प्रदूषणाचा फुफ्फुस, डोळे आणि मेंदूवर वाईट परिणाम होतो.

**✻ काय उपाय?**

✻ प्रदूषणाचा फुफ्फुसांवर सर्वाधिक परिणाम होतो. फुफ्फुसांना बळकटी देण्यासाठी श्वसरीचा उष्टा प्या.

✻ रोज मसाला चहा पिणेदेखील फायदेशीर ठरेल. ज्या लोकांना घशाच्या ॲलर्जीची समस्या आहे त्यांनी मिठाच्या पाण्याने गुळण्या कराव्यात

✻ लिकोरिस खाल्ल्याने घशाला आराम मिळतो आणि ॲलर्जीची समस्या दूर होते. याशिवाय झोपण्यापूर्वी तळव्यावर कोमट मोहरीचे तेल लावा. यामुळे आराम मिळेल. तसेच नाभीमध्ये मोहरीचे तेल लावावे. नाकात मोहरीचे तेल लावल्यानेही आराम मिळेल.

## प्रभावी शिकेकाई

आजीबाईंचा बटवा

सध्या अनेकांना केसांच्या समस्या भेडसावतात. प्रदूषण, रसायनयुक्त उत्पादनांचा वापर, आहाराच्या चुकीच्या सवयी यामुळे केसांचं आरोग्य बिघडत चाललं आहे. केस गळणं, पांढरे होणं, कोंडा होणं या सर्वसाधारण समस्या आहेत. केसांना नैसर्गिक पोषण मिळवून देणारे अनेक घटक असले तरी शिकेकाईच्या नियमित वापरामुळे केसांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. टाळूची त्वचा स्वच्छ ठेवणं हा केसांचं आरोग्य उत्तम राखण्याच्या प्रक्रियेतला पहिला टप्पा आहे. शिकेकाईमुळे टाळूला थंडावा मिळतो. टाळूची त्वचा कोरडी पडत असेल तर शिकेकाईचा वापर योग्य ठरतो. शिकेकाईमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. यामुळे टाळूवरची त्वचा स्वच्छ होते. कोंड्याची समस्याही शिकेकाईमुळे दूर होऊ शकते.





'मी २००४ मध्ये क्रिकेच खेळायला सुरुवात केली, त्यानंतर ट्वीटरला प्रसिद्धी मिळाली, त्यानंतर इंस्टाग्राम आलं. मला सांगितलं जात होतं की तू थोडं पीआर करायला हवं. पण माझं सर्वांना एकच उत्तर होतं, जर तुम्ही चांगलं क्रिकेट खेळत असाल, तर तुम्हाला पीआरची गरज नाही.' — एम एस धोनी

विराट एवढ्यात निवृत्त होणार नाही. तो आज कसा बाद झाला हे विसरुया, पण तो अजून तीन-चार वर्षे खेळू शकेल, पण रोहितबाबत बोलायचे तर त्याने किमान आपल्या क्रमवारीचा विचार करावा, कारण त्याचे पदलालित्य पूर्वीसारखे राहिलेले नाही. " — रवी शास्त्री, माजी प्रशिक्षक



# श्रीकांत मुचंडीकरला अजिंक्यपद

## फोरविया कंपनी आयोजित औद्योगिक क्रीडा संघटनेच्या ६१व्या बुद्धिबळ स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** औद्योगिक क्रीडा संघटनेच्या वतीने घेण्यात आलेली ६१वी बुद्धिबळ स्पर्धा फोरविया कंपनीच्या स्पोर्ट्स हॉल येथे संपन्न झाली.ही स्पर्धा फोरविया कंपनीच्या वतीने आयोजित करण्यात आली.या स्पर्धेमध्ये मॅक्सीऑन व्हील्स, अम्पिर कम्प्युटिंग, क्रोपेन्सका इंडिया, आयईसी इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह,टाटा मोटर्स,अमुनिशन फॅक्टरी, टीकेआयएल इंडस्ट्रीज, फाईन स्पार्क, महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज ऑटो आकुर्डी, थरमॅक्स बॅबकॉक,फॉर्विया, बीसीसीएल टाइम्स ऑफ इंडिया, इंडप्रो इंजिनिरिंग, एचयूएफ इंडिया, एसकेएफ, सॅडविक इंडिया, जेसीबी इंडिया, बॉश चासिस इंडिया, अप्लस इडिदा, स्कोडा ऑटो, कमिन्स इंडिया, अभिषेक एंटरप्रिझेस वगैरे २४ कंपन्यांच्या एकूण १०६ खेळाडूंनी भाग घेतला.यावर्षी औद्योगिक क्रीडा संघटनेच्या बुद्धिबळ स्पर्धेला महिला व पुरुष खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद मिळाला.



पुणे पारितोषक वितरण: बुद्धिबळ स्पर्धेचे पारितोषक वितरण फोरविया कंपनीचे प्रशांत चौधरी(एफआयएस डायरेक्टर) व जितेंद्र निखळ(अँडमिन हेड)यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेला महिला व पुरुष खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेच्या पारितोषक वितरणप्रसंगी प्रास्ताविक औद्योगिक क्रीडा संघटनेचे प्रदीप वाघ यांनी तर सूत्रसंचालन प्रज्ञा पगार(फोरविया फॉरेशिया)यांनी केले. पारितोषक वितरण फोरविया कंपनीचे प्रशांत चौधरी(एफआयएस डायरेक्टर) व जितेंद्र निखळ(अँडमिन हेड)यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रशांत चौधरी म्हणाले"या वर्षी खेळाडूकडून उत्तम चुरशीचा खेळ पाहण्यास मिळाला.पुढील वर्षी ही स्पर्धा चुरशी आणखी पाहण्यास मिळेल व अधिक खेळाडू भाग घेतील असे वाटते. "याप्रसंगी प्रीती कुलकर्णी(एडमिन-फोरविया फॉरेशिया), संतोष शिंदे (स्पोर्ट्स कमिटी-एसकेएफ), सचिन कांबळे(स्पोर्ट्स कमिटी-जेसीबी), दत्ता गायकवाड(एचआर मॅनेजर-महिंद्रा अँड महिंद्रा), श्रीनिवास मोरे, अतुल काळोखे(एचआर मॅनेजर-बजाज ऑटो आकुर्डी),प्रमोद ठुबे(एचआर मॅनेजर-मॅक्साऑन व्हील्स),राहुल येळवंडे हे उपस्थित होते.सदर स्पर्धेला टॅक्टीकल मुव्हज चेस अकॅडमीचे आदेश इंगळे, शार्दुल तपासे, अपर्णा शिंदे, मयूर शिंदे, अनुप पांडे, शुभम चतुर्वेदी यांचे साह्य लाभलेले आहे.या स्पर्धेचे संपूर्ण आयोजन अनिकेत आवटे,प्रणित गवांदगवे, केयूर शाह, सिद्धेश गाडगे, प्रज्ञा पगार,सचिन चौगुले, अभिजीत शिंदे, महेश बिरादर यांनी केले. औद्योगिक क्रीडा संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कदम, खजिनदार प्रदीप वाघ, स्पर्धाप्रमुख हरी देशपांडे हे यावेळी उपस्थित होते.

औद्योगिक क्रीडा संघटनेच्या या बुद्धिबळ स्पर्धेत श्रीकांत मुचंडीकर(क्रोपनस्का इंडिया)याने एकूण ७ फेऱ्यांमध्ये ७ गुण मिळवीत अजिंक्यपद पटकावले, अजय फिरकेहा ६ गुणांसह उपविजेता ठरला.

» पान ७ वर

## बुमराह-रेड्डीचा सन्मान: एमसीजी ग्राउंडच्या ऑनर्स बोर्डात समावेश



**पुणे :** मेलबर्न कसोटीत मोठ्या पराभवानंतरही ऑस्ट्रेलिया क्रिकेटने जसप्रीत बुमराह आणि नितीश रेड्डी यांचा गौरव केला आहे. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडच्या ऑनर बोर्डवर बुमराह आणि नितीशची नावे लिहिली गेली आहेत. बीसीसीआयने मंगळवारी बुमराह आणि रेड्डी यांची नावे सन्मान फलकावर लिहिल्याचा व्हिडिओ जारी केला. 48 सेकंदांच्या या व्हिडिओमध्ये 21 वर्षीय नितीश रेड्डी सन्मान फलकावर आपले नाव बघून त्याचा फोटो काढताना दिसत होता. सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांची नावे या फलकावर आहेत. कपिल देव आणि अनिल कुंबळे हे बोर्डाच्या गोलंदाजांच्या यादीत आहेत. मेलबर्न कसोटीच्या दोन्ही डावात बुमराहने एकूण 9 विकेट घेतल्या. नितीश रेड्डीने पहिल्या डावात 114 धावांचे शतक झळकावून भारताला फॉलोऑनपासून वाचवले. या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध 184 धावांनी दारूण पराभव स्वीकारावा लागला होता. या पराभवानंतर भारतीय संघ 5 सामन्यांच्या मालिकेत 1-2 ने पिछाडीवर आहे. ऑनर्स बोर्ड म्हणजे काय? कोणत्याही मैदानावर संस्मरणीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान मंडळात समावेश केला जातो, जेणेकरून त्यांची कामगिरी दीर्घकाळ स्मरणात राहावी. सामान्यत: मैदानावर शतक झळकावणारे फलंदाज आणि एका डावात ५ बळी किंवा १० बळी घेणारे गोलंदाज यांना यात स्थान मिळते. MCG ऑनर्स बोर्डात स्थान मिळवणारा नितीश रेड्डी हा 11वा भारतीय फलंदाज आहे, तर बुमराह सहावा गोलंदाज आहे.

## अनसोल्ड राहिलेल्या मयंक अगरवालचे सलग तिसरं शतक

**पुणे :** भारताचा क्रिकेटपटू मयंक अगरवाल सध्या तुफान फॉर्ममध्ये खेळत आहे. तो सध्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत कर्नाटकचे नेतृत्व करत असून त्याने सगल तिसरे शतक ठोकले आहे. भारताचा सलामीवीर मयंक अगरवाल सध्या तुफान फॉर्ममध्ये खेळत आहे. तो सध्या कर्नाटक संघाचा कर्णधार असून विजय हजारे ट्रॉफी या लिस्ट ए देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत खेळत आहे.



गेल्या महिन्यात आयपीएल २०२५ साठी लिलाव पार पडला. या लिलावादरम्यान मयंक अगरवालला मात्र कोणीही बोली लावली नाही. त्यामुळे तो लिलावात अनसोल्ड राहिला. पण असे असले तरी त्याला जर एखाद्या संघातील खेळाडू दुखापतग्रस्त झाला, तर त्याच्या जागेवर खेळण्याची संधी मिळू शकते. अगरवालने आयपीएलमध्ये आत्तापर्यंत १२७ सामन्यांमध्ये १ शतक आणि १३ अर्धशतकांसह २६६१ धावा केल्या आहेत.

## 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक'

# बॉश इलेव्हन, वॉरीयर्स इलेव्हनची विजयी आगेकूच



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टीआरपीएस मॅनेजमेंट, अतुल ट्युटोरीयल्स् आणि लायन्स् क्लब पुणे रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तर्फे पहिल्या 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत बॉश इलेव्हन, वॉरीयर्स इलेव्हन आणि युबीएस कंपनी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी आगेकूच केली.

हिंजेवाडी येथील फोरस्टार मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये दुंडी नागोठी याने केलेल्या नाबाद ५६ धावांच्या जोरावर बॉश इलेव्हनने टेक महिंद्रा संघाचा ७ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या टेक महिंद्रा संघाने १३९ धावांचे आव्हान उभे केले होते. बॉश इलेव्हनने हे लक्ष्य १६ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले. दुंडी नागोठी (नाबाद ५६ धावा) आणि संकेत देशमुख (२९ धावा) यांनी संघाला विजय मिळवून दिला. गिरकर याने केलेल्या अचूक कामगिरीच्या जोरावर वॉरीयर्स इलेव्हनने सिनेक्रॉन टेक्नॉलॉजीचा ४२ धावांनी सहज पराभव केला. दुसऱ्या सामन्यामध्ये मोहीत गुप्ता याने केलेल्या स्फोटक फलंदाजीमुळे युबीएस कंपनीने तोरो क्लबचा ७ गडी राखून पराभव केला.

**बॉक्सिंग डे कसोटी**

## पराभवास रोहितसह विराटही जबाबदार -सुनील गावसकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारताचे माजी दिग्गज फलंदाज सुनील गावसकर यांनी मेलबर्नमध्ये झालेल्या पराभवास रोहित शर्मा आणि विराट कोहली या सिनियर्स खेळाडूंना जबाबदार धरले. या अव्वल फलंदाजांच्या अपयशामुळे बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात भारताला पराभवाची नामुष्की सहन करावी लागली, असे गावसकर म्हणाले.

आता सर्व जबाबदारी निवड समितीवर आहे. या सिनियर्सकडून अपेक्षित योगदान मिळत नाही. जर हे सुरुवातीचे फलंदाज धावा करत नसतील, तर तळाच्या फलंदाजांना तुम्ही जबाबदार कसे धरता, असा कठोर प्रश्न गावसकर यांनी उपस्थित केला आहे.


## प्रो कबड्डी लीगचे एक सहयोगी प्रायोजक

# परिमॅच स्पोर्ट्सच्या वतीने स्टार खेळाडूंसोबत एक सदिच्छा भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेळाडूंच्या पोषाख निर्मितीमधील एक लोकप्रिय ब्रॅण्ड असलेल्या आणि प्रो कबड्डी लीगचे एक सहयोगी प्रायोजक असलेल्या परिमॅच स्पोर्ट्सच्या वतीने लीगमधील स्टार खेळाडूंना प्रत्यक्ष भेटण्याची संधी आणि खेळाडूंना शुभेच्छा सत्राचे खास आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात तमिळ थलैवाजचा सचिन तंवर, गुजरात जाएंटसचा राज साळुंके आणि दिल्ली दबंगच्या योगेश दहियाचा समावेश होता.

या ६० मिनिटांच्या कार्यक्रमात चाहत्यांना लीगमध्ये खेळणाऱ्या कबड्डीपटूंचे वैयक्तिक जीवन, कौशल्य आणि उत्कटता याविषयी जाणून घेता आले. कार्यक्रमाची सुरुवात छोट्याशा स्वागताने झाली.



त्यानंतर चाहत्यांच्या कबड्डी ज्ञानाची चाचणी घेणारी एक स्पर्धा घेण्यात आली.

त्यानंतर प्रश्नेत्तराच्या सत्रात खेळाडूंनी त्यांचा प्रेरणादायी प्रवास, दैनंदिन दिनचर्या, सर्वोच्च स्तरावर कामगिरी करण्यासाठी आवश्यक असलेली उर्जा या विषयी मनमोकळ्या गप्पा मारल्या. व्यावसायिक कबड्डीच्या दुनियेतील एक वेगळीच झलक दिसून आल्याने चाहते मोहित झाले होते. त्याचबरोबर कबड्डी पर्वाविषयीचे ट्रुथ आणि डेयर, रोमांचक तंदुरुस्ती आवहाने आणि कबड्डीची थीम असलेल्या ट्रिव्हिया अशा विविख कार्यक्रमात चाहते खेळाडूंसोबत सामील झाले होते. दडपणाखाली झालेल्या सामन्यात शारीरिक तंदुरुस्ती, मानिसक लवचिकता कशी राखली या विषयी खेळाडूंनी चाहत्यांना माहिती देत मार्गदर्शन केले.

## राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा

# राध्या, आरित, निधिश, अयान संयुक्त रित्या आघाडीवर



**पुणे :** महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या वतीने आयोजित व जागतिक बुद्धिबळ महासंघ(फिडे), भारतीय बुद्धिबळ महासंघ(एआयसीए) यांच्या मान्यतेने होत असलेल्या 37व्या 9वर्षाखालील खुल्या व मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सातव्या फेरीअखेर राध्या मल्होत्रा, आरित कपिल, निधिश श्यामल, अयान फुटाणे यांनी आपापल्या गटात 6.5 गुणांसह संयुक्तरित्या आघाडी प्राप्त केली आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॉक्सिंग हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात सातव्या फेरीत दुसऱ्या पटावरील लढतीत पंजाबच्या राध्या, मल्होत्रा हिने आंध्रप्रदेशाच्या वोंटी श्री गुरुवर्षिनीचा पराभव 6.5 गुणांसह आघाडी प्राप्त केली. पहिल्या पटावरील लढतीत केरळच्या दिवी बिजेशने राजस्थानच्या कियान्ना परिहारला बरोबरीत रोखले व 6 गुण मिळवले. दिवीने किंग्ज पद्धतीने डावास सुरुवात केली व ४८ चालींमध्ये कियान्नाला बरोबरीत रोखले. खुल्या गटात दिल्लीच्या आरित कपिलने महाराष्ट्राच्या अद्विक अग्रवालला बरोबरीत रोखले व 6.5गुण मिळवले. तेलंगणाच्या निधिश श्यामलने महाराष्ट्राच्या अर्जुन सिंगचा, तर कर्नाटकाच्या अयान फुटाणेने महाराष्ट्राच्या अहान कातरुकाचा पराभव करून 6.5 गुणांची कमाई केली.

# जिल्हा मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन ८ जानेवारी पासून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेच्या वतीने योनेक्स सनराईज पीवायसी एचटीबीए अमनोरा कप सुपर ५०० जिल्हा मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ८ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत पीवायसी हिंदू जिमखान्याच्या बॅडमिंटन कोर्टवर होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५ जानेवारी पर्यंत नावनोंदणी करता येणार आहे. अशी माहिती हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेचे सचिव उदय साने आणि संयोजन सचिव अभिजीत चांदगुडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष अविनाश जाधव, पीडीएमबीएचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, पीवायसीचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, पीवायसीचे सहसचिव सारंग लागू उपस्थित होते. यावेळी हवेली तालुका बॅडमिंटन संघटनेच्या लोगोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच स्पर्धेच्या लोगोचे अनावरण अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेचे यंदा १५ वे वर्षे आहे. या स्पर्धेला सिटी कॉर्पोरेशनच्या वतीने पारितोषिके देण्यात येणार असून, कॉर्पोरेट ॲथलीट हे या स्पर्धेचे सहप्रायोजक आहेत. तर योनेक्स सनराइज हे इक्विपमेंट प्रायोजक आहेत.

**क्रमवारीचा विचार करावा**

## कारकिर्दीबाबत निर्णय घेण्याची वेळ; - रवी शास्त्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** विराट कोहली इतक्यात निवृत्त होणार नाही, पण रोहित शर्माने किमान फलंदाजीच्या क्रमवारीचा तरी विचार करावा, असे मत रवी शास्त्री यांनी व्यक्त केलंय.विराट कोहलीमध्ये अजून तीन-चार वर्षे खेळण्याची क्षमता आहे, परंतु रोहित शर्माने आपल्या कारकिर्दीबाबत निर्णय घेण्याची वेळ आली आहे. असे मत रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.

## 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

# सिंगापूर थंडरबोल्ट व क्रिशु नाईट्स यांच्यात अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत सिंगापूर थंडरबोल्ट, क्रिशु नाईट्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत नील चांडक(3-16) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर सिंगापूर थंडरबोल्ट संघाने क्रिककिंगडम युनायटेड संघाचा 17 धावांनी पराभव करत अंतिम फेरी गाठली.

दुसऱ्या लढतीत संस्कार सुक्कल(4-17) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर किशू नाईटस संघाने क्रिककिंगडम युनायटेड संघाचा 3 गडी राखून पराभव केला.

## 'पीडीएफए युथ लीग' स्पर्धा

# रायझिंग पुणे एफसी, संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर. एम. स्पोटर्स कन्सेप्ट्स आणि पुणे जिल्हा फुटबॉल संघटना (पीडीएफए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेत स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमी, सिंग्मय एफसी, रायझिंग पुणे एफसी, पुणे पायोनिअर एफसी आणि सिटी एफसी पुणे या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

रहाटणी येथील स्पोर्टझी अरेना मैदानावर झालेल्या या स्पर्धेत स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीने पुणे पायोनिअर्स संघाचा १०-१ असा सहज पराभव केला. या सामन्यामध्ये उस्मान एफ. याने सर्वाधिक चार गोल तर, विवान साथवणे, जोनाथन सालोमन यांनी प्रत्येकी २ गोल केले. निकीत गुप्ता आणि सिद्धार्थ जगदाळे यांनी एकेक गोल मारले. सिग्मय एफसी संघाने मॅथ्यु फुटबॉल क्लबचा ५-४ असा विजयी मिळवून सलग दुसरा विजय नोंदविला.



## जिल्हास्तरीय सुपर 100 मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा

# आदित्य ओक, श्रेया शेलार यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने आयोजित डेक्कन जिमखाना पुरस्कृत योनेक्स सनराईज एसबीए कप जिल्हास्तरीय सुपर 100 मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष गटात आदित्य ओकने तर, महिला गटात श्रेया शेलार यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात उपांत्यपूर्व फेरीत सातव्या मानांकित आदित्य ओकने अव्वल मानांकीत नीलाब्जो पालचा





15-11, 15-17, 15-12 असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. तिसऱ्या मानांकित अथर्व खिस्तीने आहान पाठकचा 15-11, 15-11 असा तर, दुसऱ्या मानांकित सुजल लाखरीने प्रतीक धर्माधिकारीचा 9-15, 15-12, 17-15 असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

महिला गटात उपांत्यपूर्व फेरीत बिगर मानांकित श्रेया शेलार हीने दुसऱ्या मानांकित श्रुती कुलकर्णीचा 15-2, 15-1 असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. अव्वल मानांकित अनन्या गाडगीळने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत अनुष्का घोषचा 15-2, 15-3 असा तर, इंदिरा पाचरणेने अंजना कल्लापूरचा 15-2, 15-4 असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

13 वर्षांखालील मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित ख्याती कत्रे हीने सातव्या मानांकित स्वराली थोरवेला 15-6, 15-5 असे पराभुत केले. तिसऱ्या मानांकित समन्वया धनंजयने अग्रिमा राणावर 15-10, 15-4 असा पराभव करून आगेकूच केली. दुसऱ्या मानांकित आराध्या ढेरेने सहाव्या मानांकित गार्गी कामठेकरला 15-4, 15-3 असे पराभुत केले. चौथ्या मानांकित स्वरा मोरयेने धनी झलावडियाचा 15-7, 15-9 असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.